## लाल किल्ल्यावर ध्वजारोहण

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ८०व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त लाल किल्ल्यावर ध्वजारोहण करण्यात आले. यंदाच्या सोहळ्यात 'वंदे मातरम्'च्या १५० व्या वर्धापनदिनानिमित्त प्रथमच स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात त्याचे गायन करण्यात आले. या सोहळ्यात पंतप्रधान मोदी यांच्या जवळ उभ्या असलेला एक महिला लष्करी अधिकाऱ्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कॅप्टन सोनिया सिंह चौहान असे या महिला अधिकाऱ्याचे नाव आहे. त्या भारतीय लष्करातील कमिशन्ड अधिकारी आहेत. यंदाच्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यात त्यांच्यावर विशेष औपचारिक जबाबदारी सोपवण्यात आली होती.


१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | रविवार । दि. १६ ऑगस्ट २०२६ । अंक ७१ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹ | । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## एका कमांडवर मिळणार ओबीसींची लोकसंख्या

**मुंबई :** यापूर्वी जनगणनेत जात हा विषय नव्हता. पण आता जातनिहाय जनगणनेचा विषय मंजूर झाल्याने एका कमांडवर देशभरातली ओबीसी समाजाची लोकसंख्या हातात येणार आहे, असे वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. ते शनिवारी (दि.१५) मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. ते म्हणाले की, यापूर्वी कधीही या कॉलममध्ये जात हा विषय नव्हता. मात्र, आता नव्या जनगणनेत एससी, एसटी आणि जात अशा पद्धतीची रचना आहे. प्रत्येक राज्यात ओबीसी सूचीत वेगळ्या जाती आहेत. एकदा सगळ्या जाती आल्या की, जातींचे बंचिंग होऊन ओबीसी समाजाची लोकसंख्या आपल्याला कळेल. प्रत्येक जातीची लोकसंख्या आली की, एका कमांडवर ओबीसीची लोकसंख्या आपल्या हातात येईल.

# रायगडात देशभक्तीचा जल्लोष


(छायाचित्र : सुधीर नाझरे)

### ठिकठिकाणी देशभक्तीपर गीतांसह सांस्कृतिक कार्यक्रम

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन शनिवारी (दि.१५) रायगड जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागात ठिकठिकाणी साजरा करण्यात आला. यावेळी शाळांपासून, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषद व महानगरपालिका अशा अनेक ठिकाणी ध्वजारोहणाचा कार्यक्रम पारपडला. या निमित्ताने जिल्ह्यामध्ये ठिकठिकाणी देशभक्तीपर गीतांसह सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. तसेच, जिल्ह्यातील मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम अलिबागमधील पोलीस मुख्यालयात झाला. यावेळी रोजगार मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते •>पान २ वर


(छायाचित्र : समीर मालोदे)

## वेधक

### तरूणींकडून तरुणावर कोयत्याने हल्ला

**पुणे :** फ्लाईंग जिप्सी हॉटेलमध्ये शनिवारी (दि.१५) पहाटेच्या सुमारास एका तरुणावर कोयत्याने हल्ला झाल्याची घटना घडली आहे. रील बनवण्याच्या आणि कमेंटच्या वादातून हा प्रकार घडल्याचे सांगण्यात येत आहे. या हल्ल्यात अथर्व जगताप नावाचा १९ वर्षीय तरुण गंभीर जखमी झाला आहे. डेक्कन पोलीस ठाण्याच्या हद्दीत असणाऱ्या फ्लाईंग जिप्सी हॉटेलमध्ये ही घटना घडली. या प्रकरणी दोन तरुणींसह तीन संशयितांची ओळख पटवण्यात आली आहे. ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. या फुटेजमध्ये दोन मुली स्पष्टपणे दिसत आहेत. पोलिसांनी आतापर्यंत माधवी कुंभार, स्नेहल सोनके आणि शार्दूल ओव्हाळ या तीन संशयितांची ओळख पटवली आहे.

### वंदे मातरम् काँग्रेसचीच संस्कृती

**मुंबई :** ''भाजप गेली १२ वर्षे सत्तेवर आहे. पंत्रप्रधान नरेंद्र मोदींनी १३ वेळा पंतप्रधान म्हणून भाषण केले आहे. तरीदेखील त्यांच्याकडून 'ध' चा 'मा' करणे सुटत नाही. त्यामुळे पंतप्रधान यांच्या भाषणात काही दम नाही'', अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. तसेच त्यांनी, काँग्रेस मुख्यालयात जेव्हा वंदे मातरम् हे गाणं गायलं जात होतं, तेव्हा सोनिया गांधी कथितपणे नाराज झाल्या, तसेच पक्षाच्या कार्यकर्त्यांना त्यांनी हे गाणं थांबवण्यास सांगितले, असा आरोप करत आर.पी. सिंह यांनी ट्विटरवरुन व्हिडिओ देखील शेअर केला, या बाबतही स्पष्टीकरण देत हा दावा फेटाळून लावला आहे. सपकाळ म्हणाले की, सध्या व्हिडीओमध्ये केलेल्या दाव्यात तथ्य •>पान २ वर

### 'हा कितवा स्वातंत्र्य दिन?'

**नाशिक :** देशभरात रविवारी मोठ्या उत्साहात भारताचा स्वातंत्र्यदिन साजरा झाला. यावेळी नाशिकमधील विभागीय आयुक्त कार्यालयात मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. पालकमंत्रिपदाच्या तिढ्यामुळे राज्य सरकारच्या आदेशानुसार त्यांना ध्वजारोहणाची संधी मिळाली. मात्र, हा कितवा स्वातंत्र्यदिन हेच ते विसरले. त्यावेळी त्यांनी सभेत उभ्या असलेल्या नाशिकच्या महापौरांना प्रश्न विचारला की, ''हा कितवा स्वातंत्र्यदिन?'' त्यांनतर महापौरांनी हा ८० वा स्वातंत्र्य दिन असल्याचे सांगितले. त्यावर गिरीश महाजन यांचे समाधान झाल्याचे दिसले. त्यानंतर त्यांच्या भाषणानंतर देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या. परंतु, महाजन यांना स्वातंत्र्य दिनाचा आकडा कसा आठवला नाही, याची कुजबूज मात्र सर्वत्र होत आहे.

### पृथ्वीराज चव्हाणांच्या गौप्यस्फोटाने खळबळ

**मुंबई :** राज्यात आणि देशाच्या राजकारणात सध्या भाजपाचा बोलबाला आहे. त्यामुळे, भाजपात जाणाऱ्यांची गर्दी गल्लीपासून दिल्लीपर्यंत पाहायला मिळत आहे. तर, भाजपासोबत सत्तेत जाण्यासाठीही अनेक राजकीय पक्ष पुढाकार गेत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, सध्याच्या राजकारणावर चर्चा होताना अनेकदा राजकीय इतिहास आणि संस्कृतीचाही उल्लेख केला जातो. त्यातच, आता माजी मुख्यमंत्री तथा काँग्रेसचे वरिष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. ते म्हणाले की, मी मुख्यमंत्री असताना गोपीनाथ मुंडे आणि काँग्रेसचे वरिष्ठ नेते अहमद पटेल यांच्यात गुप्त बैठका झाल्या होत्या. गोपीनाथ मुंडे यांनी मंत्री •>पान २ वर

## गोगावलेंच्या अडचणीचा भाग कोण ?

### महायुतीमधील पक्षांमध्ये अंतर्गत चर्चेला उधाण

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहणाचा मान मिळाला. काही दिवसांनी पालकमंत्री पदाचा मान मिळेल, असा विश्वास रोजगार मंत्री भरत गोगावले यांनी व्यक्त करीत अडचणीचा भाग आता राहिला नाही, असा टोला लगावला. स्वातंत्र्य दिनानिमित्त पत्रकारांसोबत संवाद साधताना गोगावले म्हणाले. मात्र, गोगावलेंच्या या टोल्याने महायूतीमधील पक्षांमध्ये अंतर्गत चर्चेला उधाण आले आहे. त्यामुळे गोगावलेंच्या अडचणीचा भाग कोण, असा सवाल उपस्थित होत आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये पालकमंत्री पदावरून गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेना (शिंदे) विरुद्ध राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षात वाद पेटला होता. शिंदे गटातील आमदार महेंद्र थोरवे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर नाराजीही व्यक्त केली होती. राष्ट्रवादीपेक्षा शिवसेनेला पालकमंत्री पद मिळावे, यासाठी महायुतीमध्ये अंतर्गत धुसफूस सुरुच होती. मात्र, सरकारने रायगड जिल्ह्यातील पालकमंत्री पदाचा प्रश्न प्रलंबितच ठेवला आहे. तरीही गोगावलेंना पालकमंत्री पद मिळण्याची आशा कायमच आहेत. प्रजासत्ताक दिनाबरोबरच स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहणाचा मान भरत गोगावले यांना देण्यात आला. त्यांच्या हस्ते शनिवारी अलिबाग येथील मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम पार पडला. त्यानंतर त्यांनी पत्रकारांसोबत संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, आज स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहणाचा मान मिळाला. काही दिवसांनी पालकमंत्री पदाचा मान मिळेल. आता अडचणीचा भागच राहिला नाही, असे गोगावले म्हणाले.



त्यांच्या या वक्तव्याने महायुतीमधील घटक पक्षातील काही कार्यकर्त्यांमध्ये चर्चेला उधाण आले आहे. त्यामुळे गोगावलेंच्या पालकमंत्री पदासाठी अडथळा नक्की कोणाचा होता, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## तिसऱ्या मुंबई विरोधात शेतकरी एकवटले

### कोकण आयुक्त कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

तिसऱ्या मुंबईच्या नावाखाली उरण, पनवेल आणि पेण तालुक्यातील ८० हजार एकर हून अधिक सुपीक शेत जमीन बळकावण्याचा घाट सरकारने घातला असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी एकत्र येत कोकण भवन येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर ''तिसरी मुंबई रद्द करा'' या प्रमुख मागणीसह अन्य मागण्यांसाठी लाक्षणिक उपोषण केले. एमएमआरडीए केएससी नवनगर तिसरी मुंबई विरोधी शेतकरी संघर्ष समितीच्यावतीने स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी (दि.१५) आंदोलन पुकारले होते.




समितीकडून मिळालेल्या माहितीनुसार, ४ मार्च २०२४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे राज्य सरकारने तिसरी मुंबई विकास आराखडा तयार केला. प्रस्तावीत तिसऱ्या मुंबईसाठी पेणमधील ८८, उरणमधील २९ आणि पनवेलमधील ७ अशा एकूण १२४ गावांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पाविरोधात हजारो शेतकऱ्यांनी एकत्र येऊन शासनाकडे गेल्या अडीच वर्षापासून पत्र व्यवहार केले आहेत. २५ हजार शेतकऱ्यांनी हरकती नोंदवूनदेखील त्यावर सरकारने अद्यापपर्यंत सुनावणी घेतली नाही. भांडवलदारांच्या भल्यासाठी हा प्रकल्प असल्याचा आरोप करण्यात आला आहे. मेडीसीटीसह पेण ग्रोथ सेंटर असे गोंडस नाव देऊन हा प्रकल्प आणण्याचा •>पान २ वर

> नवी मुंबईपासून उरण, पनवेलमध्ये वेगवेगळे प्रकल्प निर्माण करण्यासाठी हजारो शेतकऱ्यांच्या जमीनी घेतल्या. मात्र, आजही स्थानिक शेतकरी त्यांच्या न्याय हक्कासाठी लढा देत आहे. ३५ ते ४० वर्षे होत आली असतानाही शेतकऱ्यांना स्थानिक भूमीपुत्रांना न्याय मिळाला नाही. प्रस्तावित तिसरी मुंबई प्रकल्प उभारताना शेतकऱ्यांना विश्वासात घेतले जात नाही. या प्रकल्पामुळे गावपण नष्ट होणार आहे. शेती जाणार आहे. त्यामुळे तिसरी मुंबई नको ही आंदोलनकर्त्यांची भुमिका आहे. त्यासाठी लाक्षणिक उपोषण करण्यात आले.
>
> – रुपेश पाटील, सरचिटणीस, एमएमआरडीए के.एस.सी. नवनगर तिसरी मुंबई विरोधी समिती

## गुडघाभर पाण्यात उभे करून ध्वजारोहण!

### धाकटे शहापूर शाळेची संतापजनक अवस्था

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

स्वातंत्र्यदिनी देशभरात अभिमानाने तिरंगा फडकवला जात असताना, अलिबाग तालुक्यातील धाकटे शहापूर येथील रायगड जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना गुडघाभर पाण्यात उभे राहून ध्वजारोहण करावे लागले असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

शाळेच्या परिसरात पावसाचे पाणी साचत असल्याने राष्ट्रीय सणांच्या दिवशी विद्यार्थ्यांना चिखल आणि पाण्यातून वाट काढत ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहावे लागत आहे. राष्ट्रीय सणाच्या दिवशी विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि स्वच्छ परिसर उपलब्ध करून देणे अपेक्षित असताना, त्यांनाच गुडघाभर पाण्यात उभे राहण्याची वेळ येत असल्याने शिक्षण विभागाच्या कारभारावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शाळेच्या परिसरातील पाण्याचा निचरा करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करून विद्यार्थ्यांना या समस्येतून तातडीने मुक्त करावे, अशी मागणी ग्रामस्थ आणि पालकांकडून होत आहे. तसेच, विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी प्रशासनाची असताना, राष्ट्रीय सणाच्या दिवशीच विद्यार्थ्यांना गुडघाभर पाण्यात उभे राहण्याची वेळ येणे ही प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब असल्याची प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

## स्वातंत्र्य दिन साजरा न केल्याचा आरोप

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

कुरकुंडी-कोलटेंभी ग्रामपंचायतीमध्ये स्वातंत्र्य दिनाचा राष्ट्रीय कार्यक्रम नियमानुसार साजरा करण्यात आला नसल्याचा आरोप करत ग्रामस्थ सचिन जगन्नाथ पाटील यांनी पंचायत समिती प्रशासनाकडे तक्रार दाखल केली आहे. या प्रकाराची सखोल चौकशी करून संबंधित ग्रामसेवक व प्रशासकांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

स्वातंत्र्य दिन हा देशाच्या सार्वभौमत्वाशी आणि संविधानिक मूल्यांशी निगडित राष्ट्रीय दिवस आहे. त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावरही ध्वजारोहणासह आवश्यक शासकीय कार्यक्रमांचे आयोजन अपेक्षित असते. मात्र, व कुरकुंडी-कोलंटेभी ग्रामपंचायतीमध्ये या •>पान २ वर

### कुरकुंडी-कोलटेंभी ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह



### कारवाईची मागणी

ग्रामसेवक किंवा प्रशासक यांच्या निष्काळजीपणामुळे राष्ट्रीय कार्यक्रमाचे आयोजन झाले नसेल तर संबंधितांची जबाबदारी निश्चित करून शासनाच्या नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी सचिन पाटील यांनी केली आहे. तसेच, चौकशीचा निष्कर्ष आणि त्यानंतर करण्यात आलेल्या कारवाईची माहिती लेखी स्वरूपात देण्याची मागणीही त्यांनी केली आहे. दरम्यान, ग्रामपंचायतीकडून या आरोपांबाबत अधिकृत स्पष्टीकरण अद्याप समोर आलेले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम झाला होता की नाही, तसेच त्यासंदर्भातील अधिकृत नोंदी काय आहेत, हे चौकशीनंतर स्पष्ट होणार आहे.

## आधारवरील नाव बदलाची प्रक्रिया ठप्प

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

आधार कार्डवरील नावात बदल करण्याची प्रक्रिया गेल्या दोन महिन्यांपासून रखडली आहे. त्यामुळे रायगड तसेच ठाणे जिल्ह्यातील हजारो नागरिकांसमोर मोठी अडचण निर्माण झाली आहे. १५ जूनपासून नाव बदलासाठी केलेले अनेक अर्ज अद्याप प्रक्रियेतच असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आणि संतापाचे वातावरण आहे.

शासकीय राजपत्राच्या आधारे आधार कार्डवरील नावात बदल करण्यासाठी नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज केले आहेत. मात्र, अर्ज करून बराच कालावधी उलटूनही आधारवरील नाव बदलले जात नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. त्यामुळे आधार कार्डवरील जुने नाव आणि

### विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर परिणाम

इतर अधिकृत कागदपत्रांवरील नाव यामध्ये तफावत निर्माण झाली आहे. या समस्येचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांना बसत आहे. दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक प्रक्रियेत आधार कार्डवरील नाव महत्त्वाचे असल्याने नाव अद्ययावत न झाल्यामुळे महाविद्यालयीन प्रवेश, शैक्षणिक कागदपत्रे तसेच आपार ओळख क्रमांक आणि इतर ओळख क्रमांक तयार करण्याच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होत आहेत. याशिवाय विविध नोकरी आणि सरकारी भरती प्रक्रियेलाही या विलंबाचा फटका बसत आहे. आधारवरील नाव आणि शैक्षणिक कागदपत्रांवरील •>पान २ वर

**सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानावर कारवाईचे संकेत** | **टपऱ्या, हॉटेल्समध्ये जनजागृती पोस्टर्स लागणार**

## व्यसनमुक्तीसाठी नगराध्यक्षांचा निर्धार



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबागला केवळ स्वच्छ व सुंदर नव्हे, तर व्यसनमुक्त, निरोगी आणि पर्यावरणपूरक शहर बनविण्याचा मानस असून, चहाच्या टपऱ्या, पानटपऱ्या व हॉटेल्समध्ये जनजागृती पोस्टर्स लावले जाणार आहेत, असा निर्धार अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक यांनी केला आहे. भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त त्यांनी हा संकल्प हाती घेतला आहे.

अलिबाग नगर परिषदेच्यावतीने शनिवारी (दि.१५) स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. नगराध्यक्षा अक्षया नाईक यांच्या हस्ते कार्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. राष्ट्रध्वजाला मानवंदना देत उपस्थित नागरिक, विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी देशभक्तीपर वातावरणात स्वातंत्र्यदिन साजरा केला.

> अलिबाग शहरातील चहाच्या टपऱ्या, पानपट्ट्या, हॉटेल्स व इतर आस्थापनांमध्ये नो स्मोकिंग जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. शाळा, महाविद्यालये, रुग्णालये व विविध संस्थांकडून धूम्रपानमुक्त परिसराचे घोषणापत्र घेतले जाणार आहे. पर्यटकांसाठीही कोटपा कायद्यानुसार अंमलबजावणी करण्यात येणार आहे.
>
> – ॲड. मानसी म्हात्रे, उपनगराध्यक्षा, अलिबाग नगरपरिषद

यावेळी नगराध्यक्षा अक्षया नाईक म्हणाल्या की, आज आपण स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवी प्रवास साजरा करत आहोत. पुढील पिढीला व्यसनमुक्त ठेवणे हीच त्यांच्यासाठीची सर्वात मोठी देशसेवा आहे. अलिबाग नगर परिषद जनजागृती, शिक्षण आणि कायद्याची प्रभावी अंमलबजावणी या तीन माध्यमांतून व्यसनमुक्त अलिबाग हा संकल्प प्रत्यक्षात उतरवेल, असा विश्वास व्यक्त केला. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने समाजात आरोग्याविषयी सकारात्मक जनजागृती निर्माण करण्यासाठी शाळा, •>पान २ वर




# माती, पाणीसंवर्धनाचा दिखावा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात डोंगर पोखरून माती उत्खनन केले जात आहे. दक्षिण रायगडपासून अनेक भागात मातीमाफियांचा सुळसुळाट निर्माण झाला आहे. जिल्ह्यात पाऊस पडूनही अलिबाग तालुक्यासह मुरूड तालुक्यातील अनेक गावांमध्ये पाण्याचा दुष्काळ निर्माण झाला आहे. त्यावर ठोस उपाययोजना करण्यास जिल्हा प्रशासन उदासीन ठरल्याची चर्चा आहे. मात्र, जलसंधारण दिनानिमित्त माती व पाणी संवर्धनासाठी स्पर्धेचा दिखावा प्रशासनाकडून केला जात असल्याची चर्चा सध्या जोरात सुरु आहे. दिन साजरे करण्यासाठी हा दिखावा केला जाणार असल्याचे बोलले जात आहे.


● (संग्रहीत छायाचित्र)

२१ ऑगस्ट रोजी साजरा होणाऱ्या जलसंधारण दिनानिमित्त १९ ऑगस्ट पर्यंत जलसंधारण सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्ताने जिल्ह्यातील १५ ते ३० वयोगटातील युवक-युवतींसाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत "माती व पाण्याच्या संवर्धनासाठी रील" ही समाजमाध्यमावरील रील स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे "माती वाचवा, पाणी वाचवा", "सुरक्षित उद्या घडवा" हे घोषवाक्य आहे. परंतु, जिल्ह्यात पाणी आणि मातीचे संवर्धन करण्यास प्रशासनच उदासीन ठरल्याचे चित्र आहे. जिल्ह्यामध्ये जानेवारी महिना संपल्यावर पाणीटंचाईचे संकट सुरु होते. पाणीपुरवठा विभागाकडून पाणीकपातीला सुरुवात केली जाते. मे महिन्यामध्ये जिल्ह्यातील ६४ गावे आणि २३० वाड्यांमधील तब्बल १ लाख १३ हजार ७०९ नागरिकांना ६४ खासगी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला. जलजीवन मिशनअंतर्गत प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचवण्याचे स्वप्न दाखवण्यात आले होते. मात्र, ते स्वप्नही भंगले. पाऊस सुरु होऊन दीड महिना होत आला आहे, तरीदेखील जिल्ह्यातील अनेक भागांत पाण्याची टंचाई कायम आहे. स्थानिक प्रशासनाकडून योग्य उपाययोजना न केल्याचा फटका बसत असल्याची ओरड आहे. जिल्ह्यात ठिकठिकाणी विकासाच्या नावाखाली माती उत्खनन राजरोसपणे सुरु आहे. अनेकांकडून याबाबत तक्रारीही करण्यात आल्या आहेत डोंगर पोखरले जात आहेत. त्यामुळे दरडीचा धोका उद्भवत आहे. यावर मात्र प्रशासनाकडून ठोस कारवाई करण्यात आली नसल्याच्या तक्रारी कायमच आहेत. कारवाईचा दिखावा करण्याचे काम प्रशासनाकडून वेळोवेळी केले आहे. माती उत्खनन करून चोरणाऱ्यांविरोधात कडक शासन करण्यास प्रशासन उदासीन ठरल्याचा आरोप जनतेकडून केला जात आहे. मातीचोरी आणि पाणी संवर्धनाबाबत प्रशासनाकडूनच योग्य उपाययोजना केल्या जात नाही. परंतु, अभियानाचा दिखावा करीत माती आणि पाणीसंवर्धन करण्याचे आवाहन कागदी घोडे नाचवून करण्याचा प्रयत्न प्रशासनाचा कायमच राहिला असल्याचा आरोप होत आहे.

# कायद्याचे ज्ञान विद्यार्थ्यांना सक्षम बनवते : रेवती कंटे

**●अन्यायाविरोधात कायदेशीर मार्गाने आवाज उठविण्याचे आवाहन**

। अलिबाग । प्रतिनिधी ।



विद्यार्थ्यांनी आपल्या हक्कांसोबतच कायदेशीर अधिकारांचीही माहिती करून घेतली पाहिजे. कायद्याचे ज्ञान हे केवळ स्वतःचे संरक्षण करण्यासाठी नव्हे, तर सुरक्षित, सजग आणि जबाबदार समाज घडविण्यासाठीही महत्त्वाचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या अन्यायाला बळी न पडता त्याविरोधात कायदेशीर मार्गाने आवाज उठवावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव रेवती कंटे यांनी केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जनजागृतीकरण्यासाठीदि.१३ ऑगस्ट रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी कंटे बोलत होत्या. हा कार्यक्रम प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष एस. बी. अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील होत्या.

यावेळी ज्येष्ठ पॅनल वकील ॲड. के.डी. पाटील यांनी रॅगिंगविरोधी कायद्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रॅगिंगमुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि शैक्षणिक जीवनावर होणारे गंभीर परिणाम, कायद्यातील तरतुदी तसेच विद्यार्थ्यांचे अधिकार याबाबत त्यांनी माहिती दिली. रॅगिंगच्या प्रकरणात कारावास, दंड, प्रवेश रद्द करणे तसेच पुढील प्रवेशावर बंदी यांसारख्या कठोर कारवाईची तरतूद असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रॅगिंगची तक्रार प्राप्त झाल्यानंतर संस्थेच्या प्रमुखांनी नियमानुसार चौकशी करून आवश्यक कारवाई करणे बंधनकारक असल्याचेही त्यांनी सांगितले. ॲड. विक्रांत पाटील यांनी आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या पार्श्वभूमीवर अमली पदार्थांचा गैरवापर आणि व्यसनाधीनतेच्या धोक्याबाबत मार्गदर्शन केले. अमली पदार्थमुक्त भारतासाठी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या योजनेंतर्गत जनजागृती, शिक्षण, प्रतिबंध आणि पुनर्वसनासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती त्यांनी दिली. यावेळी विद्यार्थी, डॉक्टर, कर्मचारी तसेच विधी स्वयंसेवक सुशील साईकर, पूनम रांजणकर आणि अक्षय सांदणकर उपस्थित होते.

# जेडब्ल्यूआरच्या कामगारांना पगारवाढ



। चिरनेर । प्रतिनिधी ।

कामगारांच्या हाताला रोजगार आणि त्यांच्या श्रमाला योग्य मोबदला मिळावा, या भूमिकेतून गेली ३८ वर्षे कामगारांच्या प्रश्नांसाठी लढणारे आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांच्या पुढाकाराने जेडब्ल्यूआरमधील ८० कामगारांना तीन हजार रुपयांची पगारवाढ मिळाली आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या पगारवाढीमुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

कोरोना महामारीच्या काळात अनेक उद्योगांमध्ये कामगारांना रोजगार गमवावा लागला, तर काही ठिकाणी वेतन कपात करण्यात आली होती. अशा कठीण परिस्थितीत महेंद्र घरत यांनी कामगारांच्या बाजूने ठाम भूमिका घेत अनेकांचा रोजगार टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न केले. जेडब्ल्यूआरसारख्या वेअरहाऊसमध्येही कोरोना काळात कामगारांना रोजगार मिळवून देण्याबरोबरच त्यांच्या वेतनवाढीसाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

कमी वेतनावर काम करणाऱ्या कामगारांच्या पगारात वाढ व्हावी, यासाठी सातत्याने प्रयत्न केल्यानंतर अखेर ८० कामगारांच्या वेतनात प्रत्येकी तीन हजार रुपयांची वाढ करण्यात आली. कोरोना काळात रोजगार मिळाला, त्यानंतर नोकरी टिकली आणि आता पगारवाढ मिळाल्याने कामगारांच्या आनंदात भर पडली आहे. गणेशोत्सवापूर्वी मिळालेली ही पगारवाढ कामगारांसाठी मोठी भेट ठरली असून, कामगारांनी जेडब्ल्यूआरचे मालक ललित जोबनपुत्र आणि कामगार नेते महेंद्र घरत यांचे आभार मानले आहेत.

# धर्मराज सोनके उत्कृष्ट सेवा पदकाचे मानकरी

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

नवी मुंबईतील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उप अधीक्षक धर्मराज सोनके, उत्कृष्ट सेवा पदकाचे मानकरी ठरले आहेत. भारत सरकारच्या केंद्रीय गृह मंत्रालयाकडून या पदकासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. रायगड पोलीस दलातदेखील कित्येक वर्षे त्यांनी सेवा केली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



धर्मराज सोनके हे २०१० पासून महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस उपनिरीक्षक म्हणून रुजू झाले. मुंबई पोलीस दलात कार्यरत असताना दहिसह पोलीस ठाण्यात गुन्हे प्रकटीकरण अधिकारी म्हणून काम केले. वेगवेगळ्या गंभीर गुन्ह्यांची उकल करून आरोपींना गजाआड केले आहे. पुणे येथे विशेष सुरक्षा विभागासह रायगड पोलीस दलातदेखील त्यांनी सेवा केली आहे. रायगड पोलीस अधीक्षक कार्यालयात जनसंपर्क अधिकारी म्हणून कर्तव्य पार पाडले. दरम्यान, महाराष्ट्रात पहिल्यांदाच समाधान कक्ष येथे पोलीस हेल्पलाइन हा उपक्रम राबविण्यात आला. त्यानंतर दिघी सागरी पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून पदभार हाती घेतल्यावर आयएसओ मानांकन प्राप्त म्हणून रायगडमधील पहिले पोलीस ठाण्याचा बहुमान त्यांनी मिळविला. दिघी सागरी पोलीस ठाण्यातील सागरी सुरक्षेसह पर्यटकांच्या सुरक्षेसाठी त्यांनी वेगवेगळे उपक्रम हाती घेतले. पर्यटकांसाठी पहिल्यांदा पर्यटक हेल्पलाइन चालू केली होती.तसेच मच्छीमार बांधव यांच्याशी समन्वय साधून सागरी सुरक्षेच्या दृष्टीने सकारात्मक कार्य त्यांनी केले. मांडवा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून काम करीत असताना पर्यटकांची सुरक्षितता, आणि सागरी मार्गाने येणाऱ्या ये-जा करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षेवर अधिक भर दिला आहे. अजंठा बोट दुर्घटनामधील ७९ प्रवासी वाचवण्यामध्ये त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. त्यानंतर ते ठाणे ग्रामीण पोलीस दलातील गणेशपुरी पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असताना ग्रामीण भागातील नागरिकांची सुरक्षा राखण्याबरोबरच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सतत प्रयत्न केले. त्यानंतर ठाणे येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभागात कामे केले. २०२५ पासून ते नवी मुंबई येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक म्हणून रुजू झाले. आतापर्यंत त्यांनी १५ सापळा कार्यवाही करून २६ लाचखोरांविरोधात कारवाई केली आहे. त्यामध्ये वर्ग एकच्या अधिकाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात कार्यवाही केली आहे. अतिक्रमण उप आयुक्त नवी मुंबई महानगरपालिका, अपर जिल्हाधिकारी सिडको, जॉईंट सेक्रेटरी-शिक्षण विभाग, सहाय्यक आयुक्त जीएसटी विभाग यांच्याविरोधातदेखील लाच घेतल्याप्रकरणी कारवाई केली आहे. धर्मराज सोनके यांनी पोलीस दलामध्ये आतापर्यंत १६वर्षे सेवा केला आहे. या कालावधीत केलेल्या त्यांच्या कामगिरीची दखल केंद्र सरकारने घेऊन त्यांची उत्कृष्ट सेवा पदकासाठी निवड केली आहे.

## चालकांविरोधात कारवाई

**रायगड** : वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २३५ बेशिस्त चालकांविरोधात जिल्हा वाहतूक शाखेने कारवाई केली. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला झालेल्या कारवाईत २ लाख ३२ हजार ७०० रूपयाचा दंड वसूल करण्यात आला. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यात गेल्या आठ दिवसांपासून वाहतूक पोलिसांचा नाक्यानाक्यावर बंदोबस्त वाढवण्यात आला होता. हेलमेट नसणे, वाहन वेगात चालवणे, दारू पिऊन वाहन चालवणे अशा वेगवेगळ्या वाहतूकीचे नियम मोडणाऱ्या चालकांविरोधात शुक्रवारी दिवसभर ही कारवाई करण्यात आली.

# मृत्यूच्या दारातून तो परतला



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

विषारी सापाच्या दंशामुळे २६ वर्षीय तरुण मृत्यूशी झुंज देत होता. मात्र अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयातील डॉक्टरांच्या अथक प्रयत्नाने तो मृत्यूच्या दारेतून परतला.कित्येक तासांच्या उपचारानंतर तो बरा झाला असल्याची माहिती जिल्हा रुग्णालयाकडून देण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, ज्ञानेश्वर थळे असे या तरुणाचे नाव आहे. हा तरुण मुळचा पेणमधील रहिवासी आहे. नोकरी व्यावसायानिमित्त तो रोहा येथे राहत आहे. मागील पंधरा दिवसांपूर्वी सकाळी पाच वाजण्याच्या सुमारास त्याला मन्यार नावाच्या विषारी सापाने दंश केला होता. ही बाब तेथील स्थानिकाच्या लक्षात आल्यावर त्याला अधिक उपचारासाठी अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले होते. तरुणाची प्रकृती गंभीर होती. त्याला याला तातडीने अति दक्षता विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले. सापाच्या विषाचा प्रभाव त्याच्या शरीरावर झाला होता. श्वास घेणेदेखील त्याला कठीण झाले होते. अति दक्षता विभागात व्हेंटिलेटरवर तो होता. तो मृत्यूशी झुंज देत होता. जिल्हा सामान्य रुग्णालयातील जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार तातडीने उपचारामध्ये वेग घेण्यात आला. अति दक्षता विभागाचे प्रमुख डॉ. किरण वाघमारे, डॉ. वैभव पाटील, डॉ. किशोर सागपेल्लीवार यांनी प्रचंड मेहनत घेऊन त्याला मृत्यूच्या दारातून परत आणले. त्याची प्रकृती स्थीर झाली. मेडिसीन विभागाचे डॉ. धनंजय मानटे, अक्षय बंबटकर, डॉ. श्रीया पाटील व अति दक्षता विभागातील कर्मचारी यांच्या प्रयत्नामुळे त्या तरुणाला नवसंजीवनी मिळाली. तो सुखरूप असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. कित्येक तासांच्या प्रयत्नाबरोबरच उपचारानंतर तरुणाला वाचविण्यास डॉक्टरांना यश आले.

# गावोगावी घुमणार ढोलकीचा नाद

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

गणेशोत्सवाचे वेध लागले असून, बाप्पाच्या आगमनासाठी बाजारपेठांमध्ये लगबग सुरू झाली आहे. गणेशोत्सवातील पारंपरिक वाद्यांना मागणी वाढत असतानाच ढोलकी तयार करणारे कारागीरही कामोठे परिसरात दाखल झाले आहेत. सायन-पनवेल महामार्गावरील कामोठे पुलाखाली उत्तर प्रदेशातून आलेल्या सुमारे २० ते २२ कुटुंबांनी आपला संसार थाटला असून, गेल्या काही दिवसांपासून ढोलकी तयार करण्याचे काम सुरू आहे.

गणेशोत्सवाच्या काळात ढोल-ताशांसोबत ढोलकीलाही मोठी मागणी असते. त्यामुळे उत्सवाच्या पार्श्वभूमीवर या कारागिरांच्या हाताला काम मिळाले आहे. लहान मुलांसाठीच्या ढोलकीपासून मोठ्या आकाराच्या ढोलकीपर्यंत विविध प्रकार येथे तयार करण्यात येत आहेत.

ढोलकीचा आकार, बांधणी आणि प्रकारानुसार तिची किंमत ठरवली जाते. कामोठे येथे सुमारे २० रुपयांपासून ते एक हजार रुपयांपर्यंतच्या ढोलक्या विक्रीसाठी उपलब्ध आहेत. गणेशभक्त, गणेशोत्सव मंडळांचे कार्यकर्ते तसेच लहान मुलांकडून ढोलकी

- **गणेशोत्सवासाठी उत्तर प्रदेशातून कारागीर दाखल**
- **२० रुपयांपासून हजार रुपयांपर्यंत ढोलकी उपलब्ध**

खरेदीसाठीही गर्दी होऊ लागली आहे. ग्राहकांच्या मागणीनुसार काही कारागीर जागेवरच ढोलकी तयार करून देत आहेत.

पारंपरिक पद्धतीने हाताने ढोलकी तयार करण्याचे कौशल्य या कारागिरांकडे असून, अनेक वर्षांपासून गणेशोत्सवाच्या काळात ते उत्तर प्रदेशातून महाराष्ट्रात येतात. उत्सवाच्या काही दिवसांत मिळणाऱ्या उत्पन्नावर त्यांच्या कुटुंबांच्या वर्षभरातील आर्थिक गरजा मोठ्या प्रमाणात अवलंबून असतात.



**सुरक्षित जागेची अपेक्षा**

महामार्गालगत पुलाखाली सुरू असलेल्या या व्यवसायातून कुटुंबांचा उदरनिर्वाह सुरू आहे. मात्र, या कुटुंबांना सुरक्षित जागा, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# वाहतूक शाखेत सहा महिन्यांत चार अधिकारी

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

जिल्हा वाहतूक शाखेतील पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या बदलीनंतर सहा महिन्यांत चार अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामुळे जिल्हा वाहतूक शाखेला पूर्णवेळ अधिकारीच मिळाला नाही.

रायगड जिल्ह्यातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखा ही स्वतंत्र यंत्रणा आहे. पोलीस निरीक्षक यांच्या अधिपत्याखाली जिल्ह्यातील वाहतुकीची कारभार चालविला जातो. जिल्ह्यात साधारणतः ९० हून अधिक पोलीस कर्मचारी वाहतूक शाखेत आहेत. या शाखेमध्ये पोलीस निरीक्षक म्हणून अभिजीत भुजबळ हे गेल्या सहा महिन्यांपूर्वी होते. त्यांची बदली रसायनी पोलीस ठाण्यात केल्यावर जिल्हा वाहतूक शाखेचा भार सरिता चव्हाण यांच्याकडे सोपविण्यात आला होता. काही महिने या विभागाचा कारभार त्यांच्या हाती होता. त्यानंतर त्यांची बदली अन्य जिल्ह्यात झाली. त्यामुळे मुंबईतून रायगड पोलीस दलात दाखल झालेले अभय शेलार यांच्याकडे ही जबाबदारी सोपविण्यात आली. एक महिना त्यांनी या विभागाचा कारभार सांभाळल्यानंतर वादाच्या भोवऱ्यात सापडलेले रोह्याचे पोलीस निरीक्षक मारूती पाटील यांच्या जागी अभय शेलार यांची बदली करण्यात आली. त्यामुळे जिल्हा वाहतूक शाखेतील सहाय्यक पोलीस निरीक्षक लाड यांच्याकडे ही जबाबदारी दिली. मात्र आता पुन्हा लाड यांच्या जागी पोलीस निरीक्षक म्हणून मारुती आंधळे यांची बदली झाली आहे. त्यामुळे जिल्हा वाहतूक शाखेतील चार अधिकाऱ्यांच्या सहा महिन्यात बदल्या करण्यात आल्याची माहितीसमोर आली आहे.

गेल्या चार दिवसांपूर्वी आंधळे यांनी कारभार हाती घेतला आहे. सहा महिन्यामध्ये जिल्हा वाहतूक शाखेमध्ये पूर्णवेळ अधिकारीच प्राप्त झाला नसल्याचा परिणाम जिल्ह्यातील वाहतुकीवर झाल्याचे बोलले जात आहे.

पान १ वरून

## रायगडात देशभक्तीचा जल्लोष

ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. जिल्हा परिषदेच्या प्रांगणात अध्यक्ष मंगेश वाकडीकर याच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. नगराध्यक्षा अक्षया नाईक यांच्या हस्ते नगरपरिषदेच्या कार्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. तर पंचायत समिती, जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा कारागृह, जिल्हा न्यायालय, उपविभागीय व तहसील कार्यालय, पोलीस ठाणे, ग्रामपंचायत, प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच जिल्हा परिषद शाळांसह माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. यावेळी काही शाळांमध्ये देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण, विद्यार्थ्यांचा सन्मान, स्वातंत्र्य दिनानिमित्त रांगोळी, वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. तसेच, वेगवेगळ्या सामाजिक व सांस्कृतिक संघटनेच्यावतीने ऑर्केस्ट्राचे आयोजन केले. यावेळी देशभक्तीपर गीतांसह नृत्यांचे सादरीकरणाचा आनंद नागरिकांनी मनमुरादपणे घेतला. सकाळी साडेसात वाजल्यापासून सुरु झालेल्या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाच्या वेळी पावसाने हजेरी लावली. परंतु, त्याकडे दुर्लक्ष करीत अनेकांनी पावसात भिजत राष्ट्रध्वजाला सलामी दिली. यावेळी एक वेगळा उत्साह दिसून आला.

## तिसऱ्या मुंबई विरोधात शेतकरी एकवटले

घाट घातला आहे. या प्रकल्पामध्ये या तीन तालुक्यांतील हजारो एकर सुपीक शेतजमीन जाणार आहे. त्याचा शेतकऱ्यांना मोठा फटका बसणार आहे. प्रस्तावित प्रकल्पाबाबत शेतकऱ्यांना विश्वासात घेतले जात नाही. त्यामुळे एमएमआरडीए केएससी नवनगर तिसरी मुंबई विरोधी शेतकरी संघर्ष समितीच्यावतीने या प्रकल्पाच्या विरोधात कोकण भवन येथील आयुक्त कार्यालयाच्या बाजूला लाक्षणिक उपोषण शनिवारी पुकारले. या प्रस्तावित प्रकल्पाला शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शविला असल्याचे रुपेश पाटील यांनी सांगितले. शनिवारी पुकारण्यात आलेल्या उपोषणामध्ये हजारोच्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. दरम्यान, आयुक्त कार्यालयापर्यंत लाँग मार्च काढण्यात आला. दरम्म्यान, "तिसरी मुंबई रद्द करा" अशी घोषणा देत सरकारविरोधात नाराजी व्यक्त केली.

यावेळी एमएमआरडीए के.एस.सी. नवनगर तिसरी मुंबई विरोधी समिती रायगडचे अध्यक्ष सुधाकर पाटील, कार्याध्यक्ष संतोष ठाकूर, सरचिटणीस रुपेश पाटील, एमएमआरडीए तिसरी मुंबई विरोधी ८८ गाव संघर्ष समितीचे अध्यक्ष अनंत पाटील, कार्याध्यक्ष ॲड.विकास म्हात्रे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हा प्रमुख माजी आ. मनोहर भोईर, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष डॉ. मनीष पाटील, पंचायत समिती सभापती महेश म्हात्रे, शेकाप तालुका चिटणीस रवी घरत, जिल्हा परिषद सदस्य ॲड. अविनाश ठाकूर, पंचायत समिती सदस्य कविता पाटील, प्रारंभी गावंड, दीपक भोईर, महेंद्र ठाकूर, सुरेश पाटील, रमाकांत पाटील, बी.एन. डाकी, विनोद म्हात्रे, कृष्णा पाटील, सत्यवान भगत, प्रकाश पाटील, गोपाळ जोशी, रश्मिता पोपेटा व उपोषणकर्ते, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आधारवरील नाव बदलाची प्रक्रिया ठप्प

नावात तफावत असल्यास कागदपत्र पडताळणीच्या वेळी अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याने उमेदवारांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या समस्येबाबत नागरिकांकडून संबंधित विभागाला ई-मेलद्वारे वारंवार तक्रारी करण्यात येत आहेत. ग्राहक सेवा केंद्रावर दूरध्वनीद्वारे तक्रारी करूनही ठोस माहिती किंवा समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचा नागरिकांचा आरोप आहे.

## व्यसनमुक्तीसाठी नगराध्यक्षांचा निर्धार

महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांच्या सहकार्याने धूम्रपान व तंबाखूविरोधी रॅली, पथनाट्ये, जनसंवाद आणि सामूहिक प्रतिज्ञा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे, तसेच सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे संकेत नगराध्यक्षा अक्षया नाईक यांनी दिले. १५ सप्टेंबरपर्यंत अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत शहरातील चहाच्या टपऱ्या, पानटपऱ्या, हॉटेल्स, बसस्थानके तसेच इतर गर्दीच्या सार्वजनिक ठिकाणी तंबाखूविरोधी जनजागृती करणारे पोस्टर्स लावण्यात येणार आहेत. सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे संकेत देत नागरिकांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन नाईक यांनी केले. आजची तरुण पिढी हेच देशाचे उज्ज्वल भविष्य आहे. व्यसनमुक्त युवक, स्वच्छ शहर आणि हरित पर्यावरण हीच खरी स्वातंत्र्याची ताकद आहे. अलिबागला पर्यटकांसाठी अधिक स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी शहर बनविण्यासाठी नगर परिषद सातत्याने प्रयत्नशील राहील, असे अक्षया नाईक यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, मुख्याधिकारी सागर साळुंखे, सभापती अनिल चोपडा, नगरसेवक अश्विनी ठोसर, निवेदिता वाघमारे, ॲड. ऋषिकेश माळी, सागर भगत, योजना पाटील, शैला भगत, प्रदीप नाईक, आनंद पाटील, जमाल सय्यद, अंकित बंगेरा, संदीप पालकर आणि श्वेता पालकर यांच्यासह नागरिक, विद्यार्थी, शिक्षक आणि अलिबाग नगर परिषदेचे अधिकारी,कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वंदे मातरम काँग्रेसचीच संस्कृती

नाही. मल्लिकार्जुन खर्गे यांना उभं राहण्याचा त्रास आहे. त्या अनुषंगाने सोनियाजी सूचना देत आहेत. आपण पाहिलेले आहे की, या अगोदर ही खर्गे साहेब यांना उभ राहावे लागले होते, त्यावेळी त्यांना त्रास झाला होता. त्यामुळे वंदे मातरमच्या आडून असे करण हे त्यांना (भाजपला) अशोभनीय आहे, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. तसेच, "वंदे मातरम" काँग्रेसचीच संस्कृती आहे. काँग्रेसच्या प्रत्येक अधिवेशनाची सुरवात वंदे मातरम ने होते. वंदे मातरम हा काँग्रेसचा मंत्र आहे. त्यामुळे भाजप, आरआरएस, विश्व हिंदू परिषद, हिंदू महासभेने आम्हाला शहाणपणा शिकवू नये, असेही ते म्हणाले.

## पृथ्वीराज चव्हाणांचा गौप्यस्फोटाने खळबळ

करण्याची अट घातली होती, मंत्रीपद द्या अन्यथा नागपूरचे दोघे मला निवडून येऊ देणार नाहीत, असेही गोपीनाथ मुंडेंनी त्यावेळी म्हटल्याचा गौप्यस्फोट पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. सोनिया गांधी यांनी गोपीनाथ मुंडेंच्या पक्षप्रवेशाला परवानगी दिली, मात्र तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग विरोधी पक्षातला खासदार आपल्याकडे घेऊन मंत्री करणार नाही, अशी भूमिका घेतल्याने त्यांचा प्रवेश झाला नाही, असा खुलासा देखील त्यांनी केला.

## स्वातंत्र्य दिन साजरा न केल्याचा आरोप

कार्यक्रमाबाबत प्रशासनाकडून योग्य ती कार्यवाही झाली नसल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. या प्रकरणात केवळ तोंडी चौकशी न करता ग्रामपंचायतीचे अधिकृत अभिलेख तपासण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. त्यामध्ये स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमासंदर्भातील ठराव, आदेश, उपस्थिती नोंद, ध्वजारोहणाची नोंद, उपलब्ध छायाचित्रे व व्हिडिओ तसेच कार्यक्रमासाठी झालेल्या खर्चाची बिले व व्हाउचर तपासावीत, असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तसेच, याप्रकरणी बीडीओंना सर्व हकीकत सांगितली. मात्र, त्यांनी दुर्लक्ष केल्याचा आरोपदेखील सचिन पाटील यांनी केला आहे.

# काम करणाऱ्या महिलेने दागिने चोरले

। पनवेल । प्रतिनिधी ।

घरी काम करणाऱ्या महिलेने सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विवेक कुमार मिश्रा यांच्या पत्नीने कपाटाची पाहणी केली असता कपाटात दागिने आणि सोने सापडून आले नाही. सोन्याचे झुमके मंगळसूत्र, सोन्याचे भांग, नथ, झुमके आणि रोख रक्कम महिलेने चोरून नेले.

# जिल्ह्यात भारत मातेचा जयघोष

रायगड जिल्ह्यामध्ये शनिवारी (दि.१५) भारतीय स्वातंत्र्याचा ८० वा स्वातंत्र्य दिन ठिकठिकाणी साजरा करण्यात आला. अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासह अनेक शासकीय कार्यालयाच्या ठिकाणी ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयात, रायगड जिल्हा परिषदेच्या प्रांगणात, जिल्हा सामान्य रुग्णालयमधील पटांगणात ध्वजारोहण उत्साहात करण्यात आले. तर जिल्ह्यातील पंचायत समिती, पोलीस ठाणे, पोलीस अधीक्षक कार्यालय, वन विभाग, जिल्ह्यातील शाळा, ग्रामपंचायत, महाविद्यालयांमध्ये सुद्धा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रध्वजाला सलामी देण्यात आली. काही ठिकाणी देशभक्तीपर कार्यक्रम तर काही ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.



● स्वातंत्र्य दिनानिमित्त अलिबाग पोलीस परेड मैदानावर पोलीस दलाच्या वतीने संचलन करण्यात आले.

## पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या वेश्वी संकुलात स्वातंत्र्य दिन साजरा



| अलिबाग | प्रतिनिधी |

भारतीय स्वातंत्र्याच्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त रायगड जिल्ह्यात विविध ठिकाणी उत्साहात ध्वजारोहण समारंभ पार पडला. यानिमित्त पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या ग्रामीण भागातील विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये सामाजिक, शैक्षणिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या संकुलातही स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. पीएनपी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका रिना म्हात्रे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्रशासन अधिकारी गबाजी गीते, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक निलेश मगर, पीएनपी होली चाईल्ड सीबीएसई शाळेच्या मुख्याध्यापिका वेल्लईम्मल्ल वेणी, होली चाईल्ड स्टेट बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले, पीएनपी कॉलेजचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, प्राचार्य रविंद्र पाटील, बी.एड. कॉलेजच्या प्रा. रुतिषा पाटील, महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे, जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक, क्रीडा प्रशिक्षक तेजस म्हात्रे, अक्षय डाकी यांच्यासह इतर मान्यवर, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर आकर्षक नृत्याविष्कार सादर केला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण पीएनपी संकुलात देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करत देशाच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचा संकल्प केला.

## नेरळमध्ये मध्यरात्रीच्या ध्वजारोहणास प्रचंड गर्दी



| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावरील नेरळचे माथेरान नाका येथे असलेल्या हुतात्मा चौकात देशाचा स्वातंत्र्य दिन तिरंगा झेंडा फडकावून साजरा झाला. अग्निवीर सिद्धी क्षीरसागर यांचे हस्ते तिरंगा फडकवला गेला तर रात्री साडे अकरा वाजता तरुणांनी मशाल फेरी काढून स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला अभिवादन केले.

हुतात्मा चौक येथे हुतात्मा स्मारक समितीच्या वतीने २२ व्या वर्षी स्वातंत्र्यदिनानिमित्त मध्यरात्री ध्वजारोहण कार्यक्रमा आयोजित केला होता. यावेळी देशप्रेमी तरुणांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी झेंडा फडकवण्याच्या आधी मशाल फेरी काढण्यात आली. हुतात्मा चौक येथून निघालेली मशाल फेरी नेरळ गावातून पुन्हा हुतात्मा चौकात आली. त्यानंतर १२ वाजून ३ मिनिटांनी राष्ट्रीय झेंडा फडकावून स्वातंत्रदिन साजरा करण्यात आला. यावेळी अग्निवीर सिद्धी क्षीरसागर यांच्या हस्ते तिरंगा फडकवण्यात आला. या कार्यक्रमात दहावीमध्ये नेरळ परिसरात प्रथम आलेली सायली मुंढे हिचा विशेष सत्कार करण्यात आला. तर छत्रपती शिवरायांचे सर्व गड किल्ले पादाक्रांत करणारे जनार्दन पानमंद यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी अग्निवीर सिद्धी क्षीरसागर यांनी आपण दोन वर्षे मेहनत घेतली आणि भारतीय लष्करात सहभागी होत आहे. आपल्या गावातील जास्तीत जास्त तरुणांनी भारतीय सेनादलात सहभागी होण्यासाठी पुढे यावे असे आवाहन केले.

याप्रसंगी पोलीस अधिकारी राहुल वरोटे, सुनिता मोरे, भगवान चंचे, निवृत्त जवान कुमार जाधव, अर्जुन शिंदे, तसेच नेरळ परिसरातील विविध राजकीय पक्षांचे प्रमुख तसेच सामाजिक संस्थाचे प्रतिनिधी, राजेश भगत, संजय गवळी, विशाल साळुंखे, भाऊ क्षीरसागर, किसन शिंदे, बंडू क्षीरसागर, डॉ हेमंत शेवाळे तसेच अनेक डॉक्टर या यांच्यासह महिला तरुण आणि लहान मुले उपस्थित होते. स्मारक समितीचे संतोष पेरणे, दर्वेश पालकर, किशोर गायकवाड, रामदास माळी, बंटी शिर्के, महेश भगत, संदेश साळुंके, आदी सदस्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप बोरसे यांनी केले.

## श्रीवर्धन जय भवानी, जय शिवाजीच्या गर्जनेने दुमदुमले



| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून श्री शिवप्रतिष्ठान श्रीवर्धन (रायगड) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली भव्य भगवा ध्वज व तिरंगा ध्वज प्रभात फेरीफ अत्यंत भक्तीमय, उत्साहपूर्ण आणि देशभक्तीच्या वातावरणात मोठ्या दिमाखात संपन्न झाली.

शनिवार (दि .१५) ऑगस्ट रोजश्री गणेश मंदिर येथून या भव्य प्रभात फेरीचा प्रारंभ झाला. सर्व धारकरी आणि नागरिक पारंपरिक वेषात, डोक्यावर वारकरी टोपी परिधान करून या फेरीत उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. हातात डौलाने फडकणारा तिरंगा ध्वज आणि भगवा ध्वज, सोबतच जय भवानी, जय शिवाजीच्या वीरश्री युक्त घोषणांनी संपूर्ण श्रीवर्धन शहर दुमदुमून गेले. या प्रभात फेरीत शहरातील नागरिक आणि श्री शिवप्रतिष्ठानचे धारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गणपती मंदिरापासून सुरू झालेली ही प्रभात फेरी सोमजाई मंदिर, गंद्रे नाका, केळस्कर पाखाडी, ओजाळे पाखाडी, जिवनेश्वर पाखाडी, शंकराचे देऊळ, विठ्ठल आळी, नारायण पाखाडी या मार्गाने मार्गक्रमण करत पुन्हा गणपती मंदिरात येऊन येथे तिचा समारोप करण्यात आला.



● नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे सीईओ कॅप्टन बी. व्ही. जे. के. शर्मा आणि सीआयएसएफचे मुख्य विमानतळ सुरक्षा अधिकारी सुनीत शर्मा यांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विमानतळाचे नेतृत्व, कर्मचारी आणि विविध भागधारक मोठ्या अभिमानाने उपस्थित होते.



○ शिळफाटा येथील सह्याद्री विद्यालयात स्वातंत्र्यदिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष संजय पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थी व मान्यवर उपस्थित होते. (छायाचित्र : संतोषी म्हात्रे )

## मातृभाषेतील ज्ञान चिरकाल टिकते

### विनायक थळकर यांचे प्रतिपादन



| चौल | प्रतिनिधी |

मराठी माध्यमाच्या शाळांमधून मातृभाषेत घेतलेले ज्ञान चिरकाल टिकते, असे प्रतिपादन माजी केंद्रप्रमुख विनायक थळकर यांनी केले. चौलमळा येथील प्राथमिक शाळेत भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण सोहळा पार पडला. यावेळी ते बोलत होते. मराठी शाळा पटसंख्येअभावी बंद पडत असल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. मराठी शाळांमध्ये मुलांवर चांगले संस्कार बिंबवण्याचे काम होते. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांना मराठी शाळेत शिकवावे, असे आवाहनही थळकर यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात ‘वंदे मातरम’ या राष्ट्रीय गीताने झाली. त्यानंतर चौलमळा गावचे माजी अध्यक्ष अनंत म्हात्रे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तिरंग्याला सलामी देत राष्ट्रगीताचे गायन करण्यात आले. त्यानंतर राज्यगीत व प्रतिज्ञा घेण्यात आली. मुलांना व उपस्थित ग्रामस्थांना चॉकलेट आणि खाऊचे वाटप करण्यात आले.यावेळी चौल विभागाचे केंद्रप्रमुख राजेश पाटील, माजी केंद्रप्रमुख विनायक थळकर, चौलमळा गावचे उपाध्यक्ष जितेंद्र पाटील, माजी अध्यक्ष अनंत म्हात्रे, अनंत घरत, किशोर घरत, अनिल नाईक, जयंत नाईक, अनंत नाईक, अजित नाईक, शैलेश नाईक, राजेंद्र नाईक, सुशांत शिवलकर, जितेंद्र नाईक, अमित नाईक, सेवानिवृत्त शिक्षिका विनिता थळकर, रंजना नाखरे, अंगणवाडी सेविका अस्लेषा लोहार, प्रमिला पाटील, शालिनी नाईक, सिद्धी शिवलकर आदी उपस्थित होते. प्रास्ताविक केंद्रप्रमुख राजेश पाटील यांनी, तर आभार रंजना नाखरे यांनी मानले.

## यु.ई.एस. स्कूलमध्ये जल्लोष



| उरण | प्रतिनिधी |

यु. ई. एस. स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स ॲण्ड कॉलेजमध्ये भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिवस मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात वंदे मातरम राष्ट्रगीताने झाली. याप्रसंगी चंद्रकांत ठक्कर, मिलिंद पाडगांवकर, ॲड. अपूर्वा ठाकूर, प्रा. डॉ. मिनाक्षी गुप्ता, स्कूल व प्रा. सिमरन दहिया, तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका, पालक उपस्थित होते.

## छत्रपती संभाजी महाराज मैदानावर राष्ट्रध्वजास सलामी



| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने ८० वा स्वातंत्र्यदिन शनिवारी छत्रपती संभाजी महाराज मैदानावर देशभक्तीच्या वातावरणात पार पडला. यावेळी उपस्थित मान्यवर आणि नागरिकांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. याप्रसंगी महानगरपालिका आयुक्त, उपमहापौर, सभापती, नगरसेवक, अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. पनवेल शहरातील नागरिक, महिला आणि लहान मुलांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहत स्वातंत्र्यदिनाचा उत्साह वाढविला. याप्रसंगी पनवेल शहर पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा दल तसेच अग्निशमन दलाने सहभाग नोंदविला होता.







● अलिबाग तालुक्यातील आक्षी ग्रामपंचायतसह येथील मराठी शाळेत व शंकर मंदिराजवळ मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी आक्षी ग्रामपंचायतीच्या सरपंच रश्मी पाटील यांच्यासह सदस्य, ग्रामसेवक, पोलीस पाटील, कर्मचारी, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## काकळघर विद्यालयात वृक्षारोपण

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

स्वातंत्र्य दिनाच्या पुर्वसंध्येला पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांच्या प्रेरणेतून मुरूड तालुक्यातील काकळघर पीएनपी माध्यमिक विद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. दिलीप रोहेकर, ॲड. सुरेश नांदगावकर, प्रदीप जाधव यांच्या मार्गदर्शन विद्यालयाच्या प्रांगणात २५ वृक्षांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमास संतोष कांबळी, सिताराम ठाकूर, ॲड. सुरेश नांदगावकर, मनोज सुर्वे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ तसेच विद्यार्थी उपस्थित होते.



## जेएनपीएमध्ये देशभक्तीचा जागर



उरण : भारतातील सर्वात मोठ्या कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणात (जेएनपीए) शनिवार (दि.१५) रोजी ८० वा स्वातंत्र्यदिन देशभक्ती आणि अभिमानाच्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाल, भा. प्र. से., प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी जेएनपीएचे उपाध्यक्ष रवीश कुमार सिंह, भा. रे. या. से., केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलचे कमांडंट, जेएनपीएचे बोर्ड सदस्य, विविध विभागांचे प्रमुख, अधिकारी-कर्मचारी तसेच केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलचे अधिकारी उपस्थित होते.स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्याची सुरुवात जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाल, भा. प्र. से. यांच्या हस्ते ध्वजारोहणाने करण्यात आली. त्यानंतर राष्ट्रगीत आणि सामूहिक गायन करण्यात आले. या देशभक्तीपर वातावरणाने उपस्थितांच्या मनात राष्ट्राभिमानाची भावना अधिक दृढ करत एकता आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश अधोरेखित केला.

## क्रीडा संकुल मैदानावर स्वातंत्र्यसैनिकांची उपस्थिती

खांदा कॉलनी : पनवेलच्या क्रीडा संकुल मैदानावर ८० वा स्वातंत्र्यदिन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. पनवेल प्रांत विभागाच्या वतीने स्वातंत्र्यदिनाची जय्यत तयारी करण्यात आली होती. प्रांताधिकारी पवन चांडक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत स्वातंत्र्यदिनाचा अभिमान व्यक्त केला. या सोहळ्यास पनवेल पंचायत समितीचे सभापती, तहसीलदार, विविध विभागांचे अधिकारी, मान्यवर, स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, महिला कर्मचारी, नगरसेवक तसेच पनवेलमधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष स्वातंत्र्यदिन सोहळ्यात तृतीयपंथीय नागरिकांचीही विशेष उपस्थिती होती. त्यामुळे समावेशकतेचा संदेश देणाऱ्या या सहभागाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. स्वातंत्र्यदिनानिमित्त क्रीडा संकुल मैदानावर स्वातंत्र्यसैनिक आणि माजी सैनिकांच्या उपस्थितीमुळे सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले.



## निवडक



### विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप

**खांब :** रोहा तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा अध्यक्ष तथा समाजसेवक विशाल लाड यांच्या पुढाकाराने पढवण-वाली पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमिक विद्यालय पढवण येथील विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वाटप करण्यात आले. माजी विद्यार्थी म्हणून आपल्या शाळेशी असलेले नाते जपत लाड यांनी हा उपक्रम राबविल्याने त्यांचे कौतुक होत आहे. या कार्यक्रमाला तळा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक दराडे, संस्थाध्यक्ष नानासाहेब भौड, खजिनदार साधुराम पिंपळे, बांधकाम सभापती जनार्दन भौड, मुख्याध्यापक संजीव शेरमकर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविकात मुख्याध्यापक संजीव शेरमकर यांनी विशाल लाड यांच्या दातृत्वाचे आणि सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. माजी विद्यार्थी म्हणून त्यांनी शाळेसाठी घेतलेला पुढाकार विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. संस्था बांधकाम सभापती जनार्दन भौड यांनी विविध उदाहरणे देत लाड यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. पोलीस उपनिरीक्षक दराडे यांनी विद्यार्थ्यांनी विशाल लाड यांच्या सामाजिक कार्यातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. तसेच मोबाईलचा योग्य वापर, शालेय शिस्त आणि क्रीडा याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



### लायन्स क्लबचा शपथविधी सोहळा

**मुरूड :** मुरुड तालुक्यातील बोर्ली येथे लायन्स क्लब मुरुड-जंजिराच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण व शपथविधी सोहळा उत्साहात पार पडला. मावळते अध्यक्ष सनी सोगावकर यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष सी.एम. ठाकूर यांच्याकडे पदभार सोपविला. माजी जिल्हा प्रांतपाल संजीव सूर्यवंशी यांच्या हस्ते नूतन अध्यक्षांचा पदग्रहण सोहळा पार पडला.यावेळी खजिनदारपदी मकरंद कर्णिक, तर सचिवपदी साजिद शेख यांची निवड करण्यात आली. लायन्स क्लब ग्लोबल सर्व्हिस टीमचे जिल्हाध्यक्ष अनिल म्हात्रे यांनी नूतन कार्यकारिणी व सदस्यांना मार्गदर्शन करून पदाधिकारी व सदस्यांना शपथ दिली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने ग्लोबल सर्व्हिस टीमच्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत वह्या व छत्र्यांचे वाटप करण्यात आले. तसेच शाळांसाठी वैद्यकीय साहित्य संच देण्यात आले. यावेळी लायन्स क्लब अलिबागचे माजी अध्यक्ष प्रदीप नाईक, ला. अविनाश घरत, जिल्हा सचिव नयन कवळे, ला. महेंद्र पाटील, ला. विजय वनगे, श्रुती पालवणकर, नथुराम कांबळी, भारत मोती, रवींद्र भोवर यांच्यासह लायन्स क्लबचे पदाधिकारी, सदस्य आणि मान्यवर उपस्थित होते.



(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

### रखडलेल्या मोरीच्या कामाला अखेर सुरुवात

**आगरदांडा :** मुरूड येथील तवसाळकर लॉजसमोरील रस्त्यावर रखडलेल्या मोरीच्या कामाला अखेर सुरुवात झाली आहे. मुरूड पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाने पाच दिवसांपूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन देऊन काम तातडीने सुरू करण्याची मागणी केली होती. या निवेदनाची दखल घेत संबंधित ठेकेदाराने मोरीचे काम पुन्हा हाती घेतले आहे. सुमारे अडीच महिन्यांपूर्वी या मोरीच्या कामाला सुरुवात करण्यात आली होती. मात्र मोरीची एक बाजू तयार केल्यानंतर दुसऱ्या बाजूचे काम अपूर्ण ठेवून काम बंद करण्यात आले होते. त्यातच सातत्याने सुरू असलेल्या पावसामुळे या ठिकाणी पाणी साचत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. वाहनचालक तसेच पादचाऱ्यांना ये-जा करताना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. नागरिकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला होता. या समस्येची दखल घेत पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते अरविंद गायकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांना निवेदन दिले. मोरीचे रखडलेले काम तातडीने सुरू करण्याची मागणी करत, १५ ऑगस्टपूर्वी काम सुरू न झाल्यास रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला होता. या निवेदनाची दखल घेत ठेकेदाराने अखेर मोरीच्या कामाला सुरुवात केली. काम सुरू झाल्याने परिसरातील नागरिकांनी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर, उपाध्यक्ष देवेंद्र सतविडकर आणि शैलेश वारेकर यांचे आभार मानले आहेत. मोरीचे काम पूर्ण झाल्यानंतर पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत होऊन परिसरातील नागरिक तसेच वाहनचालकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

### १४ स्थानके मध्य रेल्वेकडे हस्तांतरित

**नवी मुंबई :** सिडको प्रशासनाच्या ताब्यात असलेल्या रेल्वे स्थानकांची देखभालीअभावी पार दुरवस्था झाली होती. यामुळे रेल्वे प्रवाशांची मोठी गैरसोय होत होती. खा. नरेश म्हस्के यांनी ही समस्या सोडविण्यासाठी सिडको, मध्य रेल्वे प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या होत्या. तसेच केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली होती. स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला नवी मुंबई येथील सिडकोच्या अखत्यारीतील ट्रान्स हार्बर आणि हार्बर लाईनवरील उर्वरित १४ रेल्वे स्थानके मध्य रेल्वे प्रशासनाकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या हस्तांतरणामुळे आता स्थानकांवरील प्रवासी सुविधा, स्वच्छता, दुरुस्ती आणि व्यवस्थापन अधिक सक्षमपणे होणार असून नवी मुंबई व ठाणे मतदारसंघातील लाखो प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. एकूण १७ स्थानकांपैकी ३ स्थानके यापूर्वीच जून २०२६ मध्ये हस्तांतरित करण्यात आली होती, तर आज उर्वरित १४ स्थानकांची हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्याने आता या सर्व स्थानकांचा कारभार पूर्णपणे मध्य रेल्वे प्रशासनाकडे गेला आहे. हस्तांतरित झालेली १४ रेल्वे स्थानके : १. वाशी, २. सानपाडा, ३. जुईनगर, ४. नेरूळ, ५. सीवूड्स-दारावे, ६. बेलापूर, ७. ऐरोली, ८. रबाळे, ९. घणसोली, १०. कोपरखैरणे, ११. तुर्भे, १२. खांदेश्वर, १३. मानसरोवर, १४. खारघर.

# सफाई कामगारांच्या वारसांना नोकरी

## • महाविकास आघाडीच्या पाठपुराव्याला यश •उरण नगरपालिका प्रशासनाचा निर्णय

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या उरण नगरपालिकेतील सफाई कामगारांच्या वारसांच्या नोकरीचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. कामगार संघटनेचा सातत्यपूर्ण पाठपुरावा, न्यायालयीन लढा आणि महाविकास आघाडीच्या नगराध्यक्षांसह नगरसेवकांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले असून, वारसा हक्क योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या १९ उमेदवारांना सफाई कर्मचारी पदावर नोकरी देण्यात आली आहे.



सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या आदेशानंतर नगरपालिका प्रशासनाने १९ वारसांना सेवेत सामावून घेतले. गुरुवारी, दि. १३ रोजी या सर्वांनी सफाई कर्मचारी पदावर अधिकृतपणे रुजू होत सेवेला सुरुवात केली.

सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नोकरी मिळावी, यासाठी गेल्या दोन वर्षांपासून संघर्ष सुरू होता. राज्यातील सफाई कामगारांच्या वारसांच्या नियुक्तीबाबत न्यायालयीन आदेश झाल्यानंतर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागानेही नगरपालिका प्रशासन संचालनालयाला आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले होते.

यानंतर म्युनिसिपल एम्प्लॉइज युनियनचे अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर, कार्याध्यक्ष संतोष पवार आणि सरचिटणीस अनिल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्तीसाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

महाविकास आघाडीचे नगरसेवक गणेश शिंदे, अतुल ठाकूर, प्रमिला पवार आणि मंगेश कासारे यांनीही सर्वसाधारण सभेत हा प्रश्न उपस्थित करून सफाई कामगारांच्या वारसांच्या बाजूने भूमिका मांडली.

नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनीही वरिष्ठ कार्यालयाशी पत्रव्यवहार करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार नगरपालिका प्रशासन संचालनालयाशी पत्रव्यवहार करण्यात आला. तसेच आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नोकरी देण्याबाबतची अडचण दूर करण्याची मागणी करण्यात आली.

संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यासोबतच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर नगरपालिका प्रशासन संचालनालयाने अखेर १९ वारसांना सेवेत सामावून घेण्याचे आदेश दिले. या निर्णयामुळे गेल्या दोन वर्षांपासून नोकरीच्या प्रतीक्षेत असलेल्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# रोठ खुर्द-वरसे पुलाचा कठडा धोकादायक

## मोठमोठी भगदाडे, अपघाताची टांगती तलवार

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोहा-कोलाड मार्गावरील रोठ खुर्द व वरसे दरम्यानच्या पुलाच्या कठड्याला मोठमोठी भगदाडे पडल्याने हा पूल सध्या धोकादायक स्थितीत आला आहे. कठड्याची झालेली झीज पाहता तो कधीही कोसळण्याची शक्यता निर्माण झाली असून, या मार्गावरील हजारो प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



अलिबाग-रोहा परिसराला मुंबई-गोवा महामार्गाशी जोडणारा हा महत्त्वाचा मार्ग असल्याने या रस्त्यावर दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. दररोज हजारो कामगार या मार्गाने धाटाव एमआयडीसीसह विविध ठिकाणी ये-जा करतात. त्याचबरोबर मोठ्या संख्येने चारचाकी, दुचाकी, मालवाहू वाहने आणि इतर वाहनांची वर्दळ सुरू असते.

विशेष म्हणजे, पुलालगतच रोठ खुर्द गाव असून, शाळाही जवळच आहे. त्यामुळे शाळकरी मुले, ग्रामस्थ आणि पादचारी यांचीही या परिसरात मोठी वर्दळ असते. अशा परिस्थितीत पुलाच्या कठड्याला पडलेली मोठी भगदाडे दुर्लक्षित करणे धोकादायक ठरू शकते. या पुलाच्या कठड्याची सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने पाहणी करून धोकादायक भागाची दुरुस्ती व मजबुतीकरण करावे, अशी मागणी स्थानिक नागरिक, वाहनचालक आणि दररोज या मार्गाने प्रवास करणाऱ्या कामगारांकडून जोर धरू लागली आहे. हजारो कामगार, शाळकरी मुले आणि लाखो वाहनांची वर्दळ असलेल्या या मार्गावरील धोकादायक पुलाचा कठडा कधी दुरुस्त होणार? याकडे आता रोठ खुर्दसह परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# भूमीपुत्रांच्या रोजगारासाठी सुधाकर घारेंचा एल्गार

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यात उद्योगांसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात आल्या असताना त्याच जमिनीवर उभारलेल्या उद्योगांमध्ये स्थानिक भूमीपुत्रांना रोजगारापासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांनी केला आहे. स्थानिकांना रोजगार मिळावा, यासाठी मोठे आंदोलन उभारण्याचा इशाराही त्यांनी दिला.

खालापूर तालुक्यात नव्याने सुरू झालेल्या गोदरेज कंपनीत स्थानिकांना नोकरी मिळावी, यासाठी ग्रामपंचायतीत ठराव करण्यात आला होता. मात्र, स्थानिक तरुणांना रोजगार न देता बाहेरील मनुष्यबळाला प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप घारे यांनी केला. कंत्राटी पद्धतीमुळे स्थानिक तरुणांच्या रोजगाराच्या संधी हिरावल्या जात असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

तालुक्यातील शेतकऱ्यांनी उद्योगांसाठी आपल्या जमिनी दिल्या आहेत. त्यामुळे या जमिनीवर उभ्या राहणाऱ्या उद्योगांमध्ये स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार आणि कामाचे ठेके मिळणे अपेक्षित आहे. मात्र, स्थानिकांना डावलले जात असल्याने तरुणांमध्ये नाराजी आहे.

# ऑनलाईन गेमिंगच्या नादात सव्वा कोटींचा गंडा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील विंधणे येथील धाकटी जुई गावातील २६ वर्षीय वाणिज्य शाखेचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्याने ऑनलाईन गेमिंगच्या नादात तब्बल १ कोटी २७ लाख ३१ हजार २०२ रुपये गमावल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी तरुणाने नवी मुंबई सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी 'खेलो२४मॅच' या ऑनलाईन गेमिंग प्लॅटफॉर्मच्या संचालक, व्यवस्थापक, ग्राहक प्रतिनिधी तसेच या प्रकाराला सहकार्य करणाऱ्या संबंधितांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

धाकटा जुई राहणाऱ्या तरूणाकडे वाहतूक व्यवसायासोबत जमीन विक्रीतून आलेली मोठी रक्कम होती. त्यामुळे ऑक्टोबर २०२४ ते जुलै २०२६ या कालावधीत हा तरुण ऑनलाईन गेमिंगच्या संपर्कात आला. संबंधित संकेतस्थळ नोंदणीकृत असल्याचा समज झाल्यानंतर त्याने त्यावर नोंदणी केली. संकेतस्थळावर तीनपत्ती, कॅसिनो आणि इतर ऑनलाईन गेम उपलब्ध असल्याचे त्याला दिसले. गेमिंग कंपनीच्या प्रतिनिधीने केलेल्या मार्गदर्शनानुसार तरुणाने एकूण १ कोटी २७ लाख ३१ हजार २०२ रुपये संबंधित कंपनीच्या खात्यात जमा केले. मात्र, त्यानंतर या व्यवहाराबाबत संशय निर्माण झाल्याने त्याने पोलिसांकडे तक्रार केली.

# लीलावती सोनवणे यांचे निधन

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

मोहोपाडा येथील लीलावती रमेश सोनवणे यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ७५व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाचे



वृत्त समजताच नातेवाईक, आप्तेष्ट व परिचितांनी अंत्यदर्शनासाठी मोठी गर्दी केली. मोहोपाडा येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. कै. लीलावती सोनवणे यांच्या दशक्रिया विधीचा कार्यक्रम गुरुवार, दि. २० ऑगस्ट रोजी सकाळी ८.३० वाजता श्रीक्षेत्र गुळसुंदे येथे होणार आहे. तसेच गंधमुक्ती व उत्तरकार्याचा विधी मोहोपाडा येथील त्यांच्या निवासस्थानी होणार आहे.

# रंजना वासकर यांची खालापूर थेरपी सेंटरला भेट

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

खालापूर पंचायत समिती विभागातील तालुका संसाधन कक्ष व थेरपी सेंटरला पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वासकर व उपसभापती भूपेंद्र पाटील यांनी भेट देऊन सेंटरच्या कामकाजाची पाहणी केली. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या या थेरपी सेंटरमधून तालुक्यातील जवळपास ८० विद्यार्थी लाभ घेत असून, उपचार व मार्गदर्शनामुळे अनेक विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल झाल्याचे यावेळी निदर्शनास आले आहे.



खालापूरमध्येच थेरपी सेंटर उपलब्ध असल्याने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांना उपचारासाठी मुंबई अथवा पुणे येथे जाण्याची गरज भासत नाही. विशेष म्हणजे, या सेंटरमध्ये विद्यार्थ्यांना मोफत थेरपी दिली जात असल्याने पालकांवरील आर्थिक भारही कमी झाला आहे. बाहेरील ठिकाणी खासगी स्वरूपात थेरपीसाठी मोठा खर्च करावा लागतो. त्यामुळे ग्रामीण भागातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी खालापूरचे हे सेंटर उपयुक्त ठरत असल्याचे रंजना वासकर यांनी सांगितले.

पनवेल पंचायत समितीच्या माध्यमातूनही लवकरच अशाच प्रकारचे थेरपी सेंटर सुरू करण्याचा प्रयत्न असून, पनवेल तालुक्यातील दिव्यांग विद्यार्थी व नागरिकांना त्याचा जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यात येईल, असे सभापती रंजना वासकर यांनी यावेळी सांगितले. यावेळी खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे, उपसभापती भाई शिंदे, पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, गटविकास अधिकारी संदीप कराड, सदाशिव वासकर, कुंढेवहाळचे सरपंच अभिजीत मटकर, योगिता कांबळे विशेष शिक्षिका, राजवर्धन नाईक गटशिक्षण अधिकारी उपस्थित होते.

# 'सोनारवाडी रस्त्यावरील खड्डे बुजवा'

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनी हद्दीतील आपटासोनारवाडी मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धोकादायक खड्डे पडल्याने प्रवासी, वाहनचालक आणि नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. रस्त्यावरील मोठे खड्डे आणि खराब झालेली अवस्था यामुळे चारचाकी तसेच अवजड वाहनांची वाहतूक अत्यंत कठीण झाली आहे. दरम्यान, रस्त्यावरील खड्डे तात्काळ बुजविण्यात यावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



विशेषतः रात्री-अपरात्री वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास रुग्णवाहिका किंवा इतर आपत्कालीन वाहने गावात पोहोचण्यास मोठा अडथळा निर्माण होत असल्याची चिंता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. खड्ड्यांमुळे दुचाकीस्वार घसरून लहान-मोठे अपघात होण्याची शक्यता वाढली असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या रस्त्यावर अपुरा प्रकाश असल्याने रात्रीच्या वेळी खड्डे स्पष्ट दिसत नाहीत. त्यामुळे वाहनचालकांना अंदाज न आल्याने अपघाताचा धोका अधिक वाढत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. सोनारवाडी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे रस्त्याची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून मोठे व धोकादायक खड्डे त्वरित बुजविण्याची मागणी केली आहे. तसेच रस्त्याची आवश्यक ती कायमस्वरूपी दुरुस्ती करून नागरिकांना सुरक्षित आणि सुरळीत वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

# २३ ऑगस्टला ज्येष्ठ नागरिक संस्थेचा वर्धापन दिन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

ज्येष्ठ नागरिक संस्था, अलिबागच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून संस्थेची त्रैमासिक सभा रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी दुपारी २.३० वाजता ब्राह्मण आळी येथील राम मंदिराच्या दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

या सभेत ज्येष्ठ नागरिकांच्या नातवंडांपैकी वार्षिक परीक्षेत प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात येणार असून, त्यांना बक्षिसे व प्रशस्तीपत्रे देऊन सन्मानित केले जाणार आहे. तसेच वयाची ९०, ८० व ७५ वर्षे पूर्ण केलेल्या सभासदांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात येणार आहे. याशिवाय वाढदिवस असलेल्या सभासदांचेही यावेळी अभिष्टचिंतन करण्यात येणार आहे. दरम्यान, याच सभेत सन २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी संस्थेच्या नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात येणार आहे. या निवडणुकीसाठी संदीप गोठीवडेकर हे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. तरी सर्व सभासदांनी या सभेस आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कलानगरातून पाच हजारांहून अधिक नागमूर्ती रवाना | श्रावण महिन्याच्या प्रारंभापासून तयारीला वेग

# मुंबईकरांना चिरनेरच्या नागमूर्तींची भुरळ

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

नागपंचमीच्या पार्श्वभूमीवर चिरनेरच्या कलानगरातील नागमूर्तींना मुंबईच्या बाजारपेठेत मोठी मागणी आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही कलानगरातील कुंभार समाजाच्या महिला कारागिरांनी तयार केलेल्या पाच हजारांहून अधिक नागमूर्ती नागपंचमीच्या चार दिवस आधीच मुंबईच्या बाजारपेठेत विक्रीसाठी रवाना करण्यात आल्या आहेत. यामुळे चिरनेरच्या पारंपरिक मूर्तिकलेला पुन्हा एकदा मुंबईकरांची पसंती मिळत असल्याचे दिसून येत आहे.

श्रावण महिन्याच्या प्रारंभापासूनच नागपंचमीची तयारी सुरू होते. हिंदू संस्कृतीत नागपंचमीला विशेष महत्त्व असून, अनेक महिला पारंपरिक वेशभूषेत नागमूर्तींची विधीवत पूजा करतात. नागदेवतेला दूध, नारळ, पुष्पहार, पेढे आणि लाह्या यांचा नैवेद्य दाखविला जातो. ग्रामीण भागात शेतातील नागस्थान तसेच नागवेलीचीही पूजा करण्याची परंपरा आजही कायम आहे.

चिरनेरचे कलानगर शाडूच्या गणेशमूर्तींसोबतच नागमूर्तींसाठीही प्रसिद्ध आहे. येथे नागमूर्ती तयार करण्याचे काम आठ कारखान्यांमध्ये



केले जाते. मागील अनेक पिढ्यांपासून कुंभार समाजातील कुटुंबे हा पारंपरिक व्यवसाय जपत आहेत. नागपंचमीच्या सुमारे दोन महिने आधी मूर्ती तयार करण्यास सुरुवात होते. मूर्ती तयार करणे, त्या सुकविणे आणि त्यानंतर रंगरंगोटी करणे, अशी प्रक्रिया पूर्ण केली जाते.

कलानगरातील आखीव-रेखीव आणि आकर्षक नागमूर्तींना मुंबईच्या बाजारपेठेत दरवर्षी चांगली मागणी असते. यंदाही पाच हजारांहून अधिक मूर्ती मुंबईत पाठविण्यात येणार असल्याची माहिती मूर्तिकार व विक्रेत्या नीलम चौलकर आणि दीपा गोरे यांनी दिली.

लहान, मध्यम आणि मोठ्या आकाराच्या नागमूर्ती किरकोळ बाजारात साधारण २५ ते १०० रुपये दराने विकल्या जातात. मात्र यंदा पीओपी आणि रंगांच्या किमतीत सुमारे ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे मूर्ती तयार करण्याचा खर्च वाढला असला तरी नागपंचमीच्या मागणीमुळे कारागिरांना व्यवसायातून उत्पन्नाची अपेक्षा आहे.

### सण-उत्सवांमुळे व्यवसायाला आधार

चिरनेर कलानगरातील कुंभार समाजाचा गणेशमूर्ती, नागमूर्ती तसेच मातीची भांडी तयार करण्याचा पारंपरिक व्यवसाय आहे. वर्षभर मेहनत करून तयार केलेल्या या कलाकृतींना सण-उत्सवांच्या काळात मागणी वाढत असल्याने कारागिरांना आर्थिक आधार मिळतो. मात्र, मूर्ती तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मेहनत आणि वेळ लागत असल्याने या पारंपरिक व्यवसायाला अधिक प्रोत्साहन मिळावे, अशी अपेक्षा कारागिरांकडून व्यक्त होत आहे.

# अन्यथा शेतातच बेमुदत उपोषण!

## • आंबोट ग्रामस्थांचा प्रशासनाला इशारा • संमतीशिवाय रस्त्याच्या कामाला विरोध

**| नेरळ | प्रतिनिधी |**

प्रस्तावित टोरंट वीज प्रकल्पाच्या रस्त्यासाठी सुपीक शेतजमिनी संपादित करण्याच्या हालचालींना आंबोट ग्रामस्थांनी तीव्र विरोध केला आहे. शेतकऱ्यांची लेखी संमती आणि हरकतींचा योग्य तो निपटारा झाल्याशिवाय शेतजमिनीवर रस्त्याचे कोणतेही काम सुरू करू नये; अन्यथा शेतातच बेमुदत आमरण उपोषण छेडू, असा थेट इशारा बाधित शेतकऱ्यांनी कर्जत तहसीलदारांना दिला आहे.



प्रस्तावित टोरंट वीज प्रकल्पासाठी साई डोंगर येथे जाण्यासाठी भालीवडीपासून सुमारे ५.९१ किलोमीटर लांबीचा रस्ता प्रस्तावित आहे. या रस्त्यासाठी सुमारे ३९० शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या जाणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे. यासंदर्भात आंबोट येथील संभाव्य प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी कर्जत तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

साई डोंगर येथे टोरंट कंपनीचा जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित असून, या प्रकल्पापर्यंत जाण्यासाठी रस्ता उभारण्यात येणार आहे. या रस्त्यासाठी जमीन संपादनाची अधिसूचना रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जारी करण्यात आली आहे. मात्र, प्रस्तावित रस्त्यामुळे गावातील अनेक शेतकऱ्यांची दरवर्षी दुबार पीक देणारी सुपीक जमीन बाधित होणार आहे. परिणामी शेतकऱ्यांचे उत्पन्नाचे साधन हिरावले जाऊन पुढील पिढ्यांचेही मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली.

सुपीक जमीन जबरदस्तीने संपादित करण्यास शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असून, शेतकऱ्यांची लेखी सहमती घेतल्याशिवाय कोणत्याही प्रकारचे काम सुरू करू नये, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. प्रकल्पासाठी रस्त्याचे काम शेतजमिनीमध्ये सुरू करण्याचा प्रयत्न झाल्यास सर्व बाधित शेतकरी एकजुटीने आंदोलन करतील. शेतकऱ्यांच्या इच्छेविरोधात काम सुरू केल्यास संबंधित ठिकाणी बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

यावेळी शेतकऱ्यांनी प्रस्तावित प्रकल्पामुळे शेती, पर्यावरण, उपजीविका आणि भविष्यातील पिढ्यांवर होणाऱ्या संभाव्य परिणामांची माहिती तहसीलदारांना दिली. प्रकल्पाला बाधित शेतकरी व ग्रामस्थांचा स्पष्ट विरोध असल्याचेही त्यांनी सांगितले.

> “संबंधित भूसंपादन प्रक्रियेसाठी नियुक्त करण्यात आलेले अपर जिल्हाधिकारी श्रीकांत गायकवाड यांच्याकडे याबाबतचे अधिकार आहेत. शेतकऱ्यांनी आपल्या सर्व समस्या आणि हरकती त्यांच्याकडे मांडाव्यात.”
>
> – डॉ. धनंजय जाधव, कर्जत तहसीलदार

दरम्यान, जमिनी, शेती आणि पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आंबोटसह बाधित शेतकरी एकवटले असून, प्रशासन त्यांच्या हरकती आणि मागण्यांवर काय भूमिका घेते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# कळंबोलीत दुतर्फा पार्किंगमुळे वाहतूक कोंडी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

कळंबोली शहरातील प्रमुख रस्त्यांवर सुरू असलेल्या दुतर्फा वाहन पार्किंगमुळे वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. शहरातील रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण पूर्ण झाल्यानंतरही दोन्ही बाजूंना वाहने उभी केली जात असल्याने रस्ते अरुंद होत असून, वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर कळंबोली वाहतूक शाखेने पूर्वीप्रमाणे सम-विषम पार्किंग व्यवस्था आणि टोईंग कारवाई पुन्हा सुरू करावी, अशी मागणी होत आहे.

सायन-पनवेल महामार्गावरून कळंबोली शहरात प्रवेश करणाऱ्या प्रमुख रस्त्यांवर दररोज मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. त्यातच रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना पार्किंग केल्यामुळे वाहतुकीसाठी उपलब्ध जागा कमी पडत असून, सकाळी आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत वाहतुकीचा वेग पूर्णपणे मंदावतो. अनेक ठिकाणी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने नागरिकांचा वेळ वाया जात असून, रुग्णवाहिका व अन्य अत्यावश्यक सेवांच्या वाहनांनाही मार्ग काढणे कठीण होत आहे. यापूर्वी कळंबोली वाहतूक शाखेकडून सम-विषम पार्किंगची अंमलबजावणी करण्यात येत होती. नियमांचे उल्लंघन करून रस्त्यावर वाहने उभी करणाऱ्यांवर टोईंगची कारवाईही केली जात होती. त्यामुळे वाहतुकीवर काही प्रमाणात नियंत्रण आले होते. मात्र, शहरातील रस्त्यांच्या दुरुस्ती व सिमेंट काँक्रिटीकरणाच्या कामामुळे ही कारवाई तात्पुरती थांबविण्यात आली. वाहतूक शाखेने प्रमुख रस्त्यांचे नियमित सर्वेक्षण करून आवश्यक त्या ठिकाणी सम-विषम पार्किंगची अंमलबजावणी करावी, बेकायदा पार्किंग करणाऱ्या वाहनांवर टोईंगद्वारे कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१६ ऑगस्ट**

१) श्री. मनोहर हरी पवार अलिबाग, १६-८-१९३९
२) श्री. प्रदीप नीळकंठ फाटक अलिबाग, १६-८-१९४९
३) श्रीम. नीलिमा नरेंद्र दळवी अलिबाग, १६-८-१९५२
४) श्री. दत्तात्रेय महादेव नागावकर रामनाथ, अलिबाग, १६-८-१९५१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

वाढदिवस साजरा करा अन्नदानाने

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)** ९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**स्व. श्री. सुभाष शांताराम जाधव, स्मरणार्थ, पिंपळभाट, अलिबाग**

## येरळ येथे समाज मंदिराचे भूमीपूजन

**सुतारवाडी** : स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून स्वातंत्र्यसैनिकांच्या भूमीत मला भूमीपूजन करण्याची संधी मिळाली याचा मला मनस्वी आनंद होत असल्याचे आमदार अनिकेत तटकरे यांनी येरळ येथील समाज मंदिर भूमीपूजन करताना सांगितले. यावेळी जिल्हा परिषद सदस्या निधी जाधव, रोहा पंचायत समिती उपसभापती संजय मांडूस्कर, येरळ सरपंच सुरेश जाधव, सदस्य विनिता महाडिक, पंचायत समिती सदस्य जगन्नाथ धनावडे, राकेश शिंदे, चिंतामण दळवी, नरेंद्र जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

# मालगाडीच्या वॅगनमधून गॅसगळती

## पनवेल स्थानकातील विद्युतपुरवठा तात्काळ बंद

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

पनवेल रेल्वे स्थानकात मालगाडीच्या वॅगनमधून गॅस गळती होत असल्याची माहिती मिळताच रेल्वे प्रशासन आणि संबंधित यंत्रणांची धावपळ उडाली. संभाव्य धोका लक्षात घेऊन सुरक्षेच्या दृष्टीने पनवेल स्थानकातील अप आणि डाऊन मार्गावरील ओव्हरहेड विद्युत पुरवठा बंद करण्यात आला.



णझ डऊ्ठ्ठचछ्झज/डइझच ही ३५ वॅगनची मालगाडी (क्रमांक २६०५, लोको क्रमांक ४३४७८) रात्री ७.२६ वाजता पनवेल रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक २ वरील मार्गावर दाखल झाली. त्यानंतर रात्री ९.५० वाजता पनवेलचे डीवायएसएस यांच्याकडून संबंधित वॅगनमधून गॅसगळती होत असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाला देण्यात आली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन रात्री १० वाजता अप आणि डाऊन या दोन्ही मार्गांचा ओव्हरहेड विद्युत पुरवठा खबरदारीचा उपाय म्हणून बंद करण्यात आला. त्यानंतर पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यातील रात्रपाळीचे अधिकारी व कर्मचारी तसेच अग्निशमन दलाचे अधिकारी आणि जवान घटनास्थळी दाखल झाले.

गॅसगळतीमुळे कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी घटनास्थळी आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या असून, रेल्वे प्रशासन आणि संबंधित यंत्रणांकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

# खारआंबोळीत आदर्शवत सामुदायिक शेती

**| मुरुड-जंजिरा | प्रतिनिधी |**

कोकणात शेतीकडे पाहण्याचा कल कमी होत असताना मुरूड तालुक्यातील खारआंबोळी गावाने मात्र सामुदायिक शेतीची परंपरा आजही जपली आहे. गावातील तब्बल २५० ग्रामस्थांनी देवळासमोरील सामूहिक शेतात पारंपरिक गीतांच्या साथीने भाताची राब पेरणी केली. गावातील मतभेद बाजूला ठेवून एकत्र येत शेतीची कामे करण्याची ही परंपरा खारआंबोळीची वेगळी ओळख ठरली आहे.



माजी सरपंच मनोज कामाने यांच्या माहितीनुसार, गावच्या शेतात कामाची हाक दिल्यानंतर सकाळी सात वाजल्यापासून पुरुष-महिला उत्साहाने कामाला सुरुवात करतात. आजच्या यंत्रयुगातही या शेतीच्या कामासाठी कोणत्याही यंत्राचा वापर केला जात नाही. पारंपरिक पद्धतीनेच राब पेरणीचे काम पूर्ण केले जाते. विशेष म्हणजे, गावातील कुशल कामगारांना बाहेरच्या ठिकाणी दिवसाला सुमारे एक हजार रुपये मजुरी मिळत असली, तरी गावच्या सामुदायिक शेतीच्या कामासाठी ते स्वखुशीने उपस्थित राहतात. केवळ शेतीचे काम पूर्ण करणे हा उद्देश नसून, गावातील एकोपा, माणुसकीची मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी जपणे हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे.

राब पेरणीच्या वेळी महिला पारंपरिक गीते म्हणत काम करतात. कामाच्या उत्साहात महिला पुरुषांना गंमतीने टोमणे मारतात, तर पुरुषही महिलांना 'मुंबईला जातो' अशा मिश्किल टोमण्यांनी हशा पिकवतात. श्रम, विनोद आणि एकोप्याच्या वातावरणात होणारी ही राब पेरणी पाहण्यासाठी परिसरातील छायाचित्रकार आणि पर्यटकही आवर्जून खारआंबोळीला भेट देतात. यंदा अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले असले तरी वाचलेल्या भात पिकाची पेरणी ग्रामस्थांनी उत्साहाने केली. पावसाचा लहरीपणा कायम असला तरी भातशेतीसाठी अजूनही चांगल्या पावसाची गरज आहे. मुरूड तालुक्यात सुमारे तीन हजार हेक्टर क्षेत्रावर भातशेती केली जाते आणि भात हे तालुक्यातील प्रमुख पीक आहे.

खारआंबोळीतील शेतीची लागवड तालुक्यातील इतर भागांच्या तुलनेत शेवटी केली जाते. अनेक ठिकाणी अतिपावसामुळे राब वाहून जाण्याची शक्यता असल्याने गावकऱ्यांनी ही पद्धत स्वीकारली आहे. गावातील सामुदायिक शेतीची लागवड पूर्ण झाल्यानंतर उरलेले राब इतर ग्रामस्थांना देण्यात येतात. सामुदायिक हिताचा हा विचार आजही गावाने जपला असून, त्यामुळे खारआंबोळीची शेतीची परंपरा केवळ शेतीपुरती मर्यादित न राहता सामाजिक एकजुटीचे उदाहरण ठरत आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. १६ ते २२ ऑगस्ट २०२६

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## कौटुंबिक वातावरण उत्तम राहील

**मेष :** राशीधारकांनी या सप्ताहाचे ग्रहमान मन:स्वास्थ्य बिघडवणारे असले तरीही आपले मन:स्वास्थ्य बिघडू देऊ नका. हा आठवडा आपल्याला मध्यम फलदायी राहील. क्षुल्लक गोष्टींचा फार विचार करू नका. जे आपले आहे, ते आपल्याला मिळणार आहे; जे आपले नाही, ते आपल्या जवळ राहणार नाही. मुलांची काळजी लागून राहील. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. ज्येष्ठ मंडळींची काळजी घ्यावी. आवडीची कामे करायला वेळ मिळेल. दिवसाची सुरुवात चांगली होईल. आपला मूड बिघडणार नाही याची काळजी घ्या. अवास्तव चर्चा करू नका. सत्याची कास सोडू नका. मित्रांशी सुसंवाद साधावा. घरातील वातावरण हसते-खेळते ठेवाल. आपली हौस पूर्ण करून घ्याल. जोडीदाराच्या वर्तनाने ताण वाढू शकतो. सरसकट एकच विचार करू नका. हातातील कामात यश येईल. बदलांकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पहावे. भावंडांची उत्तम साथ मिळेल.

**महिलांना–** बोलताना शब्दांचे वजन लक्षात घेऊन बोला. आपलेच मत खरे करायला जाऊ नका. **शुभ दिनांक–** १७,१८.

## अनावश्यक खर्चाला आवर घाला

**वृषभ** : राशीसाठी या सप्ताहात अनावश्यक खर्चाला आवर घालावी लागेल. कागदपत्रे नीट तपासून घ्यावीत. जोडीदाराची बाजू जाणून घ्यावी. अंगीभूत कलेचे कौतुक केले जाईल. दिवसाचा उत्तरार्ध मजेत जाईल. मानसिक तोल ढळू देऊ नका. इतरांच्या आनंदात सहभागी व्हाल. कलेच्या क्षेत्रात काहीतरी नवीन शिकायला मिळेल. जोडीदाराच्या मताला पुष्टी द्याल. काही तडजोडी कराव्या लागतील. मनातील इच्छेला अधिक प्राधान्य द्याल. कामात पळवाट शोधून चालणार नाही. दिवस संमिश्र राहील. पोटाच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. व्यसनाच्या आहारी जाऊ नका. अनावश्यक सल्ले देऊ नका. मुलांच्या तक्रारी वाढू शकतात. त्यांची बाजू समजून घ्यावी लागेल. धार्मिक गोष्टींकडे ओढ वाढेल. जोडीदाराविषयी संभ्रम दूर होईल. संपूर्ण माहितीशिवाय वक्तव्य करू नका. **महिलांना–** उगाच जुन्या गोष्टीत उकरून काढत बसू नका. योग्य आहार घ्यावा. घरातील गोष्टी संयमाने हाताळाव्यात. शक्यतो वादविवादात पडू नका. कौटुंबिक सौख्य उत्तम राहील. आवडते पदार्थ खायला मिळतील. **शुभ दिनांक–** १६,२०.

## मनातील इच्छा पूर्ण होतील

**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहात नातेवाईकांचे प्रश्न सामोरे येतील. उष्णतेचे त्रास संभवतात. कामात किरकोळ समस्या जाणवू शकतात. मनाची द्विधावस्था होऊ शकते. अति विचार करू नका. चेष्टा जपून करावी. वेळ पाळणे खूप गरजेचे आहे. कौटुंबिक घडी सांभाळावी. आर्थिक बाबीत आततायीपणे वागू नका. बोलताना भडक शब्दांचा वापर करू नका. शांतता अधिक प्रिय असेल. सारासार विचार करूनच कृती करा. संयम सोडून चालणार नाही. मनातील नसत्या चिंता काढून टाकाव्यात. आपल्या आवडत्या देवतेची उपासना करावी. मनातील इच्छा पूर्ण करून घ्याल. संमिश्र घटनांचा दिवस. हातातील कला सादर करता येईल. कौशल्याच्या जोरावर कामे कराल. कौटुंबिक खर्च वाढू शकतो. कामाला चांगला वेग येईल. काही क्षुल्लक समस्येतून मार्ग निघेल. अधिकाराचा वापर करण्याची संधी मिळेल. मन प्रसन्न राहील. मित्रांशी वाद घालू नयेत. **महिलांना–** गोड बोलून कामे साध्य करता येतील. प्रकृती जपा. आर्थिक बाजू ठीक राहील. जोडीदाराची साथ मिळेल. बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवावे म्हणजे गैरसमज होणार नाहीत. **शुभ दिनांक–** १६,१७.

## व्यापारातून लाभाचा योग

**कर्क :** राशीधारकास या सप्ताहात चिडचिड न करता कामाला गती द्या. छानछोकीसाठी खर्च कराल. व्यापारातून चांगला लाभ होईल. कौटुंबिक जबाबदारी पेलाल. अनावश्यक खर्चाला आळा घालावा लागेल, आत्मविश्वास कायम ठेवावा. अचानक धनलाभ संभवतो. मनाच्या चंचलतेला आवर घाला. वरिष्ठांचे धोरण लक्षात घ्या. वैवाहिक जीवन सुखकर राहील. आपले बोलणे मधाळ ठेवावे. योग्य तर्क लावाल. समोरच्याचा रोख ओळखून वागावे. कौटुंबिक वातावरण आनंदी राहील. नोकरदार वर्गाला दिलासा मिळेल. स्वत:मध्येच रमण्यात वेळ जाईल. कोणत्याही विषयाचा पूर्ण अभ्यास करूनच उत्तर द्या. तिखट पदार्थ खाणे टाळावे. मौल्यवान वस्तू सांभाळाव्यात. कामातून समाधान मिळेल. पोटाचे आरोग्य सांभाळावे. लोक तुमचा सल्ला ऐकतील. गरजूंना मदत कराल. परोपकाराची संधी मिळेल. संशयी वृत्तीला आळा घाला. **महिलांना–** घेतलेल्या कष्टाचे फळ मिळेल. घरातील लोकांचे सहकार्य मिळेल. संततीचे प्रश्न सुटतील. कौटुंबिक कामात अधिक वेळ जाईल. संयमाने परिस्थिती हाताळावी. **शुभ दिनांक–** १८,२१.

## जोडीदाराची उत्तम साथ मिळेल

**सिंह :** राशीसाठी आपले या सप्ताहाचे ग्रहमान स्वत:च्याच आनंदात रममाण होण्यासारखे असणार आहे. जवळचा प्रवासचा बेत कराल. जुन्या मित्रांची गाठ पडेल. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. भागीदारीत खूश असाल चांगले प्रस्ताव येतील. जुन्या त्रासदायक विचारात गुंतून राहू नका. घराबाहेर प्रतिष्ठा लाभेल. मुलांकडून शुभ वार्ता मिळतील. नवीन सुरुवात दिलासादायक असेल. कामातील उत्साह वाढीस लागेल. लहान-सहान गोष्टींवरून चिडू नका. बौद्धिक कामात अधिक कष्ट पडतील. घरातील गोष्टींबाबत अधिक दक्ष राहाल. आततायीपणे कोणतीही गोष्ट करू नका. सामाजिक गोष्टींची जाणीव मनात जागृत ठेवायला हवी. कामाच्या ठिकाणी सुलभता लाभेल. धडाडीपणावर संयम ठेवा. चर्चेला अधिक महत्त्व द्या. गोड बोलण्यातून छाप पाडाल. कामातून अनपेक्षित लाभ मिळेल. घरातील मोठ्यांचे आशीर्वाद घेऊन कामाला निघावे. व्यापारी वर्गाला लाभ मिळतील. **महिलांना–** आवडी निवडी बाबत दक्ष राहाल. करमणुकीत वेळ घालवाल. कर्तृत्वाला चांगला वाव मिळेल. मानसिक शांतता जपावी. आपला संयम सुटू देऊ नका. **शुभ दिनांक–** १९,२२.

## सामाजिक प्रतिष्ठा लाभेल

**कन्या :** राशीसाठी आपले ग्रहमान पाहाता व्यावसायिक स्तरावरील बदल लक्षात घ्या. सामाजिक प्रतिष्ठा लाभेल. कष्ट अधिक वाढू शकतात. घाबरण्यासारखे काहीही नाही, व्यापाऱ्यांनी अधिक मेहनत घ्यावी. नवीन प्रयोगाला यश येईल. आपले मत अधिक स्पष्टपणे मांडाल. जोडीदाराची चांगली साथ मिळेल. वरिष्ठांना नाराज करू नका. त्यांचा दबदबा वाढेल. कष्टाला पर्याय नाही. झोपेची तक्रार जाणवेल. मन काहीसे विचलीत राहील. मनातील इच्छा अधिक तीव्र होईल. महत्त्वाच्या नोंदी ठेवाव्यात. नवीन विचार आत्मसात कराल. कलेला अधिक प्रोत्साहन मिळेल. जोडीदाराचा वरचष्मा राहील. अधिकारी वर्गाचा पाठिंबा मिळेल. मित्रांशी पैज लावाल. कौटुंबिक वातावरण चांगले राहील. वक्तव्य विचारपूर्वक करावे. तुमचा सल्ला विचारात घेतला जाईल. विरोधक शांत राहतील. सरकारी कामे पुढे सरकतील. **महिलांना–** जवळचा प्रवास करता येईल. भावंडांची मदत मिळेल. रागाला आवर घालावी लागेल. गुंतवणूक करताना सावधानता बाळगावी. मनापासून जबाबदाऱ्या पार पाडाल. कौटुंबिक जबाबदारी लक्षात घ्या. **शुभदिनांक–** १७,१९.

## कोर्टकचेरीच्या कामांना गती मिळेल

**तुळ** : राशीसाठी आपले ग्रहमान पाहता राजकारणापासून दूर राहणे चांगले. कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. वैवाहिक जोडीदाराशी सामंजस्याने वागावे. प्रेमासंबंधी मंडळींना सबुरीचा सल्ला देण्यात येत आहे. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. प्रकृती जपा. तुम्हाला तुमच्या जवळच्या लोकांपासून लांब जावे लागू शकते. तुमच्या कुटुंबात काही शुभ कार्य होण्याची ही शक्यता आहे. करिअरच्या दृष्टिकोनातून तुम्हाला पद प्राप्ती होऊ शकते. आपल्या मुलांसाठी हा काळ बराच अनुकूल राहील यश मिळेल, विद्यार्थ्यांना चांगल्या गुणांची प्राप्ती होईल. वित्तीय गोष्टींमध्ये तुम्हाला काही संघर्ष करावे लागू शकतात आणि दुसरीकडे खर्चात वृद्धी होईल, तथापि आपल्या बचतीवर लक्ष द्या आणि धन संबंधित गुंतवणूक विचार पूर्वक करा. **महिलांना–** जर तुम्हाला कुटुंब जोडून ठेवायचे असेल, तर, तुम्हाला काही समझोता करावा लागेल. महिलावर्गाला त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. **शुभदिनांक–** २०,२१.

## उत्साहवर्धक, सकारात्मक काळ

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहाच्या दिवस शांततेत जाईल. विचारांना योग्य गती द्या. उत्साहवर्धक व सकारात्मक दिवस. आध्यात्मिक प्रगती कराल. जोडीदाराची योग्य साथ मिळेल. मनाची चंचलता जाणवेल. अचानक लाभाची शक्यता. हातातील कामात घाई करू नका. भौतिक सुखात वाढ होईल. स्थावरच्या व्यवहारातून लाभ होईल. मानसिक व्यग्रता जाणवेल. व्यावसायिक लाभावर लक्ष केंद्रित करावे. अनाठायी खर्चाची शक्यता. प्रेमातील व्यक्तींनी सध्या सबुरी बाळगावी. राजकारणात पडू नका. कार्यक्षेत्रात एखादे परिवर्तन घडून येईल. संवेदनशीलता ठेवावी लागेल. डोळ्याचे विकार संभवतात. मनातील इच्छा पूर्णत्वास जाईल. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. हे सर्व दिवस गप्पा व मौजमजेत जाईल. टीकाकारांकडे दुर्लक्ष करावे. आपल्या जवळील आनंद लक्षात घ्यावा. वरिष्ठांची मर्जी संपादन कराल. मनोबल वाढीस लागेल. वाहन चालवताना काळजी घ्यावी. जुने मित्र भेटतील. **महिलांना–** उष्णतेचा त्रास जाणवेल. पोटाची तक्रार जाणवू शकेल. हा आठवडा परोपकार करण्यात जाईल. निर्णय ऐनवेळी बदलावे लागू शकतात. **शुभदिनांक–** १६,१९.

## निर्णय घेताना घाई टाळा

**धनु :** राशीसाठी या सप्ताहात निष्कारण वादंग नको. मनातील गोष्टी उघडपणे बोलणे टाळाल. घरगुती जबाबदारीत वाढ होईल. कामाचा ताण जाणवेल. घाईने निर्णय घेऊ नयेत. मनातील स्वप्न साकार होईल. आपले मत स्पष्टपणे मांडाल. मुलांबाबतच्या जबाबदाऱ्या पार पाडाल. राजकीय व्यक्तींना उत्तम लाभ मिळतील. कौटुंबिक वातावरण खेळकर राहील. हे सर्व दिवस आनंदात जाणार आहेत. आपल्या मनाप्रमाणे गोष्टी कराल. परस्पर संवादातून सुखद बदल होतील. विरोधक नरम भूमिका घेतील. कलेतील नवीन गोष्टी शिकायला मिळतील. रागावर नियंत्रण ठेवावे. दिनक्रम व्यस्त राहील. व्यावसायिक स्तरावर अनुकूल घटना घडतील. मित्रांचे सहकार्य लाभेल. प्रापंचिक ताण कमी होईल. प्रिय व्यक्तीच्या भेटीचे योग. कौटुंबिक वातावरण चांगले राहील. जिद्द सोडून चालणार नाही. परिस्थितीशी जमवून घ्यावे लागेल. **महिलांना–** गृहोपयोगी वस्तूंची खरेदी कराल. कौटुंबिक कामात अधिक वेळ जाईल. समोरील गोष्टींकडे सकारात्मकतेने पाहावे. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा मित्रांशी सुसंवाद ठेवावा. **शुभ दिनांक –** २०,२१.

## मान-सन्मानात वाढ होईल

**मकर** : राशीसाठी या सप्ताहात आपण मनावर कोणताही दबाव न आणता वागावे. आपण घेतलेल्या निर्णयाची कारणमीमांसा कराल. आपला स्वभाव आपल्या मतावर अडून राहानारा होणार आहे. धार्मिक गोष्टीमध्ये जास्त लक्ष घालावे लागेल. वाहन वेगावर नियंत्रण ठेवावे. समोरच्याचे मत खोडून काढाल. ठाम भूमिका घ्याल. हातातील अधिकाराचा वापर कराल. अचानक धनलाभ संभवतो. अति काळजी करण्यात वेळ वाया घालवू नका. आवडी-निवडीबाबत आग्रही राहाल. फार चिडचिड करू नका. कौटुंबिक वातावरण खेळकर ठेवावे. मानसिक शांतता लाभेल. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. मानसिक दडपण कमी होईल. आपल्या कुटुंबात जोडीदाराचा वरचष्मा राहील. आपल्याला या आठवड्यात काही तडजोडी कराव्या लागतील. भौतिक सुखाला फार महत्त्व राहणार नाही. मान-सन्मानात वाढ होईल. **महिलांना–** आपण जुनी कामे पूर्ण कराल. कौटुंबिक खर्चाला आवर घालावी लागेल. मानसिक स्थैर्य लाभेल. बदलाच्या योजना अनुकूल ठरतील. कौटुंबिक गैरसमज मनातून काढून टाकावेत. **शुभ दिनांक–** १७,१८.

## सहकाऱ्यांकडून मदतीचा हात

**कुंभ** : राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान समोरील प्रत्येक गोष्टीचा आनंद घेणारे ठरणार आहे. वातावरण हलके फुलके राहील, आपल्याला योजनाबद्ध कामे करावीत. घरातील प्रलंबित राहिलेली कामे उरकाल. काही झाले तरी मनाचा गोंधळ उडवून घेऊ नका. वरिष्ठांच्या होकारत होकार मिसळावा लागेल. अतिशय जवळच्या व्यक्ती भेटतील. जवळच फेरफटका मारायला जाता येईल. जबाबदारीची जाणीव ठेवून वागावे. भावंडांकडून चांगल्या बातम्या मिळतील. सहकारी तुम्हाला चांगली मदत करतील. सकारात्मक दृष्टीकोन बाळगावा. सामाजिक प्रतिष्ठा जपावी. आवडीबाबत दक्ष राहाल. धाडस व पराक्रमात वाढ होईल. इतर कोणाकडून मदतीची फार अपेक्षा करू नका. मानसिक अवस्था संतुलित ठेवा. आवडत्या कामांमध्ये वेळ घालवा. मानापमानाच्या प्रसंगांकडे दुर्लक्ष करावे. कलेसंदर्भात नवीन वाट चोखाळाल. पूर्वी केलेली बचत मोलाची ठरेल. अधिकारी वर्ग तुमच्यावर खुश राहील. मित्रांशी सलोख्याने वागावे. **महिलांना–** मनाची चंचलता जाणवेल. कोणतीही गैरसमज होणार नाहीत याची काळजी घेत मनातील वाईट गोष्टींचा निचरा करा. **शुभ दिनांक–** १९,२०.

## कुटुंबातील सदस्यांशी सलोखा ठेवा

**मीन :** राशीसाठी आपले या सप्ताहात प्रतिष्ठित लोकांशी ओळख वाढेल. कामाला नवीन चालना मिळेल. अति उत्साह दाखवायला जाऊ नका. मानसिक शांतता लाभेल. आर्थिक आघाडीवर दिवस चांगला जाईल. नवीन संधीकडे लक्ष ठेवावे. कामात चिकाटी ठेवावी लागेल. एखादी नवीन गोष्ट हाती लागू शकते. कुटुंबातील सदस्यांशी सलोखा ठेवावा. कौटुंबिक काळजी सतावत राहील. मनातील संभ्रम काढून टाकावेत. स्थावरविषयक कामे निघतील. हाताखालील लोक चांगले मिळतील. सहकारी वर्गाकडून मदतीची अपेक्षा बाळगू नका. एकावेळी अनेक कामे अंगावर घेऊ नका. कामे योग्य पद्धतीने मार्गी लागतील. कामातून समाधान लाभेल. तुमचा उत्साह वाढीस लागेल. वाहन चालवताना सावधानता बाळगावी. **महिलांना–** मुलांच्या वागण्याकडे लक्ष ठेवा. कुटुंबियांसोबत वेळ घालवावा, त्यातून मानसिक समाधान लाभेल. भागीदारीच्या कामातून चांगला लाभ होईल. बुद्धीचातुर्यावर कामे पार पाडाल. कामात आपला स्वार्थ न बघता इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोन ठेवल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. **शुभ दिनांक –** १८, २१.

# शासकीय कर्मचाऱ्यांचा सन्मान



। म्हसळा । प्रतिनिधी ।

देशाचा ८० वा प्रजासत्ताक दिन म्हसळा तालुक्यात अत्यंत उत्साहपूर्ण आणि देशभक्तीच्या वातावरणात विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. तालुक्यातील शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था तसेच विविध ठिकाणी सकाळी ध्वजवंदन करून राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. स्वातंत्र्यदिनानिमित्त देशभक्तीपर, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

म्हसळा येथील न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे संस्थेचे चेअरमन समीर बनकर, तसेच केशव खांबेटे वाचनालय येथे अध्यक्ष संजय खांबेटे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. पंचायत समिती म्हसळा येथे सभापती बबन मनवे यांच्या हस्ते, नगरपंचायतीमध्ये नगराध्यक्ष सुनील शेडगे यांच्या हस्ते, पी. एम. श्री. स्कूल येथे अध्यक्ष शशिकांत शिर्के यांच्या हस्ते, व्ही. एन. स्कूल येथे अध्यक्ष फझल हलडे यांच्या हस्ते, तर व्हिजन इंटरनॅशनल स्कूल येथे अध्यक्ष डॉ. मुईज शेख यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

तालुक्याचे मुख्य शासकीय ध्वजवंदन पी. एम. श्री. रा. जि. प. शाळा म्हसळा च्या प्रांगणात तहसीलदार सचिन खाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, शिक्षक, विद्यार्थी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रध्वजाला मानवंदना देत उपस्थितांनी राष्ट्रगीत गायन केले. संपूर्ण तालुक्यात प्रजासत्ताक दिनाचा उत्साह दिसून आला. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून म्हसळा महसूल विभागाच्या वतीने तालुक्यात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत शासकीय कर्मचाऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी तहसीलदार सचिन खाडे, बबन मनवे, लहू म्हात्रे, गटविकास अधिकारी मंगेश साले, सहाय्यक गटविकास अधिकारी मयुरी जांभुळकर, गटशिक्षणाधिकारी श्रीमती भगत, मुख्याधिकारी विठ्ठल राठोड, नगराध्यक्ष सुनील शेडगे, समीर बनकर, पंचायत समिती सदस्या समृद्धी चाचले, पंचायत समिती सदस्या प्रियांका निंबरे, महादेव पाटील, पोलीस निरीक्षक राजेंद्र जाधव, संजय कर्णिक, राखी करंबे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिक उपस्थित होते.

# शाळेत डिजिटल लॅबचे उद्घाटन



**कोर्लई :** भारत देशाच्या ८० व्या.स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून मुरुड तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या आदर्श केंद्रशाळा, नांदगाव नं. १ शाळेत निलेश घाटवळ यांच्याहस्ते संगणक कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, दळवी, माळी, सेजल घुमकर, मेघा मापगावकर, वैशाली रणदिवे, जितू दिवेकर नितीन पवार, अस्लम हलडे, योगेश जायस्वाल, गणेश गाणार, गजानन मुंबईकर, वृषाली जोशी, मिलिंद राऊत, विश्वास गिरनेकर, स्नेहल शेळके ग्रामसेवक म्हात्रे, हेमंत नांदगावकर, अश्विन राठोड, नितेश राऊत, सिद्धी ठाकूर, चेतन पाटील, मिलिंद पाटील, तलाठी नांदगाव सर्व पालक वर्ग, ग्रामस्थ आदी मान्यवर उपस्थित होते.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

# लावण्या पाटीलच्या हस्ते ध्वजारोहण

**हमरापूर :** भारतीय स्वातंत्र्याचा स्वातंत्र्य दिन सर्वत्र साजरा करण्यात आला. पेण तालुक्यातील कळवे ग्रामपंचायत कार्यालयासमोर इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९६ टक्के मिळून पेण तालुक्यामध्ये प्रथम क्रमांक मिळवलेल्या लावण्या महेश पाटील हीला झेंडावंदन करण्याचा मान ग्रामपंचायतीतर्फे देण्यात आला. यावेळी सतीश पाटील, अंकिता पाटील, राजश्री पाटील, श्रीनिवास पाटील, सदस्य प्रमोद पाटील, ग्राम अधिकारी शामल मोकल, सर्व सदस्य ग्रामस्थ तसेच विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

# मढाळी बु. शाळेत नशा मुक्तीची प्रतिज्ञा

। खांब । प्रतिनिधी ।



रोहा तालुक्यातील प्राथमिक शाळा मढाळी बु.येथे ८० वा स्वातंत्र्य दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी वंदेमातरम या गीताने सुरुवात झाली. तदनंतर ध्वजारोहण करून राष्ट्रगीत व राज्यगीतांचे गायन केले. तसेच विद्यार्थ्यांना निपुण भारत, नशा मुक्ती आणि नवभारत साक्षर प्रतिज्ञाही घेतली.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी कवायतीने कार्यक्रमाचे आकर्षण अधिकच वाढवले. यानंतर बालसभा मातापालकांचे सन्मान तसेच सन २०२५ सालचे नवभारत साक्षर झालेले नवसाक्षरांचे प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

याप्रसंगी सुमन वालेकर, सुप्रिया झोलगे, प्रियंका कोळी, दिव्या पवार, अविनाश तळकर, धोंडू भगत, सुनीता धामणसे, गणेश कोळी, विलास वालेकर, शशिकला पिंकी पवार, इंद्रा पवार, शसोनाली वालेकर, अलका जाधव पवार, सुजाता कांबळे आदी पालक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत ही मिळकतीचे विद्यमान मालक पुष्कर सुरेश पाटील, वगैरे १ व पंकजा रविंद्रनाथ घरत यांच्या कडुन कायम विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी त्यांनी बोलणी केलेली आहेत. विकत घेणाऱ्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :

**मिळकतीचा तपशिल**

| अनु. क्र | मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रू.पै | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १) | मपगाव ता.अलिबाग | २२७ | ०-१६-०० | ४.३५ | पुष्कर सुरेश पाटील वगैरे १ |
| २) | मपगाव ता.अलिबाग | २२७ | ०-१९-०० | ३.६६ | पंकजा रविंद्र घरत |

वर वर्णन केलेल्या मिळकतीत विद्यमान मालकांचे असणारे एकुण क्षेत्र ०-३५-०० हे.आर इतके क्षेत्र हे या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

सदर वर वर्णन केलेली मिळकत ही विद्यमान मालकांची खुद्द मालकीची व ताब कब्जा वहीवाटीची तसेच निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही ताबा कब्जा, कुळवहिवाट, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज वहिवाट अथवा अन्य कसलाही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती कागदोपत्री पुराव्यासह सादर कराव्यात. अन्यथा मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहित धरुन सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहुन आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

अलिबाग:
दिनांक : १५/०८/२०२६

सही/-
ॲडव्होकेट
**ॲड.कांचन प्रशांत नार्वेकर**
मु. ॲकॉन क्लासिक, फ्लॅट नं.१०६,
जिल्हा न्यायालय रायगड समोर
अलिबाग, रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुलमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :- मौजे कशेळे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं | हिस्सा नं. | क्षेत्र | | | आकार | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | हे.. | आर. | पॉ | रुपये | पैसे |
| २२ | १०/अ | ० | २० | ९० | ०० | ०८ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं.४,
पहिला मजला,गणेश अर्पाटमेंट,
कर्जत नगरपालीका शेजारी,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१ ई मेल:nileshmundhe029@gmail.com

सही/-
**ॲड. निलेश दामु मुंढे**
दिनांक - १६/०८/२०२६
मो. नं. ८४४६८६९६७१

# साखर शाळेतील विद्यार्थीनींचा सत्कार

। अलिबाग । प्रतिनिधी ।



रायगड जिल्हा परिषद शाळा साखर येथील विद्यार्थीनी अर्वा चिखले व प्रिंसिका देवदत्त मुंढे यांचा स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून १५ ऑगस्ट रोजी ग्राम पंचायत आक्षीतर्फे प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

अर्वा हिने नुकत्याच झालेल्या इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत रायगड जिल्ह्यात ग्रामीण भागातून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. तसेच अर्वाने नवोदय विद्यालय परिक्षा, रायगड टॅलेंट सर्च, राज्य स्तरीय मंथन परिक्षेत देखील घवघवीत यश संपादन केले आहे.तसेच प्रिन्सिका देवदत्त मुंढे ही विद्यार्थीनी देखील पात्र झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. जिल्हा परिषदेचे ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील कुठे कमी नाहीत हे त्यांनी दाखवून दिले आहे.

याप्रसंगी आक्षी ग्रामपंचायत सरपंच रश्मी पाटील, सदस्य, ग्रामसेवक प्रसाद गोंधळी, साखर शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र पाटील, स्मिता चिखले, देवदत्त मुंढे, कर्मचारी निलेश सारंग, सागर कवळे, मनिषा मुजावर , अंगणवाडी सेविका रिमा गुरव, आशा सेविका स्मिता वर्तक , अनुजा पेवेकर, जान्हवी फाळके, मनिषा गुरव तसेच इतर ग्रामस्थ देखील उपस्थित होते.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे मसद बुद्रुक, ता.पेण, जि.रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनांची मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री.सुरेश सुदाम पाटील यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतींचे वर्णन**

**मौजे- मसद बुद्रुक, ता. पेण, जि. रायगड येथिल**

| मालक/कब्जेदाराचे नाव | गट क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. सुरेश सुदाम पाटील | १८८ | २ | ०.१६.०० | २.३८ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरिक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील श्रीमती.वत्सला गजानन पाटील यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. १६/०८/२०२६.

**श्री. तुषार द. देवरे**, ॲडव्होकेट
पत्ता:फ्लॅट नं. ए-२, जय नगर को.ऑप हो.सोसा.लि.
कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि.रायगड. मोबाईल नं.९३२५००४००८

# विद्यार्थ्यांनी दिली तिरंग्याला मानवंदना

**पाताळगंगा :** रायगड जिल्हा परिषद शाळा माजगाव येथील सुनील सातुनकर यांच्या उपस्थितीत, तर ग्रुप ग्रामपंचायत माजगाव येथे उपसरपंच सरिता वाघे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी, ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पदाधिकारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध परेड सादर करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. याप्रसंगी सरिता वाघे, संदीप धारणे, रमेश जाधव, रेश्मा ढवालकर, मंगेश पाटील, स्वाती ढवालकर, वंदना महाब्दी, अपर्णा शिंदे, वैशाली महाब्दी, प्रांजल जाधव, देवराम कांबळे, बाजीराव ढवालकर, एस. के. कांबळे, सुनील वाघे, प्रसाद वाघे, आदी उपस्थित होते.

# कोलमांडले शाळेस संगणक संच भेट

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।



आपण ज्या शाळेत शिक्षणाचे धडे गिरवले, जिथे आपल्या भविष्याची भक्कम पायाभरणी झाली, त्या मातृसंस्थेचे ऋण फेडणे हे प्रत्येक विद्यार्थ्याचे कर्तव्य असते. याच सामाजिक जाणीवेतून आणि उत्कृष्ट कर्तव्यातून श्रीवर्धन तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोलमांडले येथील १९९८-९९ च्या माजी विद्यार्थी बॅचच्या वतीने शाळेला एक अद्ययावत संगणक संच सप्रेम भेट म्हणून देण्यात आला.

देशाच्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आजचे युग हे तंत्रज्ञान आणि डिजिटल क्रांतीचे युग मानले जाते. अशा काळात ग्रामीण भागातील चिमुकल्या विद्यार्थ्यांना संगणकीय शिक्षणाची प्राथमिक ओळख व्हावी, त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची आवड निर्माण व्हावी आणि अभ्यासात मदत व्हावी, या उदात्त हेतूने १९९८-९९ च्या बॅचने एकत्र येत हा संगणक संच भेट देण्याचा संकल्प पूर्ण केला.

याप्रसंगी माजी विद्यार्थी, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, विद्यार्थी तसेच कोलमांडले गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस याद्वारे जाहीर करण्यांत येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टात नमूद जमिन मिळकत ही सदर जमिन मिळकतीचे विद्यमान मालक श्री.उल्हास एकनाथ कोलथकर, राहणार-मारळ, ता. श्रीवर्धन, जि. रायगड यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे परिशिष्ट**

| गावाचे नांव | गट क्रमांक | एकुण क्षेत्र (हे.आर्स) | आकार (रु. पै.) | मालकाचे नांव |
|---|---|---|---|---|
| मारळ ता.श्रीवर्धन जि.रायगड | ५४२ | ०-५६-० | ०.२० | श्री.उल्हास एकनाथ कोलथरकर |

वर परिशिष्टात नमूद जमिन मिळकत ही संपुर्णतः जमिन मालकाच्या मालकी व ताबे कब्जा वहिवाटीतील असल्याची हमी माझे अशिलांस जमिनीचे मालकांनी दिलेली असून सदर जमिन मिळकत ही पुर्णतः निर्वेध व बोजाविरहीत असून त्याबाबत कोणतेही गहाण, दान, लीज, लीन, फरोक्त खत, मृत्युपत्र अथवा खरेदीखत झाले नसल्याची हमी माझे अशिलांस दिलेली आहे. तरी वर परिशिष्टात नमूद जमिन मिळकतीमध्ये अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध, अधिकार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे अवधीत त्यांची लेखी हरकत संयुक्तीक कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर माझ्याकडे आणून द्यावी. वर नमूद मुदतीत कोणाचीही संयुक्तीक हरकत न आल्यास माझे अशिल सदर जमिन मिळकतीमध्ये अन्य कोणाचेही हक्क नसल्याचे समजून सदरहू मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील यांची संबंधितांनी दखल घ्यावी.

श्रीवर्धन,
दिनांक : १५/०८/२०२६

**(ॲड. अतुल अरविंद चौगुले)**
महेश्वर आळी श्रीवर्धन, श्रीवर्धन
मो.नं. ७२७६५६३६६७


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- शुभमुहूर्त प्रथम पुर्नविवाह सर्वजातीय आंतरजातीय वेबसाईटसह, स्थळांसाठी रोहा पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- शुभमुहुर्त विवाहमंडळ अलिबाग शाखेत सर्व जातीय वधूवरांची नावनोंदणी सुरु. ४६ शाखा, वेबसाईट, ॲप्लीकेशन नावनोंदणीसाठी - ९२२६७६६१२९.
- जन्मकुंडली-हस्तरेखा-टॅरोकार्ड-अंकशास्त्र यावरुन ज्योतिषविषयक मार्गदर्शन व उपाय श्री म्हात्रे- ९२२६७६६१२९
- पाटील अँड शेख अकॅडमी SSC, HSC, BA, B.COM, B.SC. उत्तीर्ण आणि अनुत्तीर्ण गृहींणीसाठी, मुलींसाठी, मुलांसाठी सुवर्णसंधी आमच्या टेक्निकल कोर्ससाठी प्रवेश घ्या, उत्तम पगार मिळवून यशस्वी व्हा. सिव्हिल/आर्किटेक्चरल ड्राफ्टसमनची आणि मेकॅनिकल ड्राफ्टसमनची नविन बॅच ११ऑगस्ट २०२६ पासुन सकाळी आणि संध्याकाळी सुरु होणार आहे. प्रवेश सुरू झाले ९७५७०९९९२३
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, वेटर, हाऊसकिपर, इंडियन चायनीज कुक, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२
- जन्नावर हॉस्पिटल चेंढरे अलिबागमध्ये कामासाठी मावशी, स्टाफ नर्ससाठी जागा आहे. संपर्क : ७७९८०३४५०९
- ऑफिस स्टाफ आवश्यक Tanna Consultancy शॉप नं. १ शारदा CHS, महावीर चौक, बेल्जियम वॅफल समोर, अलिबाग, जि. रायगड संपर्क : ९९२३७५०५४९, ९१०५७१७०३८ इच्छूक उमेदवारांनी संपर्क साधावा.
- गाळा भाड्याने मिळेल. ९४२३३७५१९८/८४११०१६४४४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# रोह्यात सेवानिवृत्त सैनिकांचा सन्मान

। चणेरा । प्रतिनिधी ।



रोहा-अष्टमी नगरपरिषदेतर्फे आयोजित स्वातंत्र्यदिन सोहळ्यात नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमात रोहा नगरपरिषदेच्या वतीने सेवानिवृत्त सैनिकांचा विशेष सन्मान करण्यात आला. आमदार अनिकेत तटकरे आणि नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांच्या हस्ते सैनिकांचा गौरव करण्यात आला. देशाच्या संरक्षणासाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा सन्मान झाल्याने कार्यक्रमाला विशेष भावनिक आणि प्रेरणादायी वातावरण लाभले.

याप्रसंगी तहसीलदार डॉ. किशोर देशमुख, पोलीस निरीक्षक अभय शेलार, अपर तहसीलदार प्रकाश मेहेत्रे, राजेश थोरे कार्यक्रमास मुख्याधिकारी अजयकुमार एडके, संतोष पोटफोडे, समीर शेडगे, अहमद दर्जी, राजेंद्र जैन, महेंद्र दिवेकर, महेश कोलाटकर, रविंद्र चाळके, निता हजारे, गौरी बारटक्के, महेंद्र गुजर यांच्यासह सर्व नगरसेवक, नगरसेविका, नगरपालिका पदाधिकारी, कर्मचारी, शाळांचे शिक्षक व विद्यार्थी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी, शहरातील मान्यवर नागरिक, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गडब येथे स्वांतत्र्य दिवस साजरा

**गडब :** गडब येथे ध्वजारोहण माणसी पाटील यांचे हस्ते करण्यात आले. जनता हायस्कूल गडबचे सोनावने, कांळबादेवी युवक मंडळ व्यायामशाळा येथे काशिनाथ चवरकर, रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गडब येथे प्रभारी मुख्याध्यापक रणजित तुरे, संस्कार विघालय गडबचे माजी केंद्र प्रमुख विजय पाटील यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्र गडब येथे मान्यवरांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. जनता हायस्कूल गडब येथे विद्यार्थानी विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम सादर केले. ग्रामपंचायतीतर्फे क्रिडा, सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या नागरिकांचा सत्कार करण्यात आला.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री.यशवंत सुदाम ठाकुर यांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत तीचे विद्यमान मालक श्री.शिवाजी लडकू कांबरी यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. उक्रुळ, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ५९ | २ | १-०९-८० | ८-५३ |

सदर वर नमुद केलेल्या मिळकतीपैकी विकत देणेचे क्षेत्र ०-४०-०० हे.आर. इतके आहे.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसीद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
दि. १६/०८/२०१६.

**ॲड. शिवाजी किसन टोकरे**
पत्ता शॉप नं.१, समर्थ कृपा
हौसिंग सोसायटी नेरळ, महेश
टॉकीज जवड, नेरळ ता.कर्जत,
जि.रायगड पिनकोड नं.४१०१०१
फोन नं. ७३५०१९४२००

# हिंदुस्थान दिनवेध्य

## राशीभविष्य

- **मेष** : नव्या विचारांना चालना मिळेल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. वैद्यकीय, शिक्षण क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **वृषभ** : योजलेली कामं चिकाटीने यशस्वी होतील. अनावश्यक खर्च टाळायला हवा. फार दगदग करू नका.
- **मिथुन** : कार्यक्षेत्रात उत्साह, धडाडी वाढेल. सरकारी कामं करून घ्यावीत. नव्या संधी लाभणार आहेत.
- **कर्क** : कार्यात मनाजोगी प्रगती होईल. खर्च वाढले तरी प्राप्तीही तशीच होत जाईल. वादाचे प्रसंग टाळावे.
- **सिंह** : प्रगतीचा नवा टप्पा गाठाल. व्यवसायात प्रगती होत जाईल. कौटुंबिक जीवनात सामंजस्यानं रहावं.
- **कन्या** : मन विचलित होऊ देऊ नका. नोकरीत अनुकूल घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल.
- **तूळ** : महत्त्वाच्या कामात थोरा-मोठ्यांचं सहकार्य लाभेल. अडचणीतून मार्ग निघेल. बाकी चिंता करू नये.
- **वृश्चिक** : मनासारखी प्रगती होत जाईल. अपेक्षित घटना घडतील. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात प्रगती होईल.
- **धनु** : राशीत भाग्यस्थानी मंगळामुळे कुचंबणा दूर होईल. चांगलं पेरलं तर चांगलंच उगवेल. चिंता करू नये.
- **मकर** : आर्थिक करार लाभदायक ठरतील. गुंतवणूक विचारानं करावी. महत्त्वाची कामं विलंबानं होतील.
- **कुंभ** : नव्या योजना मार्गी लागतील. उत्तरोत्तर प्रगती होत जाईल. अपेक्षित ध्येयपूर्तीबाबत समाधानी रहाल.
- **मीन** : व्यवसायातील प्रतिष्ठा जोपासली जाईल. अडचणी कमी होत जातील. हातून धार्मिक कार्य घडेल.

## ब्युटी मंत्रा — जाणा फेशियलची उपयुक्तता

तुम्हाला माहीत आहे का, काही फेशियल स्त्री आणि पुरुष या दोघांसाठीही उपयुक्त आहेत? तुम्ही आणि तुमचा पार्टनर अशा फेशियलचा आनंद घेऊन त्वचेला चार चांद लावू शकता.

* हायड्रेटिंग फेशियल- डिहायड्रेट झालेल्या त्वचेसाठी हायड्रेटिंग फेशियल उपयुक्त ठरतं. * ॲक्ने कंट्रोल फेशियल- या फेशियलद्वारे त्वचेतील तैलग्रंथींच्या सक्रियतेला अटकाव घातला जातो. * फेसलिफ्टींग फेशियल- अनियमित जीवनशैलीमुळे त्वचेवर वय वाढल्याच्या खुणा अकाली दिसू लागतात. त्या कमी करण्यासाठी फेसलिफ्टींग फेशियलची मदत घेतली जाते. हे फेशियल दोघांसाठीही उपयुक्त आहे. * पिगमेंट फेशियल- सूर्यप्रकाशात जास्त काळ राहिल्याने त्वचा काळवंडते. अशा वेळी त्वचा उजळवण्यासाठी या फेशियलची मदत घेतली जाते. या फेशियलमुळे त्वचेचा डलनेस जातो आणि रक्ताभिसरणही वाढतं. * स्कीन नरिशिंग फेशियल - कोरड्या आणि निस्तेज त्वचेसाठी हे फेशियल अत्यंत उपयुक्त आहे. यामुळे त्वचेला पुरेसं पोषण मिळतं. त्यामुळे त्वचा तरुण दिसण्यास मदत होते.

## दिनविशेष — १६ ऑगस्ट

- **२००२** : पॅलेस्टाईनचा नेता अबु निदाल याचा मृत्यू.
- **२००३** : युगांडाचा हुकुमशहा इदी अमीन याचं निधन.
- **२०१५** : ब्रिटनच्या ॲंडी मरेने रॉजर्स करंडक टेनिस स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं.
- **२०१७** : महाराष्ट्रात बैलगाड्यांच्या शर्यतीला परवानगी देण्यास उच्च न्यायालयाची मनाई.
- **२०१८** : भारतीय लोकशाहीच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलणारे सर्वप्रिय नेते आणि माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचं निधन.

## व्हॉट्स न्यू — सायबर हल्ला झालाय?

आपली सिस्टिम, स्मार्टफोन हॅक झाल्यानंतर काही संकेत मिळू लागतात. उपकरणात काही बदल घडू लागतात. त्याविषयी जाणून घेऊ या.

* सिस्टिम हॅक झाल्यानंतर गॅजेटचा वेग मंदावतो. ते बरेचदा क्रॅश किंवा फ्रीज होतं. तुमच्या गॅजेटची गती मंदावली असेल तर त्यात व्हायरस, ट्रोजन किंवा वर्म्जचा हल्ला झालेला असू शकतो. * इंटरनेटचा वापर नेहमीपेक्षा जास्त प्रमाणात होत असेल तर तुमच्या गॅझेटवर सायबर हल्ला झालेला असू शकतो. त्यामुळे आपल्या वापरात काही बदल झाले नसतील आणि खूप डाटा खर्च होत असेल तर गॅझेटकडे लक्ष द्यायला हवं. * तुम्ही एखादा व्हिडिओ बघत आहात आणि अचानक तो फ्रीज झाला किंवा सतत बफरिंग होत असेल तर सायबर हल्ल्याची शक्यता नाकारता येत नाही. तुमच्या गॅझेटमधलं मालवेअर डीएनएस हायजॅकिंगच्या माध्यमातून इंटरनेट ट्रॅफिकचा वेग कमी करू शकतं. यामुळे व्हिडिओ सुरू होताना बराच वेळ लागू शकतो. * तुमच्या सिस्टिममधले प्रोग्राम्स तसंच ॲप्स क्रॅश होत असतील तर हॅकर्सच्या हल्ल्याचा हा स्पष्ट संकेत असू शकतो.

## पंचांग

**रविवार, १६ ऑगस्ट २०२६**

विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, श्रावण कृ. ८, नक्षत्र : कृत्तिका, चंद्रराशी : मेष, योग : वृद्धि, धृव सूर्योदय : ६.२२, सूर्यास्त : ७.०३

## फॉरवर्डस

**ना जानें ज़िन्दग़ी क़ा ये कैसा दौर हैं...**

**इन्सान ख़ामोश हैं औऱ ख़बरों क़ा शोर हैं....!**

## आरोग्यमंत्र — खाओ जी भर के

वजन कमी करायचं म्हणजे आहारावर नियंत्रण ठेवणं आलं. पण अनेकांना हे जमत नाही. त्यामुळे काही केल्या वजनाचा काटा खाली येत नाही. पण कमी कॅलरी आणि कमी चरबीयुक्त पदार्थांच्या सेवनामुळे वजन नियंत्रणात रहातं. शिवाय वजन कमी करण्याची प्रक्रियाही जलद गतीने होते. असे पदार्थ जास्त प्रमाणात खाल्ले तरी वजन वाढत नाही. अशाच काही पदार्थांची माहिती घेऊ या.



* १०० ग्रॅम काकडीत अवघ्या १६ कॅलरीज असतात तर फॅट अवघं ०.१ ग्रॅम असतं. त्यामुळे काकडीची कोशिंबीर किंवा नुसती काकडी मनसोक्त खाता येईल. काकडीचा रसही पिता येईल.

* १०० ग्रॅम लिंबात अवघ्या २९ कॅलरीज असतात तर फॅटचं प्रमाण ०.३ ग्रॅम असतं. त्यामुळे लिंबू सरबत पिता येईल. पण यात साखरेचं प्रमाण कमी असू द्या. अन्यथा अपेक्षित परिणाम बघायला मिळणार नाही.

* १०० ग्रॅम पालकात २३ कॅलरीज आणि ०.८ ग्रॅम फॅट्स असतात. त्यामुळे पालक सूप, पालकाचा रस किंवा चविष्ट भाजी खाता येईल.

* १०० ग्रॅम कोबीत २५ कॅलरीज असतात. यात फॅट्स प्रमाणही अवघं ०.१ ग्रॅम असतं. त्यामुळे कोबीचं सॅलड, भाजी, कोशिंबीर, पराठा असं काहीही खाता येईल.

## ग्रुमिंग

* दाढीसाठी काही तेलं बाजारात मिळतात. दाढीच्या वाढीसाठी ही तेलं वापरता येतील. दाढी आणि मिश्यांसाठी काही वॅक्सही मिळतात. त्यांचा वापरही तुम्ही करू शकता. * कोणत्याही सेलिब्रिटीला फॉलो करू नका. तुमच्या चेहऱ्याला, व्यक्तिमत्त्वाला काय शोभून दिसतं ते बघा. * केसांप्रमाणे दाढी-मिश्याही धुवायला हव्यात. तसंच तुमचा फेसवॉशही दर्जेदार हवा. त्वचेच्या प्रकारानुसार फेसवॉशची निवड करा. * दाढी ट्रिम कधी करायची हे सुद्धा तुम्हाला कळायला हवं. दाढीची वाढ नीट नसेल किंवा दाढी तुम्हाला शोभून दिसत नसेल तर ती ट्रिम करून टाकणंच योग्य ठरतं.

## करिअरवाटा — योग्य पर्याय निवडताना...

अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि उत्तम संपर्कयंत्रणेमुळे बऱ्याच लोकांना ऑफिसमध्ये जाण्याची गरज राहिलेली नाही. घरातच काम करायचं असल्यामुळे बाहेर जावं लागत नाही आणि त्यासाठी वाहन वापरण्याचीही आवश्यकता नसते. साहजिक पेट्रोलचीही बचत होते. या पद्धतीचा फायदा विशेषत: महिलांना जास्त होतो. अनेक महिला मुलांकडे लक्ष देऊन, घरातली आवश्यक कामं पूर्ण करत कंपनीचं काम करतात. कंपनीत जाण्या-येण्याचा वेळ वाचतो, घरच्या कामाचा ताण कमी होते आणि काम चांगल्या प्रकारे करता येतं. काही कुटुंबात वृद्ध, आजारी लोक असतात. त्यांची शुश्रुषा करत काम करता येतं . मात्र काहींचं मत वेगळं असतं. समोरासमोर बसून ऑफिसमध्ये काम केल्यामुळे काम जास्त होतं असाही एक मतप्रवाह दिसतो. एकंदरीत, घरी बसून काम करणं योग्य की ऑफिसमध्ये जाऊन, यावर सध्या वाद सुरू आहे. अनेक तज्ज्ञांनी याबाबत आपली मतं व्यक्त केली असून त्यातून घरी बसून काम करणंच योग्य असल्याची ग्वाही दिली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर कंपनीने वर्क फ्रॉम होमचा पर्याय दिल्यास साधकबाधक विचार करुन निर्णय द्यावा.



## खेचाखेची — तीन फायदे

**बंता** : तू आरशासमोर बसून का अभ्यास करतोयस?

**संता** : याचे तीन फायदे आहेत.

१ - सोबतच रिव्हिजन होऊन जाते.

२ - आपल्यावर नजर राहते.

३ - आपल्याला अभ्यास करायला एक जण सोबती मिळतो.

## वेगळं काही

यानंतर त्याची आई चॅंटन ब्रायनने जोनाथनच्या शिक्षणाची सर्व जबाबदारी स्वीकारली. ती त्याला दररोज शाळेत नेऊन शिकवण्याचा प्रयत्न करत असे. यामुळे जोनाथन नवव्या वर्षी काही शब्द बोलू लागला. त्यानंतर तिने 'ई ट्रेन फ्रेम' या तंत्रज्ञानाची मदत घेऊन मुलाला बोलायला शिकवलं. यात एका प्लास्टिकच्या बोर्डावर शब्द आणि चित्र लिहिलेली असतात. डोळ्यांनी इशारे करून आपल्या भावना व्यक्त करायच्या असतात. जोनाथन ही ही भाषा शिकला. एवढ्यावरच तो थांबला नाही तर त्याने आय कॅन राईट हे पुस्तकही लिहीलं. यावेळी आपलं म्हणणं त्याने डोळ्यांच्या इशाऱ्याने मांडलं. जोनाथनचं हे पुस्तक अनेकांसाठी प्रेरणा ठरलं आहे.

## ज्वेल्स अँड जेम्स — हिरा खरेदी करताना...

अनेकींना हिऱ्याचं आकर्षण असतं. मात्र हिरा खरेदी करताना काही बाबी लक्षात घ्यायलाच हव्या.

* ४ 'सी' थिअरी- हिरा खरेदी करताना 'फोर सी' थिअरी लक्षात ठेवणं गरजेचं आहे. म्हणजेच कट, कलर, क्लॅरिटी आणि वेट या बाबींकडे बारकाईने लक्ष द्यावं. * कट- हिऱ्यांना तीन प्रकारचे कट असतात. प्रपोर्शनल, शॅलो आणि डीप असे तीन प्रकार आहेत. हिऱ्यांचे काही आकार राउंड ब्रिलियंट, मार्कीज, प्रिन्सेस, पीयर, हार्ट आणि ओव्हल हे आहेत. त्यापैकी राउंड ब्रिलियंट आकाराचे हिरे उत्तम दर्जाचे मानले जातात. * कलर- हिऱ्यांमध्ये फारसे रंग उपलब्ध नसतात. यात रंगहीन, थोडेफार रंगहीन, पिवळा आणि हलका पिवळा असे रंग असतात. रंगहीन हिरा उत्तम दर्जाचा मानला जातो. हिऱ्याच्या रंगांसाठी वेगवेगळी ग्रेड दिली जाते. 'डी'पासून 'व्ही'पर्यंत वेगवेगळ्या ग्रेड्स जातात. यापैकी 'डी' ग्रेडचे हिरे सर्वोत्तम मानले जातात. * पारदर्शकता (क्लॅरिटी)- उत्तम पारदर्शकता असणाऱ्या हिऱ्यांना 'इंटर्नली फ्लॉलेस' ग्रेड दिली जाते. * कॅरेट- हिऱ्याच्या कॅरेटची खात्री करण्यासाठी प्रशस्तीपत्रकावर विश्वास ठेवता येतो.



## सुडोकू १४०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १ | | | | | | | |
| ७ | | ६ | | ८ | | | ४ | |
| २ | ८ | | | ९ | | ७ | | |
| ५ | | ७ | ६ | १ | ८ | | ९ | |
| | २ | | ७ | | ४ | | ६ | |
| | ४ | | २ | ३ | ९ | १ | | ७ |
| | | ३ | | ७ | | | ८ | ४ |
| | ६ | | | २ | | ५ | | १ |
| | | | | | | | ३ | ९ |


**टीप -**

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १३९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | १ | ७ | ९ | २ | ८ | ४ | ३ | ५ |
| २ | ३ | ८ | ५ | ६ | ४ | ७ | ९ | १ |
| ५ | ४ | ९ | ३ | ७ | १ | २ | ८ | ६ |
| १ | ६ | ४ | २ | ९ | ७ | ३ | ५ | ८ |
| ८ | ७ | ५ | ६ | ४ | ३ | १ | २ | ९ |
| ९ | २ | ३ | ८ | १ | ५ | ६ | ७ | ४ |
| ३ | ५ | २ | १ | ८ | ६ | ९ | ४ | ७ |
| ४ | ८ | ६ | ७ | ३ | ९ | ५ | १ | २ |
| ७ | ९ | १ | ४ | ५ | २ | ८ | ६ | ३ |

## शब्दकोडे क्रमांक १४०



**आडवे शब्द :-**

१) सूर्यास्ताची वेळ
५) अजाण
९) भट्टी
११) एकाद्या अवयावास मुंग्या येणे
१२) पहेलवान
१३) दुर्बळ, असमर्थ
१५) त्रास, कष्ट,
१६) बंदी, मज्जाव
१७) इमारतीचा मूळ आधार
१८) फळांचा राजा
१९) हत्ती
२१) कमळाचे तळे
२३) शश्बुर
२४) एक अधिक एक चतुर्थांश
२६) दरी
२७) लक्ष्मीचे एक नाव
२८) मडके
२९) अंगावर अजिबात वस्त्र नसलेला
३२) बसण्याची लाकडी फळी
३३) पहेलवानांचा गुरू
३५) एक बारीक धान्य
३६) आभाळ
३७) गीत
३८) दोरखंड
३९) केर
४१) अथवा, किंवा
४२) वर्तुळ
४४) ह्या वर्षी
४५) सरळ लांब वासा
४७) पाचोळा, कचरा
४९) वर वधूची मिरवणूक
५१) नूतन
५३) चामड्याच्या वस्तू तयार करणारा
५५) मध्यस्थ
५६) पायाची उभी नळी
५८) पावसाची झड
५९) विजयादशमी
६०) मान्यतेचा शब्द
६१) वस्तू तयार करण्याची जागा
६३) युद्ध
६४) सुरुवात
६५) क्षमा
६६) प्रजा,
६७) धमनी
६८) फुरसत
६९) रजनी
७१) पर्यंत
७३) सख्खा भाऊ
७४) पोपट
७६) छोटा दरवाजा
७७) पतन
७८) दरोडा
७९) लिहिता वाचता येणारा

**उभे शब्द :-**

१) वनवास
२) च्या साठी
३) मारझोड
४) आश्चर्य
६) फार मोठे प्रास्ताविक
७) किरात
८) वृषभ
९) वजन
१०) युद्धासाठी उतावीळ झालेला
१३) व्यर्थ
१४) हाती घेतलेले काम पूर्णत्वास नेणे
१६) माझा
१७) झाडाभोवतीचा कट्टा
२०) पाठविलेला
२२) खटका, वेदनेची तिडीक
२३) ** दाम दंड भेद
२५) पराभव
२७) कारस्थान
२८) कदर करणारा
३०) मोगऱ्याची माळ
३१) ढग, दाट
३२) पदर
३४) द्वेष
३७) कुरण
४०) सजीव निर्जीव सर्व भाग
४३) बारीक केस
४६) ठेकेदार
४८) अत्यंत श्रीमंत माणसास गरीबी येणे
५०) तात्काळ
५२) इच्छा
५४) प्रज्वलित, तापलेले
५७) मगज, खोबरे
५८) एकरूपता, तादाम्य पावणे
६२) खाजणारा
६३) सदोदित
६५) भ्रम, जादू
६८) रंग बदलणारा प्राणी
७०) सिद्ध
७२) खून
७३) खुंट, आंचळ
७५) पृथ्वी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# भयावह चक्रव्यूहाची शृंखला

**यंदाच्या पावसाळ्यात इमारत कोसळण्याच्या घटनांची पुन्हा एकदा भीषण आणि वेदनादायी पुनरावृत्ती होत आहे. याबाबत 'स्ट्रक्चरल ऑडिट'ची चर्चा केवळ कागदावर होते. दहा-बारा वर्षांपुर्वी उभारलेली इमारत कोसळून अनेकांचा नाहक बळी घेते आणि काही दिवसांनी या संपूर्ण प्रकरणावर पडदा पडतो. इमारत दुर्घटनांचे सविस्तर चौकशी अहवाल येतात; पण त्यानंतर धोरणात्मक पातळीवर किंवा शिक्षेच्या रूपात काहीच घडत नाही.**



**जनार्दन पाटील**

पावसाळ्याचे आगमन महाराष्ट्रासाठी, विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि संपूर्ण एमएमआर क्षेत्रासाठी नेहमीच एका अज्ञात भीतीची सावली घेऊन येते. भिवंडीतील अलीकडील इमारत दुर्घटनेने अत्यंत गंभीर आणि काळजाचा ठोका चुकवणाऱ्या वास्तवाची पुन्हा एकदा नको ती उजळणी करून दिली आहे. काळाच्या ओघात पन्नास-साठ वर्षे जुन्या, मोडकळीस आलेल्या किंवा जर्जर झालेल्या इमारती पडणे, हे निसर्गनियमाला धरून मानले जाऊ शकते; परंतु अवघ्या दहा-बारा वर्षांच्या, ठसठशीत आणि देखण्या दिसणाऱ्या इमारतीही पत्त्यांच्या बंगल्यासारख्या क्षणात कोसळतात आणि अनेक कुटुंबांचे हसते-खेळते संसार काही सेकंदांमध्ये धुळीस मिळवतात, ही बाब केवळ चिंताजनक नसून संपूर्ण व्यवस्थेच्या गुन्हेगारी निष्काळजीपणावर आणि भ्रष्ट मनोवृत्तीवर शिक्कामोर्तब करणारी आहे. दर वर्षी असा एखादा मोठा अपघात होतो. निष्पाप बालके, महिला आणि नागरिक मृत्युमुखी पडतात. ढिगाऱ्याखालून आक्रोश करणारे मृतदेह आणि जखमींना बाहेर काढले जाते. नेतेमंडळींचे ताफे घटनास्थळी धाव घेतात, कॅमेऱ्यासमोर दुःखाश्रू ढाळले जातात, मृतांच्या नातेवाईकांसाठी काही लाखांच्या सानुग्रह अनुदानाची घोषणा होते आणि प्रशासनाकडून 'स्ट्रक्चरल ऑडिट' सक्तीचे करण्याचे नगारे वाजवले जातात; परंतु काही दिवसांच्या गदारोळानंतर आणि प्रसारमाध्यमांचा कॅमेरा दुसऱ्या एखाद्या ताज्या विषयाकडे वळल्यानंतर या विषयावर कायमचा पडदा पडतो. दुर्घटनांची कारणे शोधण्यासाठी तज्ज्ञांच्या उच्चस्तरीय समित्या स्थापन होतात, ते शेकडो पानांचे अहवाल सादर करतात; पण त्या अहवालांचे पुढे काय होते? ते प्रशासनाच्या लाल फितीच्या कारभारात धूळखात पडून राहतात आणि पुढच्या पावसाळ्यात नव्या इमारतीच्या दुर्घटनेची वाट पाहत आपण सगळे पुन्हा मूग गिळून बसतो.

निष्पाप नागरिकांचा बळी घेणारी ही भयावह चक्रव्यूहाची शृंखला तोडणार तरी कोण, हा प्रश्न आज प्रत्येक नागरिकाच्या मनात निर्माण झाला आहे. एखादी इमारत ५० ते ६० वर्षे भक्कमपणे उभी राहणे हे स्थापत्यशास्त्राचे सर्वसामान्य गणित असते. जुन्या काळातील दगड-सुर्खीच्या इमारती आज शंभर वर्षांनंतरही उभ्या आहेत, मग आधुनिक तंत्रज्ञान, प्रगत सिमेंट आणि कॉम्प्युटर डिझायनिंगच्या युगात अवघ्या दहा ते बारा वर्षांमध्ये एखादी इमारत आतून कमकुवत होऊन कोसळतेच कशी, या प्रश्नाचे उत्तर शोधताना आपल्याला बांधकाम क्षेत्राला ग्रासलेल्या भ्रष्टाचाराच्या आणि लालचीपणाच्या वाळवीकडे थेट पहावे लागेल. या दुर्घटनांमागे प्रामुख्याने तीन मोठी कारणे आहेत- बिल्डर, पालिका अधिकारी आणि राजकीय वरदहस्त यांची गुन्हेगारी साखळी. पहिले कारण म्हणजे निकृष्ट दर्जाचे बांधकाम आणि पैशांची हाव. अधिक नफा कमावण्याच्या हव्यासापोटी कंत्राटदार आणि बिल्डर इमारतीच्या पायाशीच तडजोड करतात. बांधकामात वापरले जाणारे सिमेंट, पोलाद यांची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट असते. वाळूऐवजी निकृष्ट दर्जाची डस्ट वापरणे, योग्य काँक्रीट क्युरिंग न करणे आणि इमारतीच्या रचनेत पळवाटा शोधणे हे प्रकार सर्रास चालतात. दुसरे कारण म्हणजे नियोजनशून्य आणि बेकायदेशीर विकास. भिवंडी, मुंब्रा, उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली यांसारख्या शहरांमध्ये अनधिकृत आणि अर्ध-अधिकृत इमारतींचे पेव फुटले आहे. अत्यंत अरुंद जागेत सहा-सात मजल्यांच्या इमारती उभ्या राहतात. पाण्याच्या निचऱ्याची सोय नसणे, सतत पाझरणारे ड्रेनेजचे पाणी इमारतीच्या पायात साचणे आणि निकृष्ट स्लॅबमुळे इमारतीचे आयुष्य काही वर्षांत संपुष्टात येते. तिसरे कारण म्हणजे स्थानिक प्रशासनाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष. महापालिका आणि नगरपालिकेच्या नगररचना व प्रभाग समितीच्या अधिकाऱ्यांच्या नाकाखाली ही बेकायदा आणि निकृष्ट बांधकामे उभी राहतात. स्थानिक बीट कर्मचाऱ्यापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांना या बांधकामांची खडान्‌खडा माहिती असते; परंतु 'हप्तेबाजी' आणि लाचखोरीच्या संस्कृतीमुळे हे सर्व अधिकारी डोळ्यांवर कातडे ओढून गप्प बसतात. इमारत कोसळते, तेव्हा हेच अधिकारी सोयीस्करपणे 'ती इमारत अनधिकृत होती' असे सांगून हात वर करतात. इमारत कोसळल्यानंतर प्रशासनाकडून ज्या शब्दाचा सर्वात जास्त जप केला जातो, तो म्हणजे 'स्ट्रक्चरल ऑडिट'. महाराष्ट्राच्या महापालिका कायद्यानुसार ३० वर्षांपेक्षा जुन्या इमारतींचे दर तीन वर्षांनी तर त्याहून कमी वयाच्या इमारतींचे ठराविक कालावधीत 'स्ट्रक्चरल ऑडिट' करणे बंधनकारक आहे; परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय आहे? आज बहुतांश ठिकाणी स्ट्रक्चरल ऑडिट हा केवळ एक प्रशासकीय आणि कागदी सोहळा बनून राहिला आहे. सोसायट्या आर्थिक खर्चाच्या भीतीपोटी किंवा कायदेशीर कटकटींमुळे ऑडिट टाळतात, तर दुसरीकडे केवळ कागदपत्रे पूर्ण करण्यासाठी नामांकित आणि निष्पक्ष तज्ज्ञांऐवजी अत्यंत स्वस्तात 'ऑल ओके'चे दाखले देणाऱ्या बोगस एजन्सींची मदत घेतली जाते. अनेकदा प्रामाणिक ऑडिटमध्ये इमारत 'धोकादायक' किंवा 'तातडीने रिकामी करण्याची गरज असलेली' (सी १ कॅटेगरी) म्हणून घोषित केली जाते; परंतु अशा अहवालानंतरची शोकांतिका अधिक गंभीर असते. पहिले म्हणजे, इमारतीतील मध्यवर्गीय किंवा गरीब रहिवाशांकडे पुनर्विकासासाठी किंवा मोठ्या दुरुस्तीसाठी आवश्यक असलेला लाखो रुपयांचा निधी नसतो. दुसरे म्हणजे पालिका प्रशासन इमारतीवर 'धोकादायक'ची नोटीस चिकटवून मोकळे होते. रहिवाशांना तातडीने इमारत खाली करण्याचे आदेश दिले जातात; पण प्रश्न असा उद्‌भवतो, की तिथल्या शेकडो कुटुंबांनी जायचे कुठे? स्थानिक प्रशासनाकडे किंवा सरकारकडे या नागरिकांसाठी कोणतीही सुरक्षित आणि सन्मानजनक तात्पुरत्या निवाऱ्याची किंवा संक्रमण शिबिरांची व्यवस्था नसते. परिणामी, बेघर होण्याच्या भीतीपोटी आणि उघड्यावर येण्यापेक्षा नागरिक 'देवाची मर्जी' म्हणून त्याच धोकादायक इमारतीत जीव मुठीत धरून राहणे पसंत करतात. महापालिका नोटीस चिकटवून आपली कायदेशीर जबाबदारी संपल्याचा दावा करते आणि दुर्घटना घडल्यास रहिवाशांवरच दोष ढकलते. कोणतीही मोठी दुर्घटना घडली, की राज्य सरकार किंवा महापालिका तज्ज्ञांची एक उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन करते. ही समिती काही महिन्यांमध्ये शेकडो पानांचा तपास अहवाल सादर करते. त्यात इमारत कशी पडली, काँक्रीट कसे कमकुवत होते, कोण जबाबदार होते आणि भविष्यात काय करायला हवे, याचे मुद्देसूद आणि तांत्रिक विश्लेषण असते; परंतु आजपर्यंतच्या कोणत्याही दुर्घटनेच्या अहवालाची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली दिसलेली नाही.

एकूणच आजवर किती भ्रष्ट बिल्डरांना किंवा पालिका अधिकाऱ्यांना इमारत कोसळल्याच्या गुन्ह्याखाली जन्मठेपेची वा कठोर शिक्षेची शिक्षा झाली आहे? हा आकडा अत्यंत नगण्य आहे. फाईल्स एका टेबलवरून दुसऱ्या टेबलवर फिरत राहतात, काळाच्या ओघात लोकांचा राग शांत होतो, नवीन घटना घडते आणि प्रशासकीय अनास्थेचा हा प्राणघातक खेळ पुन्हा नव्याने सुरू होतो. या संपूर्ण चौकटीत 'जबाबदारी' हा शब्द पूर्णपणे गायब झाला आहे. बिल्डर सांगतो, की त्याने सर्व परवानग्या घेतल्या होत्या. पालिका अधिकारी सांगतात, की आम्ही नोटीस दिली होती आणि रहिवासी म्हणतात, की प्रशासनाने आमचे पुनर्वसन केले नाही. या परस्परांवर आरोप-प्रत्यारोप करण्याच्या खेळाचा शेवट मात्र निष्पाप नागरिकांच्या रक्ताने आणि चिमुकल्यांच्या आक्रोशाने होतो. अलिकडेच भिवंडीमध्ये कोसळलेल्या इमारतीसारख्या घटनांची पुनरावृत्ती रोखायची असेल, तर केवळ शोक व्यक्त करणे किंवा चौकशीच्या घोषणा करणे पुरेसे नाही. यासाठी संपूर्ण व्यवस्थेत कठोर आणि क्रांतिकारी बदल करणे अत्यंत गरजेचे आहे. 'स्ट्रक्चरल ऑडिट'ची प्रक्रिया मानवी हस्तक्षेपापासून मुक्त आणि पूर्णपणे डिजिटल असायला हवी. महापालिकेने मान्यताप्राप्त, निष्पक्ष आणि उच्च दर्जा असलेल्या स्ट्रक्चरल अभियंत्यांची पॅनेल यादी जाहीर करायला हवी. प्रत्येक इमारतीचा ऑडिट अहवाल थेट पालिकेच्या अधिकृत पोर्टलवर सार्वजनिकरित्या उपलब्ध हवा. घर खरेदी करणाऱ्या किंवा भाड्याने राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाला त्या इमारतीची तांत्रिक क्षमता काय आहे, हे पाहण्याचा कायदेशीर अधिकार असावा.

एखादी इमारत उभारणीनंतर दहा ते पंधरा वर्षांच्या आत कोसळत असेल, तर तो केवळ 'अपघात' न मानता गुन्हेगारी स्वरूपाचा पाशवी मनुष्यवध मानला गेला पाहिजे. संबंधित बिल्डर, कंत्राटदार, वास्तुविशारद आणि त्या इमारतीचे प्लॅन मंजूर करणारे तसेच तत्कालीन पालिका अधिकारी या सर्वांवर भारतीय न्याय संहितेच्या गंभीर कलमांखाली गुन्हे दाखल झाले पाहिजेत. इतकेच नव्हे तर, बाधितांना भरपाई देण्यासाठी संबंधित दोषी बिल्डर आणि अधिकाऱ्यांची खाजगी मालमत्ता जप्त करून लिलाव केला पाहिजे. नागरिकांनी धोकादायक इमारती स्वतःहून रिकाम्या कराव्यात असे वाटत असेल, तर त्यांच्या तात्पुरत्या निवाऱ्याची जबाबदारी सरकारने किंवा संबंधित पालिकेने स्वीकारली पाहिजे. सध्या अस्तित्वात असणाऱ्या संक्रमण शिबिरांची अवस्था नरकापेक्षा वाईट असते. तिथे पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि सुरक्षितता नसते. त्यामुळे नागरिकांना हक्काचा, स्वच्छ आणि सुरक्षित तात्पुरता निवारा किंवा घरभाड्याची थेट रक्कम पुरवणारे ठोस धोरण राबवले पाहिजे. ●

# नागपंचमी एक उत्सव

**भारतीय संस्कृतीत सर्पपूजेला एक विशेष धार्मिक महत्व आहे आणि त्याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे नागपंचमी हा सण. हा सण श्रावण महिन्याच्या शुद्ध पंचमीला साजरा केला जातो. नागपंचमी म्हणजे सर्प किंवा नाग या प्राण्याच्या पूजेचा दिवस. हा सण भारतात विशेषतः ग्रामीण भागात साजरा केला जातो.**



**अंकुश शिंगाडे**

नागपंचमी हा हिंदूचा सण म्हणून साजरा केला जातो. पण हा हिंदूचाच सण नाही तर तो सर्व धर्मीयांचा सण आहे. जे जे नागाला मानतात.पण आम्ही तसे न समजता या सणाला हिंदूचा सण म्हणून मर्यादा घातलेली आहे.

मुळात साप दिसला की माणसाच्या मनात धस्स होतं. कोणी धडधाकट असला तर त्याची मारायची इच्छा होते. कोणी म्हणतात साप विषारी आहे. मारले-ले बरे. असे असंख्य साप मारले जातात. साप हा शेतकऱ्यांचा शत्रू असला तरी.

सापाच्या प्रजातीत नाग ही देखील प्रजाती मोडते. नाग हा सापाचा वंश. पण या भारतात पुर्वी नागवंश होता. या नागवंशीय लोकांचा व सापाचा काही संबंध जरी नसला तरी ही नागवंशीय मंडळी साप पालन करीत असल्याने या नागवंशीयांनाच पुढे सापाचे वंशज मानण्यात आले.

सापांना पुर्वी मारत असत. विषारी आहे हे पाहून. काही कालखंडानंतर समजलं की हे साप विषारी जरी असले तरी ते शेतकऱ्यांचे मित्रच आहेत. म्हणून सापाला मारणे बंद करावे. तरीही सापाला मारणे बंद झाले नाही. म्हणून लोकांनी साप मारणे एक दिवस तरी बंद करावे यासाठी नागपंचमी उत्सव मनविण्यात येवू लागला. पण हे मुळ कारण जरी असलं तरी पुढील काळात याला आध्यात्मिक पार्श्वभूमी मिळाली.

नागपंचमी हा सण साजरा करण्यामागे काही आध्यात्मिक पार्श्वभूमी पुढीलप्रमाणे

१) श्रीकृष्णाने कालिया नागाचा पराभव करुन ज्या दिवशी परत आला.तो दिवस नागपंचमी म्हणून साजरा केला जातो.

२) तक्षक नागाने अपराध केला. या अपराध्याला शिक्षा म्हणून राजा जनमेजयान याने सर्पयज्ञ केला, तेव्हा तक्षक इंद्राला शरण गेला. पुढे ओम इंद्राय स्वाहा म्हणत राजाने अग्नीत इंद्राचीही आहूती दिली.अर्थात अपराधीला शरण देणाराही तेवढाच दोषी समजत राजाने ते कृत्य केले. निश्चीतच सापाची संख्या कमी होत होती. हे आस्तीक मुनीच्या लक्षात येताच त्यांनी घोर तप केले. या तपातून त्यांनी राजा जनमेजयानला प्रसन्न केलं. राजा जनमेजयानने आस्तीक मुनीला वर मानायला लावला. त्यात या मुनींनी सर्पयज्ञ थांबवण्याची विनंती केली. तो दिवस नागपंचमी उत्सव म्हणून साजरा होतो.

३) सत्येश्वरी नावाची कनिष्ठ देवी. सत्येश्वर नावाचा तिचा भाऊ.त्याला सापाने दंश करताच त्याचा मृत्यू झाला होता. दुसऱ्या दिवशी ती भाऊ मरण पावल्याने शोकसागरात डुबली होती. पण प्रत्यक्ष नागराजाने सत्येश्वरीच्या रुपात येवून सत्येश्वरीला दर्शन दिले व घाबरु नको मी इथेच आहे म्हणत ते अंतर्धान पावले. त्यातच या सत्येश्वर रुपातील नागराजाने सत्येश्वरीला नवीन कपडे दिले. त्यामुळे या दिवशी स्रीया नवीन कपडे घालतात. नागदेव प्रसन्न झाल्यावर सत्येश्वरीने वचन मागितले.ते वचन सत्येश्वरीच्या हातावर उमटले. तीच मेहंदी होय. स्रीया या दिवशी मेहंदीही लावतात. नागराज अंतर्धान पावत दुसऱ्या दिवशी भेटण्याचे वचन देवून गेला. शोकसागरातून बाहेर निघतात सत्येश्वरी या नागराजाला शोधायला जंगलात गेली. तेव्हा जंगलात सत्येश्वराने दर्शन दिले. तेव्हा जंगलात वेलीवर आपल्या बहिणीला सत्येश्वराने झोकेही दिले. अर्थात या दिवशी स्रीया झोकेही खेळतात.

४) चौथी आध्यात्मिक गोष्ट म्हणजे एका शेतकऱ्याने या दिवशी शेतीत नांगरणी केली. त्यात तीन सापाची पिल्लं मरण पावली. म्हणून क्रोधी झालेल्या नागीणीने बदल्याच्या भावनेने रात्री येवून दोन बहिणी, तो शेतकरी व त्याच्या पत्नीला चावा घेतला.पण एक बहिण सुटली. त्यामुळे तिलाही दंश करण्यासाठी ती नागीण दुसऱ्या दिवशी आली. तेव्हा तिनं पाहिलं की या तिसऱ्या मुलीनं आपल्यासाठी दुध ठेवलं आहे. पुजाविधीही केलेला आहे.इत्र फवारले आहे. हे पाहून नागीण खुश झाली व तिने तिच्या संपुर्ण परीवाराला जीवंत केलं.तो नागपंचमीचाच दिवस होता.

**नागपंचमीचं आध्यात्मिक महत्व**

सापाला लोकांनी मारु नये म्हणून. पण आजही सापं भयमुक्त नाहीत. सापाला लोकं मारतात. त्याची तेवढीच तस्करीही करतात.त्याची कातडी विकतात. नव्हे तर जहरही.त्या जहराचा वापर एक नशा म्हणून केला जातो.

मुळात या नागपंचमीच्या दिवशी सापाला इजा होवू नये म्हणून आम्ही भाजी चिरत नाही. कोणत्याही वस्तू चिरत नाहीत. नव्हे तर घनोले वा लाह्यांचा प्रसाद सापाला चढवतात.एवढेच नाही तर या सापाला दूधही आम्ही ठेवतो. पण साप दूध पित नाही. पेल्यास त्याची पचनशक्ती कमजोर होवून त्याला फुफ्फुसाचा त्रास होतो.त्यातच साप मरतात. अर्थात दूध हे सापासाठी विषारी आहे. पण आम्हाला मुळात आध्यात्मिकतेने भाळून ठेवले आहे.सापाला थोडं दूध पाजायचं आहे असे म्हणत दूधासाठी सापाला घेवून फिरणारे गारुडी आम्ही पाहिले आहेत. हे गारुडी सापाचे तोंड शिवतात व त्यांना घेवून फिरतात.आलेल्या पैशातून दारु पितात.गांज्या पितात.नव्हे तर इतर काही शौकंही. म्हणून सरकारने साप पकडण्यावर बंदी घातली आहे.आजही नागद्वारी वारीला जाणाऱ्या कित्येक भक्तांना हे गारुडी सापाची भीती दाखवत अडवतात आणि हवे तेवढे पैसे वसूल करतात.आजही अंधभक्त नागाच्या मंदीरात जातात आणि घराकडे नाग निघाल्यास मारतात.तर आजही नागपंचमी हिंदूचाच सण मानून बऱ्याच इतर धर्मातील लोकं नागाला पूजत नाहीत. तर विदेशी या सापाकडे खाण्यायोग्य वस्तू म्हणून पाहतात. मुळात साप हा विषारी असला तरी तो शेतकऱ्याचा मित्र आहे असे मानणारा समाज जिथे जिथे आहे. मग तो विदेश का असेना. सापाची पुजा नको. पण सापासाठी एक दिवस तरी द्यायलाच हवा. मग तो नागपंचमी म्हणून नाही तर इतर दिवस म्हणून प्रत्येक धर्मीयांनी पाळण्याची गरज आहे. निदान भारतात तरी नागपंचमी म्हणून का असेना......या दिवशी सापाला इजा होवू नये म्हणून हा उत्सव पाळण्याचे बंधन असावे. नागपंचमी हिंदूचा सण म्हणून नाही तर एक उत्सव म्हणून तरी हा सण साजरा करा. आपला एक शेतकऱ्यांचा मित्र म्हणून. ●

# शिक्षणातून सुजाण नागरिक घडतील का?

आजची भारतीय शिक्षण व्यवस्था शैक्षणिक यश, स्पर्धा, गुण आणि कौशल्यविकास याभोवती मोठ्या प्रमाणावर फिरताना दिसते. विद्यार्थ्यांनी उत्तम गुण मिळवावेत, उच्च शिक्षण घ्यावे, रोजगारक्षम कौशल्ये आत्मसात करावीत आणि जागतिक स्पर्धेत स्वतःला सिद्ध करावे, यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू आहेत. ही दिशा आवश्यक आहे; परंतु शिक्षणाचा खरा उद्देश केवळ कुशल मनुष्यबळ निर्माण करणे एवढाच आहे का? देशाला कुशल व्यक्तींबरोबरच संवेदनशील, प्रामाणिक, शिस्तप्रिय आणि जबाबदार नागरिकांचीही गरज आहे.



आज समाजात अनेक समस्या आपल्या डोळ्यांसमोर आहेत. वाहतुकीचे नियम न पाळणे, सिग्नल तोडणे, सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करणे, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता निर्माण करणे, रांगेचे भान न ठेवणे, नियमांचा सोयीप्रमाणे अर्थ लावणे आणि 'माझे काम आधी' ही मानसिकता वाढणे या केवळ प्रशासनाच्या समस्या नाहीत; त्या आपल्या नागरी संस्कारांशी जोडलेल्या समस्या आहेत.

रस्त्यावर सिग्नल असतो, नियम असतात, दंडाची तरतूद असते, सीसीटीव्ही कॅमेरे असतात; तरीही नियमभंग होत राहतो. प्रशासन दंड वाढवते, निरीक्षण यंत्रणा मजबूत करते, पण समस्या पूर्णपणे संपत नाही. कारण बाहेरून लावलेली शिस्त काही काळ टिकू शकते; मनातून स्वीकारलेली शिस्तच आयुष्यभर टिकते. प्रत्येक नागरिकाच्या मागे पोलीस किंवा प्रत्येक चौकात कॅमेरा उभा करणे शक्य नाही. म्हणूनच प्रश्न कायद्याचा कमी आणि संस्कारांचा अधिक आहे.

याच ठिकाणी शिक्षणाची खरी भूमिका सुरू होते. नैतिक शिक्षण म्हणजे उपदेश नव्हे. मूल्यशिक्षणाचा तास घेऊन विद्यार्थ्यांना काही सुविचार लिहायला लावणे किंवा पाठ्यपुस्तकातील नैतिक धडे शिकवणे म्हणजे नैतिक शिक्षण नव्हे. नैतिकता ही केवळ सांगण्याची गोष्ट नाही; ती अनुभवण्याची आणि आचरणात आणण्याची गोष्ट आहे.

एखाद्या विद्यार्थ्याने 'स्वच्छता चांगली आहे' हे पाठ करण्यापेक्षा स्वतः शाळेचा परिसर स्वच्छ ठेवला, 'प्रामाणिकपणा महत्त्वाचा आहे' हे ऐकण्यापेक्षा कठीण प्रसंगी प्रामाणिकपणाची निवड केली, 'दुसऱ्याचा आदर करा' हे वाचण्यापेक्षा मतभेद असतानाही समोरच्याचे मत शांतपणे ऐकले, तर ते खरे मूल्यशिक्षण ठरेल.

म्हणून शाळेतील नैतिक शिक्षण कृतीप्रधान आणि अनुभवाधारित असले पाहिजे. समूहचर्चा, भूमिका-नाट्य, वास्तविक जीवनातील प्रसंग, समाजोपयोगी सेवा, सामूहिक निर्णयप्रक्रिया, समस्या-निराकरण, 'का?' आणि 'कसे?' या प्रश्नांवर विचार, आत्मपरीक्षण आणि सामाजिक जबाबदारीचे उपक्रम यांचा त्यात समावेश असला पाहिजे. मूल्ये शिकवून नव्हे, जगून रुजतात.

**सुनील गवळी**

जगातील काही देशांनी या बाबतीत महत्त्वपूर्ण प्रयोग केले आहेत. जपानमधील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शाळेच्या वर्गखोल्या आणि परिसर स्वच्छ ठेवण्यात सहभागी केले जाते. त्यामुळे स्वच्छता ही दुसऱ्याने करून द्यायची सेवा न राहता स्वतःचे कर्तव्य बनते. सिंगापूरमध्येही लहान वयापासून नागरी नियम, सार्वजनिक वर्तन आणि सामाजिक जबाबदारी यांना महत्त्व दिले जाते. कायद्याची भीती असतेच; पण त्याचबरोबर नागरिकांच्या मनात नियमांविषयीची जाणीव निर्माण केली जाते.

भारताने कोणत्याही देशाची नक्कल करण्याची गरज नाही. आपल्या संस्कृतीत तर कर्तव्य, संयम, सहअस्तित्व, परोपकार आणि 'वसुधैव कुटुंबकम्' यांसारखी जीवनमूल्ये प्राचीन काळापासून आहेत. परंतु ही मूल्ये केवळ ग्रंथांमध्ये आणि भाषणांमध्ये न राहता दैनंदिन जीवनात उतरली पाहिजेत.

शाळा ही केवळ परीक्षा आणि गुणांची तयारी करणारी संस्था नसून नागरिक घडविणारी प्रयोगशाळा झाली पाहिजे. विद्यार्थ्याने शाळेत रांगेत उभे राहणे, सार्वजनिक वस्तूंची काळजी घेणे, कचरा योग्य ठिकाणी टाकणे, वेळेचे भान ठेवणे, दुसऱ्याच्या मताचा आदर करणे, गरजूंना मदत करणे आणि नियमांचे पालन करणे शिकले, तर त्याच्यातील नागरिक घडण्यास सुरुवात झाली असे समजावे. मात्र ही जबाबदारी केवळ शाळेची नाही. कुटुंब, शाळा आणि समाज या तिन्हींच्या वर्तनातून मुलांचे संस्कार घडतात. शाळेत मुलाला वाहतुकीचे नियम शिकवायचे आणि बाहेर पडल्यावर पालकांनीच सिग्नल तोडायचा, असे झाले तर मुलाला मिळणारा संदेश कोणता? मुलांना आपण काय सांगतो यापेक्षा आपण स्वतः काय करतो, हे ते अधिक प्रभावीपणे शिकतात.

म्हणून पालकांचे आचरण, शिक्षकांचे व्यक्तिमत्त्व आणि समाजाचे सार्वजनिक वर्तन हेच मुलांसाठी जिवंत पाठ्यपुस्तक आहे.

कायदे आवश्यक आहेत. नियम आवश्यक आहेत. दंडही आवश्यक आहे. परंतु कायदा बाह्य वर्तन नियंत्रित करू शकतो; संस्कार अंतःकरणाला दिशा देतात. कायदा 'पकडले जाऊ' या भीतीने नियम पाळायला शिकवतो; नैतिकता 'हे चुकीचे आहे' या जाणिवेतून नियम पाळायला शिकवते. या दोन्हींच्या संगमातून आदर्श नागरिक घडतो.

आज भारताला केवळ डॉक्टर, अभियंते, शिक्षक, अधिकारी, तंत्रज्ञ आणि कुशल कामगारांची गरज नाही. भारताला प्रामाणिक अधिकारी, संवेदनशील डॉक्टर, कर्तव्यनिष्ठ शिक्षक, विवेकी मतदार, जबाबदार वाहनचालक आणि सार्वजनिक हिताला स्वतःच्या स्वार्थापेक्षा महत्त्व देणारे नागरिक आवश्यक आहेत.

शिक्षणाने विद्यार्थ्याला केवळ 'काय शिकायचे?' एवढेच सांगून चालणार नाही; तर 'का शिकायचे?', 'समाजासाठी माझी भूमिका काय?', 'माझ्या कृतीचा इतरांवर काय परिणाम होतो?' आणि 'स्वातंत्र्यासोबत माझी जबाबदारी कोणती?' हेही शिकवले पाहिजे.

देशाचा विकास केवळ मोठ्या रस्त्यांनी, उंच इमारतींनी, आधुनिक तंत्रज्ञानाने किंवा आर्थिक प्रगतीने होत नाही. देशाचा खरा विकास तेव्हा होतो, जेव्हा त्याचे नागरिक नियमांचा आदर करतात, सार्वजनिक संपत्तीला स्वतःची संपत्ती समजतात, दुसऱ्याच्या अधिकाराचा आदर करतात, पर्यावरणाची काळजी घेतात आणि संकटाच्या वेळी 'मी'पेक्षा 'आपण' या भावनेने उभे राहतात.

म्हणूनच आज शिक्षणव्यवस्थेसमोर एक मूलभूत प्रश्न उभा आहे की आपण विद्यार्थ्यांना केवळ यशस्वी बनवणार आहोत की चांगला माणूस आणि सुजाण नागरिकही घडवणार आहोत? या प्रश्नाचे उत्तर आपल्या शिक्षणाच्या दिशेला ठरवणारे आहे. कारण शिक्षणाचा अंतिम उद्देश केवळ रोजगार मिळवून देणे नसून, जीवनाला मूल्य देणे आणि समाजाला दिशा देणे हा आहे. उद्याचा भारत आजच्या वर्गखोल्यांमध्ये घडत आहे. म्हणूनच आजच्या शिक्षणाने केवळ हुशार विद्यार्थी नव्हे, तर विवेकी नागरिक केवळ कुशल मनुष्यबळ नव्हे, तर संवेदनशील माणूस आणि केवळ स्पर्धक नव्हे, तर जबाबदार समाजघटक घडवला पाहिजे. शिक्षणाचे खरे यश गुणपत्रिकेत दिसत नाही. ते नागरिकांच्या आचरणात दिसते. ●

# ‘गणपतीची भिंत...!’



**आ**ठवणींच्या रंगांनी जपलेलं कोकणचं पावित्र्य नजरेसमोर उभे राहते.

कोकण म्हटलं की डोळ्यांसमोर उभं राहते ती सगळ्यांच्या हृदयात खोलवर रुजलेली गणपती बाप्पावरील अपार श्रद्धा.

कोकणच्या माणसासाठी गणेशोत्सव हा केवळ सण नसतो; तो असतो मातीशी, घराशी, देवाशी आणि बालपणीच्या आठवणींशी जोडलेला एक भावनिक सोहळा. गणपतीच्या आगमनाच्या चाहुलीनेच गावातील वातावरण बदलून जायचं. घरांची साफसफाई, अंगणाची सारवणूक, पूजेची तयारी, नैवेद्याची लगबग आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे गणपतीची भिंत!

कोकणातील अनेक जुन्या घरांमध्ये गणपतीच्या विराजमान होण्याची जागा म्हणजे घरातील एखादं साधं कोपऱ्यातलं स्थान नव्हतं; ते देवाचं स्थान होतं. त्या जागेला एक वेगळंच पावित्र्य लाभलेलं असायचं. गणपतीचा पाट, गणपतीची भिंत आणि त्या परिसरातलं वातावरण याकडे अत्यंत श्रद्धेने पाहिलं जायचं.

गणपतीच्या पाटाला चुकून साधा पाय लागला तरी मनात अपराधाची भावना निर्माण व्हायची. लगेच हात जोडले जायचे. कारण तो केवळ लाकडाचा पाट नव्हता; त्या पाटावर बाप्पा विराजमान होणार होते.

ही भावना शब्दांत मावणारी नाही. ही भावना जगावी लागते अनुभवावी लागते.

गणपतीची भिंत भिंत नव्हे, श्रद्धेचं चित्रमंदिर!

गणपतीची भिंत म्हणजे घराच्या चार भिंतींपैकी एक भिंत नव्हती. ती घराच्या श्रद्धेची, संस्कृतीची आणि कलात्मकतेची जिवंत साक्ष होती.

गणेशोत्सव जवळ आला की त्या भिंतीची स्वच्छता केली जायची. जुन्या रंगाचे थर काढले जायचे. शेणाने सारवलेल्या घराचा मंद सुगंध, मातीचा गंध आणि नव्या रंगांची चाहूल या सगळ्यातून गणपतीच्या आगमनाची चाहूल लागायची.

**धनंजय शेटये**

दरवर्षी त्या भिंतीवर नवं चित्र उमटायचं.

कधी श्रीकृष्णाची बासरी, कधी भगवान शंकराची ध्यानमग्न मुद्रा, कधी विष्णूचं रूप, कधी हनुमानाची भक्तिभावपूर्ण प्रतिमा, तर कधी विविध देवदेवतांची सुंदर चित्रं.

एक साधी भिंत कलाकाराच्या हातून देवघर बनायची.

त्या चित्रांमध्ये केवळ रंग नसत. त्यात कलाकाराचा घाम असायचा, कौशल्य असायचं, श्रद्धा असायची आणि घरच्या माणसांचा आनंद असायचा.

सदा सावंत गणपतीच्या भिंतीवर रंग भरणारा अवलिया कलावंत

आमच्या गावात या परंपरेचा एक अविभाज्य भाग म्हणजे सदा सावंत.

गणपतीच्या भिंतीवर चित्र काढण्याचं त्यांचं कसब म्हणजे जणू काही देवानेच त्यांच्या हातात कुंचला दिलेला असावा!

गणेशोत्सव जवळ आला की सदाची मागणी प्रचंड वाढायची. एका घरातून दुसऱ्या घरात, तिथून तिसऱ्या घरात त्याचा कुंचला अखंड फिरत राहायचा.

रात्र झाली तरी काम थांबायचं नाही.

कधी पहाटेची चाहूल लागायची, कधी कोंबड्याचा आरव ऐकू यायचा; पण सदाच्या हातातील कुंचला मात्र थांबायचा नाही. अनेकदा गणपतीच्या पूजेच्या दिवशी पहाटे सहा वाजेपर्यंत तो जागा राहून घरांच्या भिंती रंगवून द्यायचा.

आणि विशेष म्हणजे अवघ्या अर्ध्या तासात तो अशी सुंदर चित्रं उभी करायचा की पाहणाऱ्याच्या डोळ्यांचं पारणं फिटायचं!

आजच्या काळात आपण एखाद्या गणपतीच्या मूर्ती बनविण्यासाठी गणपतीचा साचा, प्रिंट, स्टिकर किंवा डिजिटल प्रोजेक्टरचा आधार घेतो. पण सदासारख्या कलाकारांच्या मन:पटलावर असंख्य कलाकृती अवतरत असतात, हातात कुंचला म्हणजेच त्यांचा साचा.

पूर्वी तर तो कोणताही साचा न वापरता हातानेच गणपतीची मूर्ती घडवायचा, हे आठवलं की त्याच्या कलाकौशल्याची खरी उंची जाणवते.

अशा कलाकारांच्या हातून केवळ चित्रं तयार होत नव्हती

एका पिढीच्या आठवणी रंगवल्या जात होत्या.

नागोबाची भिंत निसर्ग आणि श्रद्धेचं नातं

गणपतीच्या भिंतीसोबतच कोकणातील घरांमध्ये नागपंचमीच्या निमित्ताने नागोबाची भिंत हीसुद्धा असायची.

गणपतीच्या भिंतीच्या उजव्या बाजूला नागोबाची भिंत असायची. तिचीही स्वच्छता, रंगलेपण आणि सजावट केली जायची.

नागपंचमीच्या दिवशी त्या भिंतीवर नागदेवतेचं चित्र काढलं जायचं. नागोबासाठी स्वतंत्र पाट असायचा.

ही परंपरा केवळ धार्मिक विधी नव्हती. त्यामध्ये आपल्या पूर्वजांनी निसर्गातील प्रत्येक जीवाविषयी जपलेला आदर दडलेला होता.

नाग म्हणजे भिती नव्हे, तर निसर्गाचा एक भाग.

देव म्हणजे केवळ मंदिरातला देव नव्हे, तर आपल्या सभोवतालच्या सृष्टीतही देवत्व आहे ही जाणीव अशा परंपरांतून नकळत पुढच्या पिढीकडे पोहोचत होती.

गणपतीची भिंत आणि दुःख व्यक्त करण्याची अनोखी परंपरा.

गणपतीच्या भिंतीशी जोडलेली आणखी एक हळवी आणि विलक्षण परंपरा होती.

ज्या घरात वर्षभरात कोणाचा मृत्यू झाला असेल, म्हणजेच घरावर सुतकाची छाया आलेली असेल, त्या घरातील गणपतीच्या भिंतीवरील चित्र विद्रूप केलं जायचं किंवा बदललं जायचं.

आजच्या माणसाला ही प्रथा कदाचित विचित्र वाटेल.

पण त्या काळातील माणसाच्या भावविश्वात त्यामागे खोल अर्थ होता.

घरात दुःख असेल तर उत्सवाचं चित्र तसंच कसं ठेवायचं?

मनात दुःखाचा डोंगर असताना भिंतीवर आनंदाचे रंग कसे उमटणार?

म्हणूनच त्या चित्रात बदल केला जायचा.

तो एक प्रकारचा मूक शोक होता.

कुणाला फारसं काही सांगावं लागत नसे. घराची भिंतच सांगायची

‘‘या घरावर दुःखाची सावली आहे’’

किती विलक्षण संवेदनशील होती ती संस्कृती!

आज आपण दुःख व्यक्त करण्यासाठी शब्द शोधतो; त्या काळात एक भिंतही माणसाच्या मनाची भाषा बोलायची.

काळ बदलला आणि भिंतीवरचे रंगही फिके झाले

काळ बदलला.

घरं बदलली.

गावांची रचना बदलली.

माणसांच्या जीवनाची गती बदलली.

आणि या सगळ्यासोबत अनेक जुन्या परंपरांच्या रंगांवर आधुनिकतेची धूळ बसू लागली.

आज झगमगाट आहे. विद्युत रोषणाई आहे. आकर्षक सजावट आहे. मोठमोठे मंडप आहेत. आधुनिक तंत्रज्ञान आहे.

पण त्या सगळ्या प्रकाशझोतात कुठेतरी गणपतीच्या भींतीवरचा साधा रंग, हाताने काढलेलं चित्र आणि त्यामागची श्रद्धा हरवत चालली आहे.

पूर्वी भिंत रंगवण्यासाठी कलाकार शोधावा लागायचा.

आज तयार चित्र मिळतं.

पूर्वी हातात कुंचला असायचा.

आज हातात मोबाईल आहे.

पूर्वी चित्र काढणाऱ्या कलाकाराच्या भोवती मुलांची गर्दी व्हायची.

आज त्या मुलांच्या हातात स्क्रीन आहे.

आणि म्हणूनच प्रश्न पडतो...

आपण प्रगती केली की काहीतरी मौल्यवान मागे सोडलं?

बाप्पाच्या विसर्जनाची वेदना

गणपतीच्या भींतीची आठवण झाली की गणपतीच्या विसर्जनाची आठवणही अपरिहार्यपणे मनात येते.

कोकणात गणपती बसवणं जितकं पवित्र, तितकंच त्याला निरोप देणंही भावनिक असतं.

अकरा दिवस घरात बाप्पाची प्रतिष्ठापना होते.

त्यांची पूजा होते.

आरती होते.

नैवेद्य दाखवला जातो.

घरातील प्रत्येक सदस्य बाप्पाशी मनाने जोडला जातो.

त्या मूर्तीमध्ये आपण आपल्या भावनांचा, श्रद्धेचा, प्रेमाचा आणि आस्थेचा एक मोठा संसार उभा केलेला असतो.

म्हणून विसर्जनाचा दिवस आला की मनाच्या कोपऱ्यात एक अनामिक हुरहूर दाटून येते.

डोळ्यांच्या कडा नकळत ओलावतात.

घरातले वातावरण अचानक शांत होतं.

आणि मनात एकच विचार येतो

‘‘बाप्पा, पुन्हा लवकर या’’

म्हणूनच बाप्पाला निरोप देतानाही त्यांचा सन्मान जपायला हवा.

मूर्ती म्हणजे केवळ माती, रंग आणि आकार नव्हे.

त्या मूर्तीमध्ये आपल्या मनाचा एक तुकडा विसावलेला असतो.

विसर्जन म्हणजे देवाला दूर फेकून देणं नव्हे; तर अत्यंत आदराने, प्रेमाने आणि भक्तिभावाने त्याला पंचमहाभूतांत विलीन करणं.

बाप्पाला खांद्यावर घेऊन जाताना पाय कुठे ठेवतोय, मूर्तीला कसं हाताळतोय, विसर्जनाच्या वेळी तिच्याशी कसं वागतोय यातही आपल्या संस्कृतीचं प्रतिबिंब असायला हवं.

ज्या देवाला अकरा दिवस डोक्यावर घेऊन फिरलो, त्याला शेवटच्या क्षणी अवमानाने वागवणं आपल्या श्रद्धेलाच शोभणारं नाही.

गणपतीची भिंत एक भिंत नाही, एक संस्कृती आहे!

आज जर एखाद्या जुन्या कोकणी घरात गणपतीची भिंत अजूनही जिवंत असेल, तर ती केवळ रंगवलेली भिंत म्हणून पाहू नका.

त्या भिंतीकडे नीट पाहा.

तिथे कदाचित एखाद्या जुन्या कलाकाराचा कुंचला दिसेल.

कदाचित आजोबांची श्रद्धा दिसेल.

कदाचित आजीच्या हातची सारवणूक दिसेल.

कदाचित बालपणीच्या गणपतीची आठवण दिसेल.

कदाचित गावच्या कलाकाराची धावपळ दिसेल.

कदाचित एखाद्या दिवंगत माणसाच्या आठवणीने विद्रूप केलेलं चित्र दिसेल.

आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे

तिथे एका पिढीने पुढच्या पिढीकडे सोपवलेली संस्कृती दिसेल.

परंपरा म्हणजे केवळ जुनी पद्धत नव्हे.

परंपरा म्हणजे आपल्या पूर्वजांनी जगलेलं जीवन आणि आपण पुढच्या पिढीला देत असलेली मूल्यांची शिदोरी.

गणपतीची भिंत जपणं म्हणजे फक्त एका भिंतीवर चित्र काढणं नाही.

ते म्हणजे श्रद्धा जपणं.

कलाकार जपणं.

लोककला जपणं.

घराचं पावित्र्य जपणं.

निसर्गाशी असलेलं नातं जपणं.

आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे

आपल्या मातीशी असलेलं नातं जपणं.

आजही गणपती जवळ आला की मन नकळत त्या जुन्या दिवसांकडे धाव घेतं.

डोळ्यांसमोर ती साधी घरं येतात.

सारवलेली अंगणं येतात.

गणपतीची भिंत दिसते.

भिंतीवर उमटणारे रंग दिसतात.

सदाच्या हातातला कुंचला दिसतो.

पहाटेपर्यंत जागणारा कलाकार दिसतो.

नागोबाची भिंत आठवते.

गणपतीचा पाट आठवतो.

आणि मग आठवतो तो बाप्पाचा निरोप

आरतीचे स्वर हळूहळू विरत जातात.

ढोल-ताशांचा आवाज दूर होत जातो.

मिरवणूक नजरेआड होते.

आणि घरात उरते ती एक शांत पोकळी

काहीतरी हरवल्यासारखी

काहीतरी मागे राहिल्यासारखी

आणि मनाच्या तळाशी फक्त एकच हाक

‘गणपती बाप्पा मोरया

पुढच्या वर्षी लवकर या!’

कारण बाप्पा दरवर्षी येतात आणि जातात

पण त्यांच्या येण्या-जाण्याबरोबर आपल्या मनात उमटणाऱ्या आठवणींचे रंग कधीच फिके होत नाहीत.

गणपतीची भिंत कदाचित काळाच्या ओघात नाहीशी होईल; पण तिच्यावर रंगवलेली श्रद्धा, संस्कृती आणि बालपणीच्या आठवणींचा रंग आपल्या मनाच्या भिंतीवर कायमचा उमटलेला राहील.


हीच आपल्या कोकणची श्रीमंती

हीच आपल्या संस्कृतीची ओळख

आणि हीच गणपती बाप्पाच्या भक्तीची खरी श्रीमंती! ●

# खुशीतही अंतर्मुख करणाऱ्या...


## खोचक रेषा




**‘खो**चक रेषा’अभिमन्यू कुलकर्णी यांचा व्यंगचित्रसंग्रह समकालीन प्रकाशनने प्रकाशित केला आहे. सुरुवातीला, ‘‘रेषांमागचे शब्द’’ मध्ये अभिमन्यू यांनी आपले मनोगत मांडले आहे. व्यंगचित्रकलेची सुरुवात चित्रकलेने होते. शाळकरी वयातच त्यांना चित्रकलेत रस निर्माण झाला. महाराष्ट्र सरकारचे राज्यस्तरावरील बक्षीस मिळाल्याने ते घरात ‘चित्रकार’ ठरले. इंजिनियरिंग कॉलेजमध्ये शिकत असताना, त्यांची चित्रे विविध ठिकाणी प्रकाशित होऊ लागली. या प्रकाशित चित्रांमुळेच त्यांना मुंबईतील आयआयटीच्या इंडस्ट्रियल डिझाईन सेंटरमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम ासाठी प्रवेश मिळून, तेथील अभ्यासक्रम पूर्ण करता आला. त्यांना मुंबईत व्यंगचित्रे काढण्याची संधी मिळाली. सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार वसंत सरवटे यांचे मार्गदर्शन लाभले. विदेशी नियतकालिकांतील, विविध व्यंगचित्रकारांच्या व्यंगचित्रांमुळे त्यांना व्यंगचित्रकलेची जाण आली. त्यांच्या व्यंगचित्रांविषयी विजय तेंडुलकरांनी पत्र लिहून कौतुक केल्याने, त्यांना जणु ऑस्कर मिळाल्याचा आनंद झाला. व्यंगचित्र काढताना माणुसकीवर प्रेम करण्याचा मूलमंत्र त्यांनी दिला. अभिमन्यू यांनी त्यांच्या, सुमारे एक हजार चित्रांमधून, चारशे चित्रे या संग्रहासाठी निवडली आहेत. या पुस्तकात ‘मालिका’ आणि ‘स्फुटचित्रं’ असे दोन विभाग आहेत. पुस्तकाचे मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ अभिमन्यू यांच्या अप्रतिम रेषांनी साकारले आहे.

पहिल्या विभागात एकूण चौदा उपविभाग आहेत. ‘नवा माणूस’ मधील दहा चित्रांतून, मानवी शरीरात काही अत्यावश्यक बदल सुचविले आहेत. बस स्थानकातील प्रवाशांच्या चौकशीला उत्तर देणाऱ्याला, एकूण पाच तोंडे दाखविली आहेत. त्यामुळे त्याला विविध त्रस्त प्रवाशांच्या चौकशीला समर्थपणे तोंड देणे शक्य होईल. ‘जावे त्यांच्या नाटका’मध्ये प्रत्येक जण कसा आपला स्वार्थ साधतो, त्याची खात्री पटते. ‘नव्या युगाची नवी साधने’ फारच अप्रतिम आहेत. कदाचित अशा सुधारणाभावी काळात उत्पादक घडवूनही आणतील. मात्र त्यासाठी त्यांना हे पुस्तक चांगले अभ्यासावे लागेल बरे! ‘अशीही पादत्राणं’ मधील सहा चित्रे पाहताना, काही विशिष्ट कारणासाठी आणि विशिष्ट ठिकाणी वापरल्या जाणाऱ्या पादत्राणांना मानवी भावना निर्माण झाल्या आहेत, असे वाटून जाते. व्हायरल शॉट्स, मधील चित्रे पाहताना अशा विषयांवरही, हास्यचित्रे निर्माण होऊ शकतात याची कल्पना येते. ‘वयम् झालम् खोटम्’ मधील चित्रे ही ज्येष्ठ नागरिकांवर असूनही, ती पाहून गंमत वाटते. त्यामुळे असे नागरिकही खुदकन हसतील. राजकारण आणि चित्रपटसृष्टीसारखं इतर काही धंद्यांचं गुन्हेगारीकरण झालं तर? जिकडे तिकडे कसे गेम पडतील, हे विलक्षण प्रकारे सहा चित्रांतून स्पष्ट होते. ‘गेलं शतक’ आणि ‘आज और कल’ मधील चित्रे भूतकाळातील आणि भविष्यकाळातील कल्पनाविष्कारांतून झालेल्या बदलांची दखल घेत आहेत. ‘दैनंदिन परीक्षा’ मधील अखेरच्या चित्रातून जणू भविष्यवाणीच उमटते आहे. ‘‘आणि परीक्षांचा शेवट - मंडळी, गर्दी भरमसाठ वाढल्याने यापुढे चित्रगुप्ताचा स्कोअर पुरेसा नाही. प्रवेशासाठी, ‘परलोक एंट्रन्स एक्झॅम’ द्यावी लागेल.’’ असे चित्रगुप्ताचा प्रतिनिधी, इच्छुक प्रचंड गर्दीसमोर सांगत आहे.

दुसऱ्या विभागात एकूण बारा, विविध विषयांवर ‘स्फुटचित्रं’ आहेत. घर-संसारमध्ये विविध समाविष्ट पन्नास चित्रे वाचकाला हसवतात आणि अंतर्मुखही करतात. लग्न कोणत्याही कुटुंबातील मोठा आनंदाचा क्षण. एका लग्नातील जेवणावळीत नववधूने नाव घेण्याची परंपरा, अशी पाळली आहे...



लग्नाच्या याद्यांनंतर लावले बाबांच्या कपाळी रोज मलम,

अजयरावांना घास देते आणि

आठवण करून देते ४९८- अ कलम! (सुनेच्या छळाविषयी)...५०.

‘‘जुने द्या! नवे घ्या!’’ ही पाटी पाहून, लोक

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

जुने टीव्ही, वॉशिंग मशीन, कुकर इ. घेऊन रांगेत उभे आहेत. एकाने आपल्या वृद्ध, जुन्या झालेल्या आईबाबांनाच काखेत मारून आणले आहे. पण नवे काय घेणार? असाही प्रश्न कदाचित निर्माण होईल... ‘शहरनामा’तील विविध व्यंगचित्रांतून आजच्या वाढत्या शहरांची दैन्यावस्थाच उघड होते. मुलाखत देणारा तरुण, समोर बसलेल्या तिघांना सांगतो, ‘‘लीक होणारे, तुटलेले पाईप मी नक्कीच चांगले दुरुस्त करू शकेन, सर.’’

कारण मी लीक झालेले, फुटलेले पेपर घेऊनच इंजिनियर झालोय! ‘‘त्याच्या सुहास्य चेहऱ्यावरील आत्मविश्वास लाजवाब!’’ ‘‘फिरता फिरता’’मध्ये भारतीय प्रवासी आता विविध देशांमध्ये भटकू लागले आहेत. परंतु प्रवास केल्याने शहाणपण येतेच असे नाही. हे विविध व्यंगचित्रांतून स्पष्ट होते. ‘‘क्रिकेट : आपला नॅशनल टाईमपास’’ मध्ये क्रिकेटबद्दलची विविध व्यंगचित्रे माणसाला हसवतात, क्रिकेटचे दुष्परिणामही उत्तम प्रकारे स्पष्ट करतात. क्रिकेटमध्ये सट्टेबाजी वाढली आहे. त्यावरील एका व्यंगचित्रात, बॅटिंग करायला जाणाऱ्याशी झालेला संवाद... ‘‘मी त्याला विचारलं, या मालिकेत बॅटिंग अॅव्हरेज किती ठेवणार? तर म्हणाला, वीस, बावीस लाख. त्याने चुकून बेटिंग अॅव्हरेज ऐकलं असावं...’’ आपल्या देशातील, क्रिकेटच्या वाढत्या वेडामुळे, लक्षावधी नागरिक क्रिकेटमध्ये जणु सर्व काही विसरून गेले आहेत! लेखक आणि वाचक दोन्ही असल्याशिवाय, मराठी साहित्य कसे बहरणार? हे ‘‘इये साहित्यिचिये नगरी’’ मध्ये स्पष्ट केले आहे. ‘‘लोक-परलोक’’ मध्ये अभिमन्यू यांनी देव, मानवाकडे कुतूहलाने पाहत असेल तर काय होईल, हे व्यंगचित्रांतून उत्तम प्रकारे मांडले आहे. लाईट, कॅमेरा अॅक्शन, या विभागातील, सिनेमा कलावंत हे अभिमन्यू यांच्या व्यंगचित्रांचे आवडते विषय आहेत. चित्रपटांप्रमाणे गुन्हेगारी जग हेही आपल्या समाजाचे प्रतिबिंब आहे. गुन्हेगारांमध्ये माणुसकी असते की प्रत्येक माणसांमध्ये एक गुन्हेगार दडलेला असतो, ते अभिमन्यू यांच्या विविध चित्रांमधून उत्तम प्रकारे स्पष्ट होते. गुन्हेगारी आणि राजकारण यांच्यातील संबंध अधिकाधिक दृढ होण्याच्या काळात, प्रथम वर्षासाठी प्रवेश देणाऱ्या, चोरांच्या शाळेतील प्रमुख पालकांना सांगत आहे... ‘‘आम्ही गुन्हा करण्याचं आणि अधून मधून पकडले जाण्याचं शिक्षण देतो. अजिबात पकडलं जायचं नसेल तर त्याला राजकारण्यांच्या शाळेत घाला...’’ ‘पुढारी चालीसा’ मध्ये राजकारण्यांविषयीचे विनोद आहेत. राजकारणावरच्या विनोदांचा आणि व्यंगचित्रांचे प्रमाण प्रचंड असते. या व्यंगचित्रांमध्ये, राजकारणी लोकांची वरवर दिसणारी स्वभाववैशिष्ट्ये विचारात न घेता त्यांच्या स्वभावाच्या दुय्यम पैलूंकडे, म्हणजे बालिशपणा, असूया, हावरटपणा अशा भावनांकडे पाहिले, तर त्यातून विनोद निमिण होऊ शकतो. हे अभिमन्यू यांच्या चित्रांतून स्पष्ट होते. ‘‘दुनिया युद्धखोरांची’’मध्ये अभिमन्यू म्हणतात, ‘‘युद्ध आणि दहशतवाद आता जगात ठाण मांडून आहेत. ते आपलं न्यू नॉर्मल आहे.’’ त्यांचे जग कसं चालतं, याविषयी सर्वांनाच उत्सुकता असते. त्यामधून निर्माण झालेले विविध विनोद या विभागात समाविष्ट आहेत. ‘‘...आणि बरंच काही’’ या भागातील व्यंगचित्रांविषयी अभिमन्यू म्हणतात, व्यंगचित्रकार स्वतःच्या विसंगती, चिंता, भ्रमांमध्ये गटांगळ्या खाण्याऐवजी त्यांना चव्हाट्यावर आणतो. त्यामुळे ही व्यंगचित्रे पाहताना जणू आपलेच चित्र आहे, असे वाटून पाहणारा हसून मान डोलावतो, चित्राला दाद देतो! जपानमध्ये ढासळती लोकसंख्या ही सरकारसमोरची एक समस्या आहे, चिंता आहे .त्यावेळी भारतीय प्रतिनिधी सांगतो, ‘‘तुम्ही आम्हाला इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञान द्या. आम्ही तुम्हाला लोकसंख्या वाढीचं तंत्रज्ञान देऊ.’’

या विविध व्यंगचित्रांतून, अनिरुद्ध आपला आणि आपल्या समाजाचा जणु आरसाच आपल्यासमोर धरत आहेत.१९९५मध्ये हिंदुस्तान टाइम्सच्या व्यंगचित्रस्पर्धेत अभिमन्यू यांना, धर्मनिरपेक्षता या संकल्पनेवर काढलेल्या व्यंगचित्राला पहिले बक्षीस मिळाले होते. ते व्यंगचित्र पाहिल्यास आपल्या आणि शेजारच्या देशातील परस्परसंबंधात गेल्या तीस वर्षांत, फारशी सुधारणा न झाल्याचेच जाणवते. अभिमन्यू यांची ‘‘खोचक रेषा’’ कधी टोचते, अस्वस्थ करते, हसवते आणि अंतर्मुखही करते. यामुळेच हे पुस्तक संग्राह्य झाले आहे. ●

**पुस्तकाचे नाव : खोचक रेषा**
**व्यंगचित्रकार : अभिमन्यू कुलकर्णी**
**प्रकाशक : समकालीन प्रकाशन,पुणे.**
**९३७०९७९२८७.**
**पहिली आवृत्ती : १ मे २०२६.**
**पृष्ठे : १६७ मूल्य : रु. ४००/-**

# श्रावण मासाचे महत्त्व


**२५ जुलैपासून श्रावण मासारंभ चालू झाला आहे. आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या काळात भगवान श्री विष्णू महासागरात शेषशय्येवर योगनिद्रा घेत असल्याने सृष्टीचा भार भगवान शिव शंकरांवर पडतो. त्यामुळे या दिवसांत शिव उपासनेला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. श्रावण मसाविषयी शास्त्रीय माहिती या लेखातून जाणून घेऊया.**

**‘भ**गवान श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या ‘श्रीमद्भगवत्गीते’तील संवादात भगवान श्रीकृष्णाने सांगितले आहे, ‘मासांमध्ये (महिन्यांमध्ये) मी ‘मार्गशीर्ष’ मास आहे. याचप्रमाणे शिव आणि सनतकुमार यांच्यामध्ये श्रावणमासाबद्दल पुढील आशयाचा संवाद झाल्याचे पुराणात म्हटले आहे. भोलेनाथ शिव म्हणतात

द्वादशस्वपि मासेषु श्रावणो मेऽतिवल्लभः । श्रवणार्हं यन्माहात्म्यं तेनासौ श्रवणो मतः ।।

श्रवणर्क्षं पौर्णमास्यं ततोऽपि श्रावणः स्मृतः । यस्य श्रवणमात्रेण सिद्धिदः श्रावणोऽप्यतः ।।

अर्थ : १२ मासांतील ‘श्रावण मास’ मला अतिप्रिय आहे. त्याचे माहात्म्य श्रवण करण्यास योग्य आहे. त्यामुळे त्याला ‘श्रावण मास’ असे म्हटले जाते. श्रावण या शब्दाची उत्पत्ती ‘श्रवण’ या शब्दातून झाली आहे. ‘श्रवण’ शब्दाचे २ अर्थ होतात. त्यांपैकी



एक म्हणजे ‘हिंदु पंचांगातील २२ वे नक्षत्र’, असा आहे आणि दुसरा अर्थ ‘श्रवण म्हणजे ऐकणे.’ श्रावणात श्रवणभक्ती केल्याने सिद्धी प्राप्त होतात. त्यामुळेच हा मास अत्यंत पवित्र आणि शुभ मानला जातो.

**जगन घाणेकर**

हिंदु धर्मात पंचांगातील ५ अंगांपैकी ‘नक्षत्र’ या अंगाला अत्यंत महत्त्व आहे. त्यामुळे हिंदु कालगणनेनुसार १२ मासांची नावे ही त्या त्या मासाच्या पौर्णिमेला चंद्र ज्या नक्षत्रात असतो, त्या नक्षत्रानुसार आहेत, उदा. चैत्र मासातील पौर्णिमेला चंद्र ‘चित्रा’ नक्षत्रात असतो; म्हणून त्या मासाचे नाव ‘चैत्र’ आहे. श्रावणातील पौर्णिमेला चंद्र ‘श्रवण’ नक्षत्रात असतो. त्यामुळे त्या मासाचे नाव ‘श्रावण’ आहे. पौर्णिमेला चंद्र ज्या नक्षत्रात असतो, त्या नक्षत्राचे चैतन्य आणि ऊर्जा त्या संपूर्ण मासात अधिक प्रमाणात कार्यरत असते.

**शास्त्रानुरुक्तो बहुपुत्रमित्रः सत्पात्रभक्तिः विजितारिपक्षः । चेज्जन्मकाले श्रवणा हि यस्य प्रेमा पुराणश्रवणे प्रवीणः ।। जातकाभरण**

**अर्थ :** श्रवण नक्षत्रावर जन्माला आलेला मनुष्य शास्त्रप्रेमी, अनेक मित्र असलेला, मुलाबाळांची आवड असणारा, विधायक कार्ये करणारा, शत्रूंवर विजय मिळवणारा, पुराणश्रवण आदींमध्ये रुची असलेला असतो.

हिंदु संस्कृतीचे निर्माते असणाऱ्या ऋषिमुनींना याचे सर्व ज्ञान होते. त्यामुळेच त्यांनी आपल्यावर उत्तम आणि उदात्त संस्कार व्हावेत आणि आपल्याला आवश्यक ते धर्मज्ञान सहजपणे मिळावे, यांसाठी श्रावण मासात अधिकाधिक ग्रंथ, कथावाचन, पारायण, व्रतवैकल्ये, दानधर्म इत्यादी करण्याचे मार्गदर्शन केले आहे. त्यामुळेच वर्षभर मांसाहार करणारे लोक श्रावण मासात मांसाहार पूर्णतः वर्ज्य करतात. बहुतेक घरांत श्री सत्यनारायणाची पूजा अगत्याने केली जाते. श्रावणात प्रत्येक वारानुसार व्रते, विशेष पूजा, उपवास इत्यादी गोष्टी स्त्रिया तर करतातच; पण बहुतेक पुरुषसुद्धा दाढी न करणे, केस न कापणे, तसेच उपवास करणे, घरात श्रीगुरुचरित्र, श्रीनवनाथ माहात्म्य, शिवलीलामृत, शिवपुराण किंवा कुठल्याही धार्मिक ग्रंथांची पारायणे इत्यादी आचारांचे पालन करतातच. त्यामुळे ‘ब्रह्मांडातील ग्रह, तारे आणि नक्षत्रे यांचे मानवी जीवन किंवा चराचर सृष्टी यांवर सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम होतातच’, याचाच हा पुरावा आहे. तात्पर्य काय, तर हिंदु धर्मशास्त्रातील विज्ञान समजून घेतले पाहिजे. त्यामुळे आपल्या जीवनात जे जे उत्तम, उदात्त, उन्नत, महन्मधुर, ते ते घडवण्यासाठी कटिबद्ध असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या मानसिकतेला या ‘श्रवण’ नक्षत्रामुळे आणि ‘श्रावण’ मासामुळे योग्य ते क्रियमाण वापरण्यासाठी भरपूर प्रमाणात बळ मिळते. ●



● मुरुड आझाद चौकात १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनानिमित्त झेंडावंदन करताना मुरुड नगराध्यक्ष आराधना दांडेकर सर्व शाळांचे विद्यार्थी व्यापारी पालकवर्ग व अधिकारी. (छायाचित्र- सुधीर नाझरे)

## चिरनेरमध्ये स्टोर रूमचे लोकार्पण





| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील चिरनेर येथे भारतीय स्वातंत्र्याचा ८० वा. स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दरम्यान भारतीय स्वातंत्र्याच्या ८० व्या. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून, पोस्ट ऑफिस, कृषी महिला बचत गट व ग्रामपंचायत चिरनेर स्टोर रूम या नव्याने उभारण्यात आलेल्या नवीन वास्तूचे लोकार्पण सरपंच भास्कर मोकल यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ध्वजारोहणाचा मान ग्रामपंचायतीचे सफाई कामगार संदेश नारंगीकर यांना देण्यात आला.

दरम्यान स्वातंत्र्य दिनाच्या अनुषंगाने देश प्रेमाची भावना जागवित देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात प्राणाची आहुती देणाऱ्या चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांना अभिवादन करून हुतात्मा स्मारकाच्या ध्वजाला मानवंदना देण्यात आली. तसेच रांजणपाडा येथील शिव चौकातील छत्रपती शिव पुतळ्याला मानाचा मुजरा करून ध्वज फडकविण्यात आला. प्राथमिक केंद्र शाळा चिरनेर, पी पी खारपाटील हायस्कूल व महाविद्यालय यासह परिसरातील अन्य महत्वाच्या ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले यावेळी शाळा महाविद्यालय व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, भाषणे व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून देशप्रेमाची भावना जागविली.

या कार्यक्रमास सरपंच भास्कर मोकल, दीपक कातकरी, सचिन घबाडी, समाधान ठाकूर, अरुण पाटील, प्रफुल्ल खारपाटील यांच्यासह अन्य सदस्य, ग्रामस्थ, प्रतिष्ठित राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती.

# जिल्ह्यात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयांत ध्वजारोहण, देशभक्तीपर नृत्यांचे सादरीकरण करण्यात आले. तसेच ग्रामपंचायत व शासकीय कार्यालयांमध्ये ध्वजारोहणचा कार्यक्रम पार पडला. भर पावसात स्वातंत्र्यदिनाचा उत्साह दिसून आला होता.**

## 'विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन प्रगती करा'

| आगरदांडा | प्रतिनिधी |

विद्यार्थ्यांनी अभ्यासाची आवड निर्माण करून चांगले शिक्षण घेतले पाहिजे. शिक्षणामुळेच जीवनात प्रगती करता येते, महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांसारख्या समाजसुधारकांनी शिक्षणाला विशेष महत्त्व दिले. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन प्रगती करावी आणि आपल्या गावाचे नाव मोठे करावे, असे आवाहन सतीष गवस यांनी ८० व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून बोलत होते.



अलिबाग-मुरूड मेडिकल असोसिएशन व जंजिरा मेडिकल असोसिएशनच्या माध्यमातून केले. याप्रसंगी धर्माज क्रॉप सायन्स आणि शेतकरीमित्र कृषिसेवा केंद्र, पेण यांच्या वतीने मुरूड तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा, शिघ्रे (मराठी माध्यम) येथील १०० आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.

यावेळी अलिबाग-मुरूड मेडिकल असोसिएशन व जंजिरा मेडिकल असोसिएशन अध्यक्ष संजय पाटील, शिघ्रे सरपंच गुलाब वाघमारे, डॉ. अर्चना पाटील, डॉ. मयुर कल्याणी, डॉ. आदेश मोकळ, विष्णू नकर, डॉ. मंगेश पाटील, डॉ. राज कल्याणी, हाफीज कबले, अमोल पाटील, सतिष गवस, डॉक्टर वसीम पेशमाम, सुनील पटेल, डॉ. शकील परदेशी, डॉ. अमित बेनकर, डॉ. संदेश पाटील, डॉ. अनंत जोशी, मुख्याध्यापक संजय जंजिरकर आदिंसह शिक्षक शिक्षिका व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांचा देशभक्तीपर नृत्य कार्यक्रम

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी खांदा कॉलनीतील न्यू होरीझॉन शाळेच्या





सभागृहात देशभक्ती, एकता आणि राष्ट्रीय अभिमानाचा संदेश दिला. उत्तम राष्ट्रनिर्मिती करणे म्हणजेच खरी देशभक्ती या विचारातून कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व, स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या राष्ट्रनायकांचे योगदान आणि देशाप्रती असलेली जबाबदारी यावर प्रेरणादायी भाषण सादर केले. यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीताने सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. भारताची समृद्ध सांस्कृतिक परंपरा आणि विविधता दर्शविणारे आकर्षक नृत्यही विद्यार्थ्यांनी सादर केले. वाद्यसंगीताच्या सुरांनी कार्यक्रमाला सुरेल रंगत आणली. त्यानंतर सादर करण्यात आलेल्या तालबद्ध काव्यप्रकारातून देशभक्तीचा संदेश प्रभावीपणे मांडण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

## श्रमिक विद्यालय चिल्हे येथे विविध कार्यक्रम

| खांब | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम विविध प्रकारच्या कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. रविंद्र मरवडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सचिव धोंडू कचरे, संचालक धनाजी लोखंडे, वसंत मरवडे, सुभाष माटल, सूरज कचरे, मुख्याध्यापक दिपक जगताप यांच्यासह सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थितीत होते. या कार्यक्रमात राष्ट्रीय गीत वंदे मातरम्, राष्ट्र गीत जनगनमण,



राज्यगीत, समुहगान, नृत्ये, त्याचप्रमाणे शालेय स्वच्छता, तंबाखुमुक्त शाळा परिसर प्रतिज्ञा, निपुण भारत प्रतिज्ञा, नवभारत साक्षरता प्रतिज्ञा व झेंडा कवायत, स्वच्छता विषयक जनजागृती आदी कार्यक्रम घेण्यात आले.

## मुरुडमध्ये राज्यगीत सादर

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरूड जंजिरा नगरपरिषद कार्यालयात ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमा दरम्यान नगरपरिषदेच्या प्रांगणात नगराध्यक्षा आराधना दांडेकर व उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांच्या हस्ते सकाळी कार्यालयातील राजे शिवछत्रपती महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यालया जवळ उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी सर एस ए. हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या सुरेल आवाजात वंदे मातरम्, राष्ट्रीय गीत व राज्यगीत सादर करण्यात आले.

स्वातंत्र्य दिनाचा विजय असो, भारत माता की जय, जय जवान जय किसान अशा घोषणा देऊन मानवंदना देण्यात आली.

यावेळी नगराध्यक्षा आराधना दांडेकर, विरेंद्रभगत, पांडुरंग आरेकर, नगमाना खानजादे, यास्मिन कादिरी, मनोज भगत, तमीम ढाकम, मनिष विरुकुड, प्रांजली मकु, देवायानी गुरव, नितीन आंबुर्ले, विजय पाटील, श्रध्दा अपराध, आदेश दांडेकर, प्रमिला माळी, डॉ. राज कल्याणी, सतेज निमकर, अनिकेत जगदाळे, अनिकेत वाजे, प्रकाश आरेकर, नयन कर्णिक, प्रमोद मसाल, अरविंद गायकर, नागरिक, विद्यार्थी, शिक्षक





आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने कार्यक्रमात सहभागी झाले होते.

## स्वातंत्र्यदिनानिमित्त पुस्तकाचे मोफत वाटप

| पाली | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील पाली-सुधागड तालुक्यातील मौजे सिद्धेश्वर गावात स्वातंत्र्यदिनानिमित्त तरुणांनी अनोखा आणि प्रेरणादायी उपक्रम राबविला. शिवाजी कोण होता? हे ज्येष्ठ लेखक गोविंद पानसरे यांचे पुस्तक उपस्थित सर्व मुलांना आणि पालकांना मोफत वाटप करण्यात आले.

लोकशाहीचा उत्सव साजरा करताना आजही एका राजाची आठवण काढली जाते आणि ङ्गराजे पुन्हा जन्माला याफ अशी आर्त हाक



दिली जाते. मात्र, छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा केवळ जयघोष न करता त्यांचे कार्य, विचार आणि इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न सिद्धेश्वर येथील तरुणांनी या उपक्रमातून केला. या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत असून, स्वातंत्र्यदिन केवळ ध्वजारोहण आणि शुभेच्छांपुरता मर्यादित न ठेवता समाजात वैचारिक परिवर्तन घडविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याची भावना व्यक्त होत आहे.



●भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने चिंतामणराव केळकर विद्यालयात शाळेचे अध्यक्ष अमर वार्डे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



## मोठीजुई शाळेत आयडियल क्लासरूमचे उद्घाटन

| चिरनेर | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा मोठीजुई येथे उरण तालुक्यातील पहिल्या आयडियल क्लासरूमचे उद्घाटन महेश म्हात्रे यांच्या हस्ते स्वातंत्र्य दिनाचे अवचित्त साधून करण्यात आले.

विद्यार्थ्यांना आधुनिक, आनंददायी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, तसेच वर्गातील अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक प्रभावी व्हावी, या उद्देशाने शाळेत आयडियल क्लासरूमची निर्मिती करण्यात आली आहे. या वर्गामध्ये विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक साधनांच्या माध्यमातून विविध विषयांचे ज्ञान अधिक सोप्या व मनोरंजक पद्धतीने घेता येणार आहे.

याप्रसंगी डॉ. मनिष ठाकूर, अविनाश ठाकूर, दिपक भोईर, प्रारंभी गावंड, रमाकांत पाटील, गटशिक्षणाधिकारी सागर पवार, केंद्र प्रमुख हसन आवटे, अविनाश नवाले, ग्रामविकास अधिकारी रुपम गावंड, लक्ष्मण भोईर, अमृता भोपी, योगेश भोईर, शशिकांत भोईर, रसिका भोईर, प्रमिला भोईर, उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कौशिक ठाकूर, यतीन म्हात्रे, विश्वनाथ गावंड, अंकुश पाटील, काजल पाटील यांनी मेहनत घेतली. उरण तालुक्यात पहिल्या आयडियल क्लासरूमचा मान मिळाल्याने राजिप आदर्श शाळा मोठीजुईच्या शैक्षणिक वाटचालीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## मुरुडमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा

कोर्लई : भारत देशाचा ८० वा. स्वातंत्र्यदिन मुरुडमध्ये विविध ठिकाणी उत्साहात साजरा करण्यात आला. तहसिल कार्यालयात तहसीलदार आदेश डफळ यांच्याहस्ते, आझाद चौकात नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांच्याहस्ते, नगरपरिषदेत उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांच्या हस्ते, तालुका पंचायत समितीत सभापती निलेश घाटवळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच वनविभाग, पोस्ट, सार्वजनिक बांधकाम विभाग, सर्व महाविद्यालय, माध्यमिक शाळा व नगरपरिषद प्राथमिक शाळांमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मुरुड तहसीलदार आदेश डफळ, आराधना दांडेकर, विरेंद्र भगत, नायब तहसीलदार राजश्री साळवी, कल्याण देऊळगावकर, निलेश घाटवळ, राजेंद्रकुमार खताळ, पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, सर्व नगरसेवक, नगरसेविका, पोलिस पथक, मान्यवर नागरिक, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षक वृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





● अलिबाग तालुक्यातील श्रीगाव येथील राजिप प्राथमिक मराठी शाळेच्या प्रांगणात ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त मुख्याध्यापिका प्रतिक्षा पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. (छायाचित्र. सचिन पाटील)



●भारतीय स्वतंत्र दिनाचा ८० वा दिनानिमित्त माणगाव नगरपंचायत कार्यालयाचा जलशुद्धीकरण केंद्र उतेखोल माणगाव याठिकाणी नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

## मुरुड मर्चंट बँकेत ध्वजारोहण

**मुरुड जंजिरा :** भारतीय स्वतंत्र दिनानिमित्त मुरुड तालुका मर्चंट को.ऑप क्रेडिट, सोसा.लि. बँकेचा ध्वजारोहण बँकेच्या माजी मॅनेजर पवित्रा गुंजाळ याना मिळाला. यावेळी चेअरमन संदिप पाटील, उपनगराध्यक्ष वीरेंद्र भगत, नितिन आबुर्ले, प्रमोद मसाल ललित जैन, नागमना खानाजाद, कीर्ती शहा, दिलीप गुंजाळ, डॉ राजकल्याणी, महेंद्र मसाल, आदिंसह संचालक मंडळ कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)